# कृषीवल

रायगड, बुधवार, दि. १३ ऑगस्ट २०२५

किंमत ४ ₹


## हर घर तिरंगा, हर घर स्वच्छता अभियान

**अलिबाग** : रायगड जिल्ह्यातील ग्रामपंचायती, शाळा, महाविद्यालयांमध्ये १३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत हर घर तिरंगा, तसेच हर घर स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत विविध कार्यक्रम, उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. १३ ऑगस्टला जिल्ह्यात स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. यावेळी सार्वजनिक ठिकाणांसह रस्ते, पाण्याच्या टाक्या, पाणी स्त्रोत परिसर स्वच्छता, सार्वजनिक शौचालयांचा परिसर स्वच्छता करण्यात येणार आहे. स्वच्छता मोहीम अंतर्गत गावात स्वच्छता रॅली काढण्यात येणार आहे.१४ ऑगस्टला गावातील पान २ वर

## जनसुरक्षा विधेयकाविरोधात निर्धार परिषद

**मुंबई** : 'महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक २०२४' विधिमंडळाच्या अधिवेशनात पाशवी बहुमताच्या जोरावर मंजूर करण्यात आले असले तरी हे घटनाविरोधी आणि लोकशाहीस बाधक विधेयक असून, जनतेच्या मूलभूत हक्कांवर गदा आणणारे आहे. त्यामुळे हे विधेयक मागे घ्यावे, रद्द करावे, या मागणीसाठी राज्यभर व्यापक लढा उभारण्याचा निर्धार भाकप, माकप, शेकाप, भाकप माले, समाजवादी पक्ष, सकप, भारिप(से), भारत जोडो अभियान, श्रमिक मुक्ती दल व जनआंदोलनाची संघर्ष समिती अशा विविध डाव्या व लोकशाहीवादी पक्ष-संघटनांनी केला आहे. या कायद्याच्या विरोधात १४ ऑगस्ट रोजी, स्वातंत्र्य दिनाच्या पान २ वर

### वेधक

## न्या. वर्मांविरोधात महाभियोग प्रस्ताव

**नवी दिल्ली** : घरात रोख रक्कम सापडल्याप्रकरणी अडचणीत आलेले अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्याविरुद्ध लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी मंगळवारी (दि. १२) महाभियोग प्रस्ताव मंजूर केला असून, १४६ सदस्यांची या प्रस्तावावर स्वाक्षरी आहे. यामध्ये सत्ताधारी आणि विरोधी नेत्यांचाही समावेश आहे. याप्रकरणी एक चौकशी समितीदेखील स्थापन केली आहे. त्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाचे न्या. अरविंद कुमार, कर्नाटक उच्च न्यायालयाचे वरिष्ठ वकील बीबी आचार्य आणि मद्रास उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश मनिंद्र मोहन श्रीवास्तव यांचा समावेश आहे.

## रास्त भाव दुकानदारांच्या मार्जिनमध्ये वाढ

**मुंबई** : राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत शिधापत्रिकारकांना अन्नधान्य व साखरेचे वाटप करणाऱ्या रास्त भाव दुकानदारांच्या मार्जिनमध्ये क्विंटलमागे २० रुपयांची वाढ करण्याचा निर्णय मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. त्यामुळे दुकानदारांना क्विंटलमागे वीस रुपयांची वाढ मिळाल्याने यापूर्वीच्या १५० रुपयांऐवजी १७० रुपये मार्जिन मिळणार आहे. अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब योजना शिधापत्रिकाधारकांना ५३ हजार ९१० रास्त भाव दुकानदारांमार्फत अन्नधान्य, साखर व इतर वस्तुंचे वितरण करण्यात येते. या दुकानदारांना केंद्राकडून ४५ रुपये आणि राज्य शासनाकडून १०५ रुपये असे एकूण क्विंटलमागे १५० रुपये मार्जिन दिले जात होते.

## कलोते धरणात तरुण बुडाला

**खोपोली** : खालापूर तालुक्यातील कलोते ग्रामपंचायत हद्दीमधील कॅप मॅक्सजवळ लाईफ अँड जॉय या रिसॉर्टमधील कामगाराचा कलोते धरणात मंगळवारी बुडून मृत्यू झाला आहे. अभय शिवाजी राऊत असे या मृत्यू पावलेल्या तरुणाचे नाव असून, माजलगाव बीड जिल्ह्यातील आहे. अभय हा २३ वर्षीय तरुण वरील रिसॉर्टमध्ये कामाला लागून चार दिवसच झाले होते. हे हॉटेल कलोते धरणाच्या अगदी कडेला असल्याने अभयने जीन्स आणि टी शर्ट घालून पोहण्यासाठी पाण्यात उडी मारली असता त्याची दमछाक झाली आणि पाण्यात बुडून मृत्यू झाला. या घटनेचा अधिक तपास खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# तरुणांनो, खाकी वर्दीचं स्वप्न पूर्ण होणार!

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

पोलीस होऊन अंगावर खाकी वर्दी चढवण्याचे अनेक तरुणांचे स्वप्न असते. त्यासाठी ते अथक प्रयत्नदेखील करत असतात. ते स्वप्न आता लवकरच पूर्ण होणार आहे. महाराष्ट्र पोलीस दलातील सुमारे १५ हजार पदे भरण्यात येणार असून, मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत त्यास मान्यता देण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. या भरतीमध्ये सन २०२२ व सन २०२३ मध्ये संबंधित पदाची विहित वयोमर्यादा ओलांडलेल्या उमेदवारांनाही एक वेळची विशेष बाब म्हणून अर्ज करता येणार आहे व भरती प्रक्रियेत सहभागी होता येणार आहे.

- **गणेशोत्सवानंतर राज्यात मेगा पोलीस भरती**
- **१५ हजार रिक्त पदांच्या भरतीला तात्काळ मान्यता**


राज्याच्या पोलीस दलात सन २०२४ दरम्यान रिक्त असलेली व २०२५ मध्ये रिक्त होणाऱ्या पदांचा आढावा घेऊन, ही भरती करण्यात येणार आहे. त्यानुसार पोलीस शिपाई १० हजार ९०८, पोलीस शिपाई चालक २३४, बॅण्डस् मॅन २५, सशस्त्री पोलीस शिपाई २ हजार ३९३, कारागृह शिपाई ५५४. पोलीस शिपाई व कारागृह शिपाई ही पदे गट क संवर्गातील आहेत. पोलीस शिपाई भरती प्रक्रिया त्या-त्या जिल्हास्तरावरून राबविण्यात येते. त्यासाठी ओएमआर आधारित लेखी परीक्षा घेण्यात येईल.

पोलीस भरतीचा पहिला टप्पा मैदानाचा असतो. सध्या पावसाळा सुरू असल्याने मैदानी चाचणी घेणे अशक्य आहे. दुसरीकडे, राज्यात २७ ऑगस्टपासून पान २ वर

| रिक्त पदांची संख्या | |
| --- | --- |
| नियोजित पोलीस भरतीतील रिक्त पदे | 11,780 |
| पदोन्नती, हजर न झालेली अंदाजे पदे | 1,870 |
| एकूण रिक्त पदे | 13,650 |

### मुंबई वगळता सर्व जिल्ह्यांत एकाचवेळी 'लेखी'

राज्यात दरवर्षी सरासरी एकूण पदांपैकी पाच टक्के पोलीस अंमलदार सेवानिवृत्त होतात. विभागीय चौकशीअंती बडतर्फ झालेले, स्वेच्छानिवृत्ती घेतलेले व अपघाती मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांची संख्यादेखील चार ते पाच टक्के असते. याअनुषंगाने ऑक्टोबरमध्ये साडेतेरा हजारांवर पोलिसांच्या भरतीस सुरुवात होणार आहे. मुंबई वगळता राज्यातील सर्वच जिल्ह्यांतील उमेदवारांची राज्यभरात एकाचवेळी लेखी परीक्षा होईल, असेही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.



# जिल्ह्यात उभारणार नऊ हजार दहीहंड्या

## सलोखा राखीत उत्सव साजरा करण्याचे जिल्हाधिकारी यांचे आवाहन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यामध्ये येत्या शनिवारी (दि.१६) दहीहंडीचा उत्सव साजरा होणार आहे. त्यासाठी अवघे दोन दिवस शिल्लक राहिले आहेत. जिल्ह्यामध्ये आठ हजार ९७९ दहीहंड्या उभारण्यात येणार आहेत. यानिमित्ताने जिल्ह्यात ३५५ ठिकाणी मिरवणुका काढल्या जाणार आहेत. हा उत्सव जातीय सलोखा राखत, आनंदमय वातावरणात साजरा करा, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले.

जिल्हा शांतता कमिटीची बैठक मंगळवारी (दि.१२) जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात घेण्यात आली. यावेळी ते बोलत होते. यावेळी पोलीस अधीक्षक आंचल दलाल, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्ह्यातील वेगवेगळ्या विभागातील अधिकारी, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे म्हणाले की, दहीहंडीचा उत्सव जिल्ह्यामध्ये मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. त्याची तयारी आयोजकांमार्फत सुरु झाली आहे. पुरुष गोविंदा पथकांसह महिला गोविंदा पथकांचादेखील समावेश दहीहंडी उत्सवामध्ये असणार आहे. महिलांच्या सुरक्षेसाठी पोलिसांनी योग्य ती उपाययोजना करणे आवश्यक आहे. दहीहंडी उत्सव साजरा होण्याच्या ठिकाणी मुबलक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करण्यासाठी पान २ वर



### दीड हजार पोलिसांचा बंदोबस्त

**गोकुळाष्टमीच्या निमित्ताने जिल्ह्यात दीड हजार पोलिसांचा बंदोबस्त असणार आहे. त्यामध्ये १५० पोलीस अधिकारी, ९५० पोलीस कर्मचारी, ३५० होमगार्ड, तसेच वाहतूक कोंडी होऊ नये, म्हणून ७३ वाहतूक पोलिसांची मदत घेतली जाणार आहे. जिल्ह्यामध्ये राज्य राखीव पोलीस दलाची एक तुकडी या कालावधीत असणार आहे.**

> **सण-उत्सव साजरे होत असताना विजेचा प्रश्न निर्माण होणार नाही, याची काळजी महावितरण कंपनीने घेतली पाहिजे. मिरवणुकीचे मार्ग सुरळीत व चांगले असणे आवश्यक आहे. त्यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात. कोणताही गैरप्रकार होणार नाही याची काळजी प्रत्येकाने घेणे आवश्यक आहे.**
> **- किशन जावळे, जिल्हाधिकारी**

# दहीहंडी स्पर्धेच्या चषकाचे अनावरण

## अलिबागमध्ये रंगणार शेकाप पुरस्कृत उत्सवाचा जल्लोष



(छायाचित्र : समीर मालोदे)

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबागमधील शेकाप भवनातील सभागृहात मंगळवारी (दि.१२) महिला व पुरुष गोविंदा पथकाच्या चषकाचा अनावरण सोहळा मोठ्या जल्लोषात पार पडला.

शेतकरी कामगार पक्ष, पुरोगामी युवक संघटना अलिबाग पुरस्कृत प्रशांत नाईक मित्रमंडळ आयोजित दहीहंडी उत्सव अलिबागमध्ये पाहायला मिळणार आहे. मानाचा व प्रतिष्ठेचा मानला जाणारा हा सोहळा शनिवारी (दि.१६) अलिबाग शहरात दुपारी तीन वाजल्यापासून रंगणार आहे. यानिमित्ताने अलिबागमधील शेतकरी भवन येथील सभागृहात बैठकीचे आयोजन करण्यात आले. माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. यावेळी शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, शेकाप जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील, सतीश प्रधान, शेकाप शहर चिटणीस पान २ वर



### 'उत्सवाचा मानबिंदू' प्रशांत नाईक

**माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली अलिबागमध्ये मानाच्या दहीहंडीचे दरवर्षी नीटनेटके, उत्तम व्यवस्थापन आणि आयोजन करण्यात येते. याठिकाणी फक्त स्पर्धाच नव्हे, तर परंपरा जपण्याचे काम गेली अनेक वर्षे करण्यात येत आहे. म्हणूनच आजच्या बैठकीदरम्यान तालुक्यातील पुरुष आणि महिला गोविंदा पथकांनी एकत्र येत प्रशांत नाईक यांना 'उत्सवाचा मानबिंदू' ही पदवी बहाल करीत त्यांचा गौरव केला.**

# मालमत्ता कर वसुलीविरोधात आज मोर्चा

## महाविकास आघाडी देणार महानगरपालिकेवर धडक



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महानगरपालिकेच्या अन्यायकारक, अवास्तव व जनतेच्या दिशाभूल करणाऱ्या 'मालमत्ता कर' वसुलीविरोधात शेतकरी कामगार पक्ष, काँग्रेस पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (श.प.), शिवसेना (उबाठा), महाराष्ट्र नवनिर्माण सेना, महाविकास आघाडीचे घटक पक्ष, आम आदमी पार्टी, समाजवादी पार्टी, पनवेल तालुका प्रकल्पग्रस्त संघर्ष समिती, सामाजिक संघटना व विविध फोरम यांच्या संयुक्त विद्यमाने पोलखोल धडक मोर्चा काढण्यात येणार आहे. हा मोर्चा बुधवार, दि. १३ ऑगस्ट रोजी सकाळी दहा वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक, पनवेल येथून पनवेल महानगरपालिका कार्यालयापर्यंत निघणार आहे. पान २ वर

## मुलाकडून चिमुकल्यावर अत्याचार

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

एका पाच वर्षीय अल्पवयीन मुलावर पंधरा वर्षीय मुलाने अतिप्रसंग केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी अल्पवयीन मुलावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पंधरा वर्षीय अल्पवयीन मुलाने पाच वर्षीय मुलास एका झाडीच्या ठिकाणी नेऊन त्याच्यावर लैंगिक अत्याचार केला. यामुळे मुलाच्या गुप्तांगाला इजा झाली आहे. पीडित मुलाला उपचारासाठी अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याप्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात रात्री उशिरापर्यंत गुन्हा नोंदविण्याचे काम सुरू होते.

# १५ ऑगस्टपासून फास्टॅगचा वार्षिक पास मिळणार

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) ने वाहनचालकांसाठी वार्षिक पास सुविधा सुरू करण्याचा निर्णय घेतला असून, ही सुविधा १५ ऑगस्टपासून लागू होणार आहे. या उपक्रमामुळे वाहनचालकांना वारंवार टोलसाठी फास्टॅग रिचार्ज करण्याची गरज भासणार नाही.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणने खासगी कार, जीप, व्हॅनसारख्या खासगी गाड्यांसाठी वार्षिक पास देण्याचा निर्णय घेतला आहे. सद्य:स्थितीत टोल नाक्यावर वाहनाच्या वजनानुसार शुल्क घेतलं जातं. त्यानुसार आता २०० टोल क्रॉस करण्यासाठी जवळपास १०,००० रुपये लागू शकतात. पण, आता एक टोल क्रॉस करण्यासाठी १५ रुपये शुल्क आकारलं जाईल. त्यामुळे फक्त ३००० रुपयांमध्ये काम होईल.

### कोणत्या मार्गांवर लागू होणार?

- **हा वार्षिक पास फक्त राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय (MoRTH) च्या अखत्यारीतील राष्ट्रीय महामार्ग आणि एक्स्प्रेसवेवर लागू असेल.**
  - **मुंबई-रत्नागिरी राष्ट्रीय महामार्ग**
  - **दिल्ली-मुंबई एक्स्प्रेसवे**
  - **मुंबई-नाशिक महामार्ग**
  - **मुंबई-सूरत मार्ग**

**मात्र, राज्य महामार्ग किंवा महापालिकेच्या टोल मार्गांवर (उदा. मुंबई-पुणे एक्स्प्रेसवे, मुंबई-नागपूर समृद्धी महामार्ग, अटल सेतू) हा पास लागू होणार नाही. अशा मार्गांवर फास्टॅग नेहमीप्रमाणे टोल शुल्क आकारले जाईल.**

### फास्टॅग वार्षिक पास कसा काढाल?

- राजमार्ग यात्रा ॲप (Rajmarg Yatra App) किंवा NHAI/MoRTH च्या अधिकृत वेबसाइटवर भेट द्या.
- वाहन क्रमांक आणि फास्टॅग आयडीने लॉगिन करा.
- ३००० रुपयांचे ऑनलाईन पेमेंट करा (UPI, डेबिट/क्रेडिट कार्ड किंवा नेट बँकिंगद्वारे).
- पास तुमच्या FASTag खात्याशी लिंक होईल आणि १५ ऑगस्ट रोजी एसएमएसद्वारे ॲक्टिवेशनची माहिती मिळेल.

### महत्त्वाचे नियम काय?

- हा पास फक्त खासगी वाहनांसाठी आहे.
- व्यावसायिक वाहनांवर हा पास लागू होणार नाही.
- पास नॉन-ट्रान्सफरेबल आहे, म्हणजेच तो केवळ नोंदणीकृत वाहनासाठीच वापरता येईल.
- निवडक राष्ट्रीय महामार्गांवरच हा पास लागू राहील.




लाडक्या बहिणींची सर्वाधिक पसंती | रक्षाबंधनाच्या दिवशी दीड लाख प्रवाशांचा प्रवास

# एसटीला ५६ लाखांची ओवाळणी

**प्रमोद जाधव**
**। अलिबाग ।**

रक्षाबंधनाच्या दिवशी जिल्ह्यातील महिलांसह अन्य प्रवाशांनी एसटीला अधिक पसंती दिल्याचे दिसून आले आहे. एका दिवसात एक लाख ५० हजार ५४३ प्रवाशांनी प्रवास केला. त्यामध्ये ५० टक्क्यांहून अधिक महिलांनी एसटीतून प्रवास केला आहे. एका दिवसात एसटीला ५६ लाख २१ हजार ८०८ रुपये इतके उत्पन्न मिळाले. त्यामुळे एसटीच्या उत्पन्नात ५६ लाखांची भर पडल्याचे विभाग नियंत्रक कार्यालयाकडून सांगण्यात आले आहे.

एसटी महामंडळ रायगड विभागाच्या अखत्यारीत अलिबाग, पेण, कर्जत, माणगाव, महाड, श्रीवर्धन, मुरूड व रोहा या आठ आगारांचा समावेश असून, जिल्ह्यात १९ बसस्थानके आहेत. ३७७ हून अधिक एसटी बसेस असून, अडीच हजार कर्मचारी आहेत. प्रवासी संख्या वाढविण्यासाठी एसटी महामंडळाच्यावतीने वेगवेगळ्या योजना राबविण्यात आल्या आहेत. सध्या महिलांसाठी अर्धे तिकीट योजना सुरु केली आहे. या योजनेला चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र आहे. नोकरी व कामानिमित्त जाणाऱ्या महिलांना या योजनेचा चांगला आधार मिळत आहे.

जिल्ह्यामध्ये शनिवारी (दि.९) रक्षाबंधन सण साजरा करण्यात आला. रक्षाबंधनाच्या दिवशी एक लाख ५० हजार ५४३ प्रवाशांनी एसटीतून प्रवास केला. एकूण एक लाख ४० हजार ५२३ किलोमीटरचा प्रवास त्यांनी केला. एका दिवसात एसटीला प्रवाशांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. त्यामुळे एका दिवसामध्ये ५६ लाख २१ हजार ८०८ रुपयांचे उत्पन्न पान २ वर

### चार दिवसांत दोन कोटी उत्पन्न

**रायगड जिल्ह्यामध्ये शुक्रवारी (दि.८) नारळी पौर्णिमा, शनिवारी (दि.९) रक्षाबंधन, तसेच रविवारी (दि. १०) व सोमवारी (दि. ११) या चार दिवसांच्या कालावधीत सहा लाख, पाच हजार ४० प्रवाशांनी प्रवास केला. या प्रवाशांच्या माध्यमातून एसटीला चार दिवसांमध्ये दोन कोटी १७ लाख ४८ हजार २२२ रुपयांचे उत्पन्न मिळाले.**

> **रायगड जिल्ह्यामध्ये शुक्रवार ते सोमवार या कालावधीत सहा लाखांहून अधिक प्रवाशांनी प्रवास केला. एसटीला चार दिवसांत चांगले उत्पन्न मिळाले आहे. चांगला प्रतिसाद प्रवाशांकडून मिळाला आहे.**
> **- दिपक घोडे, विभाग नियंत्रक, रायगड**



## पोळपाट डोक्यात पडून एक जखमी

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेलजवळील तळोजा उपनगरामध्ये इमारतीखाली उभ्या असणाऱ्या मुलाच्या डोक्यात पोळी बनवण्यास लागणार मार्बलचा पोळपाट पडल्याने तो मुलगा जखमी झाला आहे.

तळोजा येथील सेक्टर १०, कैलास टॉवर इमारतीखाली हे घटना घडली आहे. दहावीत असणारा हा मुलगा कैलास टॉवरमधील तळमजल्यावर दुचाकी दुरुस्तीच्या दुकानासमोर उभा होता. या मुलाच्या डोक्यावर मार्बलचे पोळपाट पडल्याने डोक्यात खोलवर जखम झाली. डॉक्टरांनी या मुलावर उपचार केले. डोक्यात तीन ते चार टाके पडले. या मुलाचे वडील वाहन चालविण्याचे काम करतात.

# स्वातंत्र्यदिनी दिल्लीत बॉम्बस्फोटाचा कट उधळला

## बिश्नोई टोळीच्या सहा जणांना अटक

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

स्वातंत्र्यदिनी दिल्ली आणि ग्वाल्हेरमध्ये बॉम्बस्फोट घडवण्याचा लॉरेन्स बिश्नोई टोळीचा कट राजस्थान पोलिसांनी उधळून लावला आहे. याप्रकरणी तीन अल्पवयीन मुलांसह टोळीच्या सहा सदस्यांना अटक करण्यात आली आहे. मुंबईतील चर्चित बाबा सिद्दीकी खून प्रकरणाचा मास्टरमाईंड, कॅनडात राहणारा जीशान अख्तर याच्या सांगण्यावरून हा कट रचण्यात आला होता.

राजस्थान पोलिसांच्या अँटी-गँगस्टर टास्क फोर्सने ही मोठी कारवाई केली. अटक करण्यात आलेले हे गुन्हेगार ७ जुलै रोजी पंजाबच्या शहीद भगतसिंग नगरमध्ये ग्रेनेड हल्ला करून फरार झाले होते. पंजाबमधील ही घटना घडवून आणल्यानंतर हे सर्व राजस्थानमधील जयपूर आणि टोंक जिल्ह्यात वेगवेगळ्या ठिकाणी लपले होते. पोलिसांनी त्यांना अटक करून पुढील तपासासाठी पंजाब पोलिसांच्या स्वाधीन केले आहे.

पोलिसांच्या चौकशीत धक्कादायक खुलासा झाला आहे. १५ ऑगस्ट रोजी दिल्ली आणि मध्य प्रदेशातील ग्वाल्हेरमध्ये बॉम्बस्फोट करण्याची या गुन्हेगारांची योजना होती. जर राजस्थान पोलिसांनी वेळेवर त्यांना अटक केली नसती, तर स्वातंत्र्यदिना पान २ वर

## पान १ वरून

## हर घर तिरंगा, हर घर स्वच्छता अभियान

सार्वजनिक ठिकाणे, रस्ते, चौक, बाजारपेठ, प्रमुख ठिकाणे यांची अंतिम स्वच्छता व सजावट आणि ध्वजारोहणासाठी ठिकाण निश्चित करणे. साफसफाई करण्यात येणार आहे. १५ ऑगस्टला ग्रामपंचायत कार्यालय व इतर सरकारी इमारती, अमृत सरोवर इत्यादी ठिकाणी ध्वजारोहण करण्यात येणार आहे. अभियानांतर्गत स्वच्छ सुजल गाव प्रतिज्ञा, सार्वजनिक स्वच्छता मोहीम, स्वच्छता जनजागृती उपक्रम, जलसंवर्धन करण्यात येणार आहे. मोहिमेत जिल्हा, तालुका, ग्रामपंचायत, गावागावांमधील लोकांचा सक्रीय आणि उत्स्फूर्त सहभाग अपेक्षित आहे. स्थानिक स्वराज्य संस्था, ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, महिला बचत गट, सरपंच, सदस्य तसेच शालेय विद्यार्थी, स्वयंसेवक यांचा मोहिमेत सहभाग घ्यावा व ग्रामस्थांनी स्वच्छतेशी निगडीत विविध उपक्रम राबवावेत व अभियान यशस्वी करावे, असे आवाहन रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) शुभांगी नाखले यांनी केले आहे.

## तरुणांनो, खाकी वर्दीचं स्वप्न पूर्ण होणार!

गणेशोत्सवाला प्रारंभ होत असून, त्यासाठी राज्यभर पोलीस अधिकारी व अंमलदारांना बंदोबस्ताची ड्यूटी असते. त्यामुळे गणेशोत्सवानंतर म्हणजेच सप्टेंबरअखेर उमेदवारांकडून पोलीस भरतीसाठी अर्ज मागविले जातील. त्यानंतर ऑक्टोबरपासून मैदानी चाचणीला सुरुवात होईल. उमेदवारांना एका पदासाठी एकच अर्ज करावा लागणार असून, एकाच पदासाठी उमेदवार एकापेक्षा जास्त जिल्ह्यांमध्ये अर्ज करू शकणार नाही. एकाच पदासाठी अनेक जिल्ह्यांमध्ये अर्ज केले असतील, तर एकच अर्ज पात्र ठरेल. प्रत्येक अर्जाचे शुल्क एक हजार रुपयांपर्यंत असणार आहे.

## जिल्ह्यात उभारणार नऊ हजार दहीहंड्या

जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी पाहणी करावी. उत्सव साजरा होत असताना कायदा व सुव्यवस्था बिघडू नये, म्हणून योग्य तो पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. त्याचे नियोजन पोलिसांमार्फत करण्यात आले आहे. गोकुळाष्टमीच्या निमित्ताने जिल्ह्यात दीड हजार पोलिसांचा बंदोबस्त असणार आहे. त्यामध्ये १५० पोलीस अधिकारी, ९५० पोलीस कर्मचारी, ३५० होमगार्ड, तसेच वाहतूक कोंडी होऊ नये, म्हणून ७३ वाहतूक पोलिसांची मदत घेतली जाणार आहे. जिल्ह्यामध्ये राज्य राखीव पोलीस दलाची एक तुकडी या कालावधीत असणार आहे.

## मालमत्ता कर वसुलीविरोधात आज मोर्चा

यासंदर्भात माहिती देताना घेतलेल्या पत्रकार परिषदेत माजी आमदार बाळाराम पाटील, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हा प्रमुख शिरीष घरत, काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुदाम पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष सतीश पाटील, स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे, मनसेचे योगेश चिले, शिवसेना उपजिल्हाप्रमुख भरत पाटील, महानगर प्रमुख अवचित राऊत, पनवेल शहर प्रमुख प्रवीण जाधव, कॅप्टन कलावत, हेमराज म्हात्रे, मा. नगरसेविका शशिकला सिंग, नारायण घरत, राजेश केणी, ॲड. विजय गडगे, प्रकाश म्हात्रे आदी पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. यावेळी बोलताना बाळाराम पाटील यांनी सांगितले की, सत्ताधाऱ्यांनी पाच वर्षे कर न वाढवण्याचा दिलेला वायदा मोडून, अवास्तव करासह दंड/व्याज आकारणी केली जात आहे. शास्ती माफी म्हणजे फक्त व्याज/दंड माफी, मूळ मालमत्ता करात कोणतीही सूट नाही. पनवेल महानगरपालिका प्रत्यक्षात ड वर्गात असूनही, अ वर्गातील मुंबई-ठाण्यासारखा कर दर लावला जातो. मुंबई-ठाणे प्रमाणे सुविधा नसताना एवढा जादा कर आकारला जातो. २६८ कोटींचा स्टील मार्केट कर माफ, पण सामान्य जनतेला फक्त व्याज/दंड माफी. नवी मुंबईत २० वर्षांपासून ग्रामपंचायत दराने कर व ५०० चौ. मी. संपूर्ण घरांना करमुक्ती, मात्र पनवेलमध्ये जास्तीचा कर आकारण्यात येत आहे. यासंदर्भात जनतेमध्ये संताप असून, त्याच्या निषेधार्थ हा पोलखोल मोर्चा काढण्यात येणार असल्याचे सांगितले..

## एसटीला ५६ लाखांची ओवाळणी

एसटीला मिळाले. गतवर्षी रक्षाबंधनाच्या दिवशी रायगड जिल्ह्यातील एसटीला ५० लाख ३८ हजार १२४ रुपयांचे उत्पन्न मिळाले होते. गतवर्षाच्या तुलनेने यावर्षी रक्षाबंधनाच्या दिवशी पाच लाख ८३ हजार ६८४ रुपये इतकी उत्पन्नात वाढ झाल्याचे चित्र आकडेवारीनुसार स्पष्ट झाले आहे.

## दहीहंडी स्पर्धेच्या चषकाचे अनावरण

अनिल चोपडा, संदीप शिवलकर, नील नाईक आदी मान्यवरांसह गोविंदा पथकांचे प्रतिनिधी, मंडळाचे सदस्य व कार्यकर्ते उपस्थित होते. सुरुवातीला भव्य दिव्य अशा दोन्ही चषकांचे (मानाची गदा) अनावरण अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांच्या हस्ते रिमोटद्वारे करण्यात आले.

शेतकरी कामगार पक्ष पुरोगामी युवक संघटना अलिबाग पुरस्कृत आणि प्रशांत नाईक मित्र मंडळ आयोजित याही वर्षी दहीहंडी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. त्याची तयारी युद्धपातळीवर सुरू असून, माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांच्या मार्गदर्शनानुसार नियोजन करण्यात येत आहे. त्यासाठी वेगवेगळ्या समितीच्या गठीत करण्यात आल्या आहेत. शंभरहून अधिक सदस्यांचा यामध्ये सहभाग राहणार आहे. गोविंदा पथकाच्या सुरक्षेसाठी डॉक्टरांसह रुग्णवाहिका आदी वैद्यकीय पथके असणार आहेत. सर्वांना उत्सव आनंदमय व शांततामय वातावरणात पाहता यावा, यासाठी योग्य नियोजन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, घरबसल्यादेखील या उत्सवाचा आनंद नागरिकांना घेता येणार आहे. दहीहंडी उत्सवात सहभाग घेणाऱ्या गोविंदा पथकांना अटी व शर्तींची माहिती यावेळी देण्यात आली. नेमण्यात आलेल्या समितीची माहिती देऊन योग्य ती जबाबदारी खंबीरपणे पार पाडण्याची सूचना केली. रायगड जिल्ह्यामध्ये कृष्णजन्माष्टमीनंतर दुसऱ्या दिवशी ग्रामीण व शहरी भागात ठिकठिकाणी गोपाळकाला सण साजरा केला जातो. यानिमित्ताने दहीहंडी फोडण्याचा कार्यक्रम उत्साहात साजरा केला जातो. यावर्षी अलिबागमध्ये दहीहंडी फोडण्याचा थरार पाहावयास मिळणार आहे. अलिबागचे माजी नगराध्यक्ष यांच्या पुढाकाराने गेल्या अनेक वर्षांपासूनची ही परंपरा आजही जपली जात आहे.

**गोविंदा पथकांना मिळणार लाखोंची बक्षिसे**

दहीहंडी स्पर्धेसाठी ५३ गोविंदा पथकांनी नोंदणी केली आहे. त्यात महिला गोविंदा पथके २५ आणि पुरुष गोविंदा पथके २८ आहेत. दहीहंडी फोडणाऱ्या पुरुषांच्या अंतिम विजेत्या पथकाला प्रथम क्रमांकाचे रोख एक लाख ३१ हजार १११ रुपये व चषक देऊन गौरविण्यात येणार आहे. पुरुष पथकाच्या पाच थरांच्या सलामीला पाच हजार रुपये, सहा थरांच्या सलामीला अकरा हजार रुपये देण्यात येणार आहे. अंतिम विजेत्या महिला गोविंदा पथकाला प्रथम क्रमांकाचे ५१ हजार १११ रुपये व चषक असे बक्षीस देण्यात येणार आहे. तसेच चार थरांची सलामी देणाऱ्या महिला गोविंदा पथकाला पाच हजार रुपये व पाच थरांची सलामी देणाऱ्या पथकाला अकरा हजार रुपये देऊन सन्मानित केले जाणार आहे. दहीहंडी उत्सवानिमित्त रिल्स स्पर्धा आयोजित केली आहे. या स्पर्धेसाठी ३३ जणांनी नोंदणी केली असल्याचे सांगण्यात आले.

**स्व. नमिता नाईक यांच्या स्मरणार्थ विशेष पारितोषिक**

अलिबाग नगरपरिषदेच्या माजी नगराध्यक्षा स्व. नमिता नाईक यांचे राजकीय, सामाजिक, क्रीडा क्षेत्रात मोलाचे योगदान राहिले आहे. त्यांच्या स्मरणार्थ यावर्षी विशेष पारितोषिकांचे आयोजन करण्यात आले आहे. अलिबाग नगरपरिषद हद्दीतील पुरुष गोविंदा पथकाने दहीहंडी फोडल्यास त्या पथकाला एक लाख रुपये आणि महिला गोविंदा पथकाला ५० हजार रुपयांचे अतिरिक्त पारितोषिक देण्यात येणार आहे.

## स्वातंत्र्यदिनी दिल्लीत बॉम्बस्फोटाचा कट उधळला

दिवशी मोठा घातपात होऊ शकला असता. या टोळीला कॅनडातून जीशान अख्तर चालवत होता. अटक करण्यात आलेल्या सहापैकी तीन आरोपी सज्ञान आहेत, तर तीन अल्पवयीन आहेत. सज्ञान आरोपींमध्ये सोनू उर्फ काली (कपूरथला, पंजाब), जितेंद्र चौधरी (टोंक, राजस्थान) आणि संजय (हनुमानगढ, राजस्थान) यांचा समावेश आहे.

## जनसुरक्षा विधेयकाविरोधात निर्धार परिषद

पूर्वसंध्येला मुंबईमध्ये नागरिकांचा जोरदार विरोध नोंदविण्यासाठी व राज्यभर आंदोलनाचा कार्यक्रम घोषित करण्यासाठी निर्धार परिषद आयोजित करण्यात आली आहे. ही परिषद यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये दुपारी एक ते पाच या वेळेत घेण्यात येणार आहे.

या परिषदेला माजी केंद्रीय मंत्री खा. शरद पवार, शिवसेना ठाकरे गटाचे उद्धव ठाकरे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, सुभाष लांडे, प्रकाश रेड्डी, शैलेंद्र कांबळे, उल्का महाजन, ब्रायन लोबो, कॉ. भारत पाटणकर, किशोर ढमाले, आमदार विनोद निकोले, अजित नवले, शेकापचे नेते माजी आ. बाळाराम पाटील, उदय भट, शाम गायकवाड, अबू आझमी, डॉ. भालचंद्र कांगो हे मार्गदर्शन करणार आहेत. या परिषदेत अनेक मान्यवर, कलाकार, पत्रकार, वकील, साहित्यिक, व प्रमुख राजकीय पक्षांचे नेते उपस्थित राहणार आहेत. त्यामध्ये पी. साईनाथ, किरण माने, सुरेश खोपडे, संभाजी भगत, प्रज्ञा पवार, तुषार गांधी, ॲड. मिहीर देसाई, तिस्ता सेटलवाड, दीपक पवार, मिलिंद रानडे, डॉ. डी.एल. कराड, आनंद पटवर्धन, धनाजी गुरव आदी मान्यवरांचा समावेश आहे.


**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

### SRM E –TENDER NOTICE(THIRD CALL)

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| Sr. No. | Tender / Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No:-** EE/EHV (O &M ) /DIVN/MHD/Tech/ E-Tender-16/III rd Call/ 2025-26 Dtd.13.08.2025 RFX No. 7000037158 | **Sub.:-** Third Call for SRM E-Tender for various regular preventative maintenance/ emergency and breakdown works of various 220KV & 100KV Substations under EHV O&M Dn. Mahad for the year 2025-26. | Rs. up to 10,00,000/- (Including GST+ 1% Labour CESS) |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/- + GST
**Bid submission is from 13.08.2025 @ 00:00 hrs to 22.08.2025 @23:59Hrs for above tender**
For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The Addl.Executive Engineer, (O) : Phone No.8793505100
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

-Sd-
**Executive Engineer (I/c)**
**EHV(O&M) Dn. Mahad**

### महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**जाहीर नोटीस**

सर्व संबंधित नागरिकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मऔविम महाड औद्योगिक क्षेत्रामधील खालील भूखंड हे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्या मालकीच्या क्षेत्रात असून सदर भूखंडातील लहान मोठी वृक्ष कापणेसाठी (Felling) व वृक्ष संवर्धनासाठी वृक्ष अधिकारी म्हणून माझेकडे परवानगी मागितली आहे. सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव व भूखंड क्र. | एकूण वृक्ष संख्या | वृक्ष कापणेसाठी परवानगी मागितलेली संख्या | करण्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| १. | मे.लि.नोरीऑन केमिकल इंडिया प्रा. भूखंड ईआणि ई २०-ई, १९-ई, १८-६१ (भाग) महाड औद्योगिक क्षेत्र | ७३ नंबर | अ) वृक्ष कापणे त्यांची तपशिलवार माहिती पुढीलप्रमाणे आहे. १) भोकर=५ २) चिकू=३ ३) उंडी=१ ४) पिंपळ=१ ५) मोहा=१ ६) सप्तपर्णी/सातवीन=१ ७) साग/सागवान=१ ८) नारळ=१८ ९) पेरू=५ १०) उंबर=१ ११) ऑस्ट्रीलियन बांबू=१ १२) बांबू/बेट=२ १३) गुलमोहर=२ १४) जांभूळ=३ १५) करंज=५ १६) आंबा=२३ | |
| | | एकूण= | ७३ | |

तरी Maharashtra (Urban Areas) Protection And Preservation of Trees Act १९७५ कलम ८ (३) (a) नुसार सदर वृक्ष कापणेसाठी (Felling) कसल्याही प्रकारची हरकत असल्यास तसे त्यांनी आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसाच्या आत नमूद केलेल्या पत्त्यावर लेखी कळवावे, तसे कोणी न कळविल्यास मागणीप्रमाणे वृक्ष कापणेसाठी (Felling) व वृक्ष संवर्धन करण्यासाठी परवानगी दिली जाईल. नंतर कोणाची व कसलीही तक्रार ग्राह्य घेण्यात येणार नाही, म्हणून महाड पाणी पुरवठा विभागातर्फे जाहीर नोटीस दिली आहे.

**सही/-**
**वृक्ष अधिकारी**
**कार्यकारी अभियंता तथा विनिप्रा**
**स्थापत्य विभाग, महाड**

### नोटीस

तमाम जनतेस या नोटीशीने कळविण्यात येते की, श्री.कमळाकर शंकर भोसले, रा.परहूरपाडा, पो.कामार्ले, ता. अलिबाग, जि.रायगड यांच्या मालकीच्या मौजे परहूरपाडा गट नंबर ५७ एकूण क्षेत्र ०.३६.०० हे. आर आकार ०.७८ पैसे या मिळकतीचा आमचे आशिल श्री.तुषार मनोहर नाईक रा.परहूरपाडा, पो.कामार्ले, ता.अलिबाग, जि.रायगड यांचेबरोबर दिनांक २५/०६/२०१० रोजी साठेकरार झालेला असून त्यांनी आमचे आशिलांकडून बयाणा रक्कमसुद्धा स्विकारलेली आहे.

सदर मिळकतीबाबत मालकी हक्कांची योग्य ती पडताळणी करून व काही अटी व शर्तीची पुर्तता करून खरेदीखत करतेवेळी सर्व मोबदला देण्याचे ठरले होते. परंतु श्री.कमळाकर शंकर भोसले हे सदरची मिळकत आमचे आशिलांचा हक्क डावलून अन्य त्रयस्थ इसमांस विकू पाहत आहेत.

तरी या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे परहूरपाडा गट नंबर ५७ एकूण क्षेत्र ०.३६.०० हे. आर आकार ०.७८ पैसे या मिळकतीचा आमचे आशिलांबरोबर दिनांक २५/०६/२०१० रोजी साठेकरार झालेला आहे व त्याची बयाणा रक्कम सुद्धा श्री.कमळाकर शंकर भोसले यांनी स्विकारलेली आहे व सदरहू साठेकरार आजमितीस अस्तित्वात असून उर्वरीत मोबदला देवून आमचे आशिल सदरचा विक्री व्यवहार पुर्ण करण्यास तयार होते व आहेत. सबब मौजे परहूरपाडा गट नंबर ५७ एकूण क्षेत्र ०.३६.०० हे. आर आकार ०.७८ पैसे या मिळकती संदर्भात श्री.कमळाकर शंकर भोसले यांचेबरोबर कोणीही कोणत्याही प्रकारच्या वाटाघाटी अगर विक्री व्यवहार करू नये. तसा व्यवहार केल्यास तो आमचे आशिलावर बंधनकारक राहणार नाही व आमचे आशिल वर नमुद केलेल्या इसमांस अगर इतर संबंधितांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करतील याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : १२/०८/२०२५

**(ॲड. विजय अनंत पेढवी)**
नांदाईपाडा, पो.झिराड
ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं.९८२२१८६७४०

### अपर जिल्हाधिकारी रायगड मुख्यालय अलिबाग यांचे न्यायालयात
**जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अलिबाग जि. रायगड**

क्रमांक/आरटीएस/अपील क्र.१६७/२०२५

कै.नारायण पांडूरंग पाटील मयत तर्फे वारस
१ श्री.सुनिल नारायण पाटील — अपिलार्थी
२ श्री.प्रदिप नारायण पाटील
रा.नागाव, पाटील वाडी, ता.उरण, जि.रायगड

**विरूद्ध**

१ श्री. मोहन गणपत घरत
२ श्री. प्रफुल्ल गणपत घरत
३ श्री. दत्तात्रेय गणपत घरत
अ.क्र.१ ते ३ रा. नवेपोपुड, मनोज गॅलक्सी समोर, नागाव रोड, ता.उरण, जि.रायगड
४ श्री.यशवंत गणपत घरत
रा.मोठे नागाव, ता.उरण,जि.रायगड
५ श्रीम.स्नेहा सतिश म्हात्रे
६ श्रीम.शालिनी प्रविण गौरक्ष — उत्तरार्थी
अ.क्र. ५ व ६ रा.नवेपोपुड, मनोज गॅलक्सी समोर, नागाव रोड, ता.उरण, जि.रायगड

**महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये अपील**

या जाहिर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, मौजे नागाव, ता. उरण, जि.रायगड येथील सर्व्हे नं.३/१/अ क्षेत्र ००-५०-४० हे.आर. आकार ०६.०२ या जमीन मिळकती संदर्भात अपिलार्थी यांनी उपविभागीय अधिकारी पनवेल यांचेकडील आरटीएस अपील क्र.०७/२०२०, दि.३१/०७/२०२३ मधील आदेशाविरुद्ध अपील दाखल केले आहे. सदर अपीलाची नोटीस काढली असता त्याची बजावणी होऊ शकली नाही. आपला राहण्याचा शेवटचा पत्ता वरीलप्रमाणे असल्याची माहिती अपिलार्थी यांस आहे. सबब, अपिलार्थी या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, सदर अपीलामध्ये दि.२२/०८/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता अपर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग हे सुनावणी घेणार असून सदरची सुनावणी अपर तहसिलदार पनवेल यांचे कार्यालय, खोली क्रमांक ३०७, प्रशासकीय भवन, आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके ऑडीटोरीयन समोर, जुने पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे निश्चित करणेत आलेली आहे. तरी आपण स्वतः अगर तुमचे वकीलांमार्फत सदर सुनावणीस हजर रहावे. आपण हजर न राहिल्यास आपले गैरहजेरीत प्रकरणामध्ये सुनावणी होऊन आदेश दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण: अलिबाग
दिनांक : ११/०८/२०२५

सही/-
**अपर जिल्हाधिकारी रायगड**
**अलिबाग करीता**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने असे कळविण्यात येते कि, माझ्या अशिलांनी मौजे-चेंढरे, ता.अलिबाग, जि. रायगड येथील **श्री. दिलीप गजानन गुर्जर,** रा. अलिबाग यांच्या खुद्द मालकीची खालील वर्णनाची बिनशेती जमीन मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे: चेंढरे, ता.अलिबाग, जि. रायगड येथील भूमापन क्रमांक व उपविभाग ११/ब/१०, क्षेत्र : ०-०३-४९ आर.चौ.मी., आकार रु. ३४.९० पैसे.**

तरी वर वर्णन केलेली मिळकत विद्यमान मालकांचे ताबे कब्जा वहिवाटीत, निर्वेध, बोजा विरहित, विकण्यायोग्य असल्याची हमी विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिली आहे. तरी वरील मिळकतीसंदर्भात कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हित संबंध असल्यास अथवा त्यांची या व्यवहारास हरकत असल्यास आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहित ही नोटीस प्रसिध्द झाल्या दिनांकापासून १४ दिवसांचे आत माझेकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही हरकत न आल्यास माझे अशील त्यांचा संदर्भित मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशीलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण :- अलिबाग
दिनांक :-११/०८/२०२५

सही/-
**ॲड. ऋग्वेद अविनाश ठाकूर.**
रा. ५/३, आत्माराम नगर, अलिबाग-रायगड
मोबा. नं. ९८५००९०१०३

### तहसिल कार्यालय सुधागड यांचे न्यायालयात

क्र.फौजदारी/कात-९/आवक क्र.४०९/२०२५

श्री.काशिनाथ रामजी घुटे — वादी
रा.कासारवाडी पो.घोटवडे
ता.सुधागड, जि.रायगड

ग्रामसेवक, ग्रामपंचायत घोटवडे
ता.सुधागड, जि.रायगड — प्रतिवादी

**जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे जन्म-मृत्युबाबत**

तमाम जनतेस या जाहिर नोटीसद्वारे कळविणेत येते की, श्री.काशिनाथ रामजी घुटे रा.कासारवाडी पो.घोटवडे ता.सुधागड, जि.रायगड यांनी माझी आजी कै.धर्मी आंब्या घुटे हिचा मृत्यु दि.१२/०७/१९७४ रोजी मौजे कासारवाडी ता. सुधागड, जि.रायगड येथे झाला आहे. परंतु तिची नोंद अद्यापपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात केली नाही असे प्रतिज्ञापत्रात नमुद करुन तिच्या मृत्यु नोंदीचा आदेश मिळणेबाबत अर्ज तहसिल कार्यालय सुधागड येथे सादर केला आहे.

सदरहु कै.धर्मी आंब्या घुटे हिचा मृत्यु नोंदीच्या तारखेबाबत कोणाची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत तहसिल कार्यालय, सुधागड पाली येथे स्वतः अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरुपात हरकत दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे मृत्यु नोंद करण्याचे आदेश पारीत करणेत येईल. असे या जाहीर नोटीसद्वारे प्रसिद्ध करणेत येत आहे.

ठिकाण :- कासारवाडी
दिनांक :- ०६/०८/२०२५

सही /-
**(उत्तम कुंभार)**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी सुधागड**

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे धामणी, ता.कर्जत, जि.रायगड येथील हक्क नोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत तिचे मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे धामणी, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| ऋतुजा अजित निगुडकर सृष्टी अजित निगुडकर | ८० | २ | ०-०२-०० | ०.०५ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारचे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पूराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा (१४) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध बोजारहित आहे, असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
दिनांक : १३/०८/२०२५

**ॲड.साहिल राजेंद्र निगुडकर**
पत्ताः कोर्ट व्ह्यु को.ऑप. हौ. सोसायटी, शॉप नं.१, कर्जत सिव्हील कोर्ट समोर, कर्जत रायगड
मो.:९५६१५७५६२६/९५९५३२४२३४

**ॲड. राजेंद्र पी. निगुडकर**
पत्ताः कोर्ट व्ह्यु को.ऑप. हौ. सोसायटी, शॉप नं.१, कर्जत सिव्हील कोर्ट समोर, कर्जत रायगड
मो.:९८२२७७४०७५/८४८४९६५६२६

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की मौजे सावळे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विदयमान मालक केतन रणजितसिंग गांधी व मोहम्मद इरफान सलीम सिध्दीकी यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मौजे सावळे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| ९४ | ४ | ०-२४-०० | ०-२२ |

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिदध झालेपासुन १४(चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. १३/०८/२०२५
मो. ९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**समीर हरिश्चंद्र लाड**
शॉप नं ०२, साई सावली अपार्टमेंट,
कर्जत दिवाणी कोर्टासमोर, कर्जत, रायगड

### जाहीर नोटीस

सर्व लोकांना जाहीर नोटीसीद्वारे कळवण्यात येत आहे की, मौजे वैजाळी रामाचापाडा हाशिवरे, ता.अलिबाग जि.रायगड येथील घर नं.६७७ ही मिळकत वैजाळी-हाशिवरे या ग्रामपंचायत हद्दीतील असून घर व घराभोवतील असलेली वई-वारंग सहीत सर्व जागा विद्यमान मालक श्री.सागर देवजी तांदळेकर यांचे मालकीची व ताबेकब्जात असून तशी ग्वाही त्यांनी आम्हाला दिल्याने वरील मिळकत आम्ही कायम विकत घेत असून तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर आमची झाली आहे. वरील मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरोसा विद्यमान मालकांनी आम्हाला दिला आहे.

सदर मिळकतीचे विक्री व्यवहार करण्यास कोणाचीही हरकत, ताबा, कब्जा, बोजा, वहिवाट, गहाण, पोटगी हक्क, वगैरे कोणत्याही प्रकारचा कसलाही हक्क, हितसंबंध असल्यास आम्हाला पुरावा व कागदपत्रासहीत नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसात खालील मो.नंबर वर फोन करून प्रत्यक्ष भेटावे. सदर मुदतीत कोणाचीही हरकत/तक्रारी न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून सदर व्यवहार पूर्ण केला जाईल. नंतर येणाऱ्या हरकती/तक्रारी यांस आम्हाला बंधनकारक राहणार नाहीत. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

दि.१३/८/२०२५

**ऋतुराज प्रसाद पाटील**
मो नं.९०४९६१०७७१
पत्ता-घर क्र.६३, मु.मुळे, पो.थळ
अलिबाग-रेवस मार्ग,
अलिबाग-रायगड ४०२२०७

### तहसिल कार्यालय सुधागड यांचे न्यायालयात

क्र.फौजदारी/कात-९/आवक क्र.४१०/२०२५

श्री.काशिनाथ रामजी घुटे
रा.कासारवाडी पो.घोटवडे — वादी
ता.सुधागड, जि.रायगड

ग्रामसेवक, ग्रामपंचायत-घोटवडे — प्रतिवादी
ता.सुधागड, जि.रायगड

**जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे जन्म - मृत्युबाबत**

तमाम जनतेस या जाहिर नोटीसद्वारे कळविणेत येते की, श्री.काशिनाथ रामजी घुटे रा.कासारवाडी पो.घोटवडे ता.सुधागड, जि.रायगड यांनी माझी आई कै.जाई रामजी घुटे हिचा मृत्यु दि.०५/०४/१९८० रोजी मौजे कासारवाडी ता. सुधागड, जि.रायगड येथे झाला आहे. परंतु तिची नोंद अद्यापपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात केली नाही असे प्रतिज्ञापत्रात नमुद करुन तिच्या मृत्यु नोंदीचा आदेश मिळणेबाबत अर्ज तहसिल कार्यालय सुधागड येथे सादर केला आहे.

सदरहु कै.जाई रामजी घुटे हिचा मृत्यु नोंदीच्या तारखेबाबत कोणाची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत तहसिल कार्यालय, सुधागड पाली येथे स्वतः अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरुपात हरकत दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे मृत्यु नोंद करण्याचे आदेश पारीत करणेत येईल. असे या जाहीर नोटीसद्वारे प्रसिध्द करणेत येत आहे.

ठिकाण :- कासारवाडी
दिनांक : ०६/०८/२०२५

सही /-
**(उत्तम कुंभार)**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी सुधागड**

दिनांक ११/०८/२०२५

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी खालील वर्णनाची मिळकतीबाबत विद्यमान मालक यांचेसोबत चालु आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याची आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन**
**जिल्हा परिषद रायगड, दुय्यम निबंधक सो.अलिबाग, जि.रायगड**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर | आकार रु.पैसे | जमिन मालकाचे नांव |
|---|---|---|---|---|
| पेढांबे ता.अलिबाग | जुना ३६, व नविन ३४ | ०-८५-०० पो.ख. ०-०२-०० एकूण ०-८७-०० पैकी ०-१६-०० | २.०० | कुमुदिनी कृष्णा वर्तक |

वरील पैकी ०-१६-०० हे.आर. इतके क्षेत्र या जाहीर नोटीसचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे, जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क, कुळअखत्यारपत्र आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार यांजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. प्रशांत म्हात्रे**
जिल्हा व सत्र न्यायालय, रायगड-अलिबाग.
मो.८३७८००९९९९/९८२२०१७१६१

पक्षकाराच्या मान्यतेची सही

# विदेशी दारु निर्मिती करणाऱ्यांना दणका

**सहा लाख १५ हजार रुपयांचा ऐवज जप्त ▶▶ रायगडच्या राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई**

| अलिबाग | प्रतिनिधी |

**अनधिकृतरित्या विदेशी दारु तयार करणाऱ्या अड्ड्यावर छापा टाकण्यात आला. रायगडच्या राज्य उत्पादन शुल्क पथकाने ही कारवाई केली. गोवा राज्यात विक्रीचे विदेशी मद्याचा ६१ लाख रुपयांचा साठा जप्त करण्यात आला. या कारवाईने बेकायदेशीररित्या विदेशी दारू विक्री, वाहतूक व निर्मिती करणाऱ्यांना दणका मिळाला आहे.**



पोलादपूर तालुक्यातील कदमवाडी, दिवील येथे गोवा राज्यात विक्रीचे विदेशी मद्याचा साठा उपलब्ध असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागातील भरारी पथक अलिबागचे निरीक्षक सतिश गावडे यांना मिळाली. राज्य उत्पादन शुल्क विभागातील रायगडचे अधीक्षक रविकिरण कोले यांच्या मार्गदर्शनानुसार पथक तयार करण्यात आले. त्यानुसार निरीक्षक सतिश गावडे, दुय्यम निरीक्षक रश्मीन समेळ, प्रकाश दाते, सहाय्यक दुय्यम निरीक्षक अपर्णा पोकळे, निमेश नाईक, कल्याणी ठाकूर, सुनील घन, रंजित मोकोडे, रिंकेश धुळे, रचना मोहिते, अशिष कांबळे, प्रसाद गिरी, या पथकाने नुकताच छापा टाकला. विदेशी मद्यांचा साठा महाराष्ट्र राज्यात विक्रीच्या बाटल्यांमध्ये भरून त्यावर बनावट झाकण, लेबल लावल्याचे दिसून आले. ७५० मिली लिटरच्या २३० बाटल्या, ३७५ मिली. लिटरच्या १० बाटल्या,, तसचे १८० मिली लिटरच्या एक हजार ६०४, अशा एकूण दोन हजारहून अधिक बाटल्या, एक हजार २०० बनावट झाकण, चार हजार १२९ लेबल असा एकूण सहा लाख १५ हजार ५६० रुपयाचा ऐवज जप्त करण्यात आला. या गुन्ह्यात पोलादपूरमधील रुपुश मोरे, याला अटक करण्यात आली आहे. यामध्ये आणखी दोन संशयीतांचा समावेश असून त्यांचा तपास सुरु आहे. याप्रकरणी दारुबंदी कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

### तक्रारीसाठी सोशल मीडियाचा आधार

**जिल्ह्यातील अवैध दारु, विक्री, निर्मिती व वाहतूक करणाऱ्यांवर अकुंश ठेवण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभाग कारवाई करीत आहे. अवैध धंदे बंद करण्यासाठी आता सोशल मीडियाचा आधार घेण्यात आला आहे जिल्ह्यातील नागरिकांना घरबसल्या तक्रार करता येणार आहे, त्यासाठी ८४२२००११३३ या क्रमांकावर संपर्क साधवा असे आवाहन राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून करण्यात आले आहे.**

> **“राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त डॉ. राजेश देशमुख, सह आयुक्त पी.पी. सुर्वे, विभागीय उपआयुक्त प्रदिप पवार यांच्या आदेशानुसार पोलादपूर तालुक्यातील दिवील या ठिकाणी पथकाने छापा टाकला. या छाप्यात सहा लाखपेक्षा अधिक मुद्देमाल जप्त करण्यात आला. अवैध मद्य विक्री, वाहतूक, निर्मिती करणारे दिसून आल्यास नागरिकांनी कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात येत आहे. – रविकिरण कोले, अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क”**

## निवडक

### शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढावी

**नेरळ :** शेतकऱ्यांनी फॉर्मर आयडी न काढल्यास शासकीय योजनांचे लाभा मिळणार नाहीत असे परिपत्रक कर्जत तालुक्याचे तहसीलदार डॉ. धनंजय जाधव यांनी काढले आहे.शेतकरी ओळख पत्र काढण्यासाठी महसूल विभागाने गेली अनेक महिने आवाहन केले जात आहे.ज्या प्रमाणे प्रत्येक माणसाची ओळख ही आधार कार्डच्या माध्यमातून समजली जाते. त्याचप्रमाणे प्रत्येक शेतकऱ्यांची ओळख म्हणून शासनाने शेतकरी ओळख म्हणून फॉर्मर आयडी काढण्यासंदर्भात ॲग्रीस्टॅक ही योजना सूरु केली आहे. कर्जत तालुक्यामध्ये ज्या व्यक्तीच्या नावे शेतीचा ७/१२ उतारा आहे. त्या शेतकऱ्यांनी तात्काळ जवळच्या महा-ई सेवा केंद्रवर जाऊन फॉर्मर आयडी तयार करुन घ्यावे. शेतकऱ्यांशी संबंधित सर्व लाभ घेण्याकरीता फॉर्मर आयडी आवश्यक आहे. शेतकऱ्यांनी जर फॉर्मर आयडी तयार करुन नाही घेतला तर पी. एम किसान सन्मान निधी योजना, नमो शेतकरी योजना, पिकविमा योजना, पीक कर्ज मिळणे, कर्ज माफीचा लाभ, धान खरेदी, नैसर्गिक आपत्ती पीक नुकसान लाभ, जमीन विक्री करण्यास अडचण यांणर आहे. तसेच कृषि विषयक सर्व योजनांचा लाभ घेण्याकरीता प्रत्येक शेतकऱ्यांनी फॉर्मर आयडी तयार करुन घेणे अत्यावश्यक आहे. शेतकऱ्याचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होऊ नये, याकरीता ७/१२ नावे असलेल्या सर्व शेतकऱ्यांनी तात्काळ फॉर्मर आयडी तात्काळ करुन घ्यावी, असे आवाहन कर्जतचे तहसीलदार धनंजय जाधव यांनी केले.

**■ तहसीलदार जाधव यांचे आवाहन**

### लोखंडी वजने चोरणारे त्रिकूट जेरबंद

**पनवेल :** पनवेल तालुक्यातील साई गाव येथील असेनदास पनवेल एफ.टी. डब्ल्यू. झेड. प्रा.लिमी. कंपनीचे फ्री ट्रेड वेअरहाउसींग झोन मध्ये ठेवण्यात आलेली बीओएफएल बॅटरीचे महागडे सेल व ४० लोखंडी वजने चोरणाऱ्या त्रिकुटास पनवेल तालुका पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या संदर्भातील तक्रार विकास घायगुडे यांनी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करताच वपोनि गजानन घाडगे, पोनि (गुन्हे) आनंदा कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि अनिरुद्ध गिजे, पो उपनिरीक्षक हर्षल राजपूत, पोहवा धुमाळ, तांडेल, कुदळे, बाबर, देवरे, म्हारसे, पोशी भगत, खताळ आदींच्या पथकाने तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपी संकेत मोकल, (वय २८), कल्पेश पाटील (वय २५), व रजत पाटील (वय ३०) यांना गुन्ह्यात वापरलेल्या मारुती वागेनॉर गाडीसह ताब्यात घेऊन त्यांच्या कडून जवळपास ८० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला.



### विद्यार्थ्यांची हर घर तिरंगा रॅली

**नेरळ :** माथेरान शहरात हर घर तिरंगा रॅली काढून शहरात स्वातंत्र्याचा जयजयकार करीत प्रभातफेरी काढली.माथेरान शहरातील प्राचार्य गव्हाणकर शाळेच्या विद्यार्थ्यांनी काढलेल्या हर घर तिरंगा रॅलीमध्ये नगरपरिषद शाळेचे विद्यार्थी देखील सहभागी झाले होते. माथेरान शहरातील प्राचार्य गव्हाणकर विद्यालयाचे विद्यार्थ्यांनी आज शाळेच्या आवारातून हर घर तिरंगा रॅलीला सुरुवात केली. हातात तिरंगा झेंडे घेतलेले विद्यार्थी यांच्याकडून घोषणा देण्यात येत होत्या.या रॅलीमध्ये माथेरान नगरपरिषद शिक्षण मंडळाच्या हुतात्मा वीर भाई कोतवाल शाळेच्या विद्यार्थ्यांनीदेखील सहभाग घेतला. गव्हाणकर शाळेच्या आवारातून निघालेली ही रॅली छत्रपती शिवाजी महाराज रोड येथून महात्मा गांधी रस्त्याने नगरपरिषद कार्यालय, वखार नाका, रिगल नाका अशी पोस्ट कार्यालय, असेम्ब्ली हॉल येथून माधव गार्डन अशी पुढे श्रीराम चौकात पोहचली.या रॅलीमध्ये प्राचार्य गव्हाणकर, मुख्याध्यापक विदुला गोसावी, नम्रता गोरे, अन्सार महापुले, रामचंद्र चव्हाण आदी सहभागी झाले होते.

# बळीराजा शेतीच्या कामात व्यस्त

| पाताळगंगा | प्रतिनिधी |

श्रावण महिन्याचे अगमन झाल्यापासून बळीराजामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.यामुळे बळीराजा श्रावण महिन्यातसुद्धा शेतीच्या कामाकडे व्यस्त असल्याचे चित्र सध्या पहावयास मिळत आहे.

वर्षभर शेतात राबणारा बळीराजा महिन्यात ठराविक असे दिवस शेतातील काम बंद ठेऊन वार पाळून अध्यात्म करीत असतो. मात्र शेतातील कामात व्यस्त असल्यांचे दृश्य सध्या अनेक ठिकाणी पहावयास मिळत आहे.

श्रावण महिन्यात देव देवतांच्या विविध मंदिरामध्ये टाळ, मृदंगाचा गजर ऐकू येत असतो. त्याच बरोबर भजन, प्रवचन व कीर्तन असे अध्यात्मिक कार्यक्रमही सुरू असतात. परंतू वाढत्या लोकसंख्येच्या अन्नधान्याची गरज भागविण्यासाठी अन्नधान्य उत्पादन वाढविणे गरजेचे असून, ऊन-पाऊस याची तमा न बाळगता ही परंपरा फार वर्षापासूनची आहे. पीक - पाणी चांगले बहरून यावे, सुदृढ आरोग्यप्राप्ती लाभावी, मानसिक व अध्यात्मिक विकास व्हावा, यासाठीच बळीराजा वार पाळून श्रावण मासात अध्यात्म करताना दिसत आहे. या दिवशीही शेतकरी बैल जोडिविना शेतात काम करतात.



काही सणा दिवशीही शेतकरी शेत कामात मग्न असलेले चित्र पाहावयास मिळत आहे.रोज शेताला जाणे, जनावरांना धुणे-पोसणे, चारा आणणे, चाऱ्याची साठवणूक करणे. शिवारात मशागत करणे, पिकांची जोपासना करणे व धान्य साठवणूक करणे अशा कामाचे चक्र कायम सुरू असते.

### रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद



| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल स्टेशन येथे आयोजित रक्तदान शिबिराला रक्तदात्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. स्नेहदीप फाऊंडेशनचे संस्थापक ऋग्वेद रवींद्र कांडपिले, ज्ञानेश्वर कदम, जे जे हॉस्पिटल ब्लड सेंटर मुंबई पिल्ले कॉलेजचे विद्यार्थी यांच्या सहयोगाने रक्तदान शिबिराचे आयोजन पनवेल रेल्वे स्टेशन येथे सकाळी ९ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत करण्यात आले होते. या रक्तदान शिबिराला ॲड. मनोज भुजबळ यांची उपस्थिती लाभली.

# दि.बा. पाटील विमानतळावर नोकरभरतीसाठी मोर्चा व्हावा

**शेकाप नेते राजेंद्र पाटील**

| पनवेल | विशेष प्रतिनिधी |

मुंबई विमानतळावर नोकर भरतीसाठी जसे शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांनी आक्रमक धडक देऊन प्रशासनाला झुकवले होते. लोकनेते दिबा पाटील विमानतळाच्या नोकर भरतीत स्थानिक मराठी तरुणांना स्थान मिळावे, यासाठी राज ठाकरे यांच्या नेतृत्वात मोर्चा व्हावा असा विचार शेकाप नेते राजेंद्र पाटील यांनी मांडला.

सिडको आणि पनवेल महानगरपालिका यांनी नामांतराचा मुद्दा शासन दरबारी असताना नवी मुंबई विमानतळ असा उल्लेख केल्याने सत्ताधारी यांनी या आस्थापनांना जाब विचारणे गरजेचे असल्याचे मत शेकाप नेते राजेंद्र पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केले.

राजेंद्र पाटील पुढे म्हणाले कि, दिबांच्या नावासाठी जी आंदोलने झाली त्यात माझ्यावर गुन्हे दाखल आहेत. सिडको आणि पनवेल महानगरपालिका यांनी नवी मुंबई विमानतळ असा उल्लेख करून दिबा प्रेमींची मने दुखावली आहेत.

लोकनेते दिबा पाटील संघर्ष समितीने यावर कडक भूमिका घेणे गरजेचे आहे, पण ती घेतली जात नसल्याने दिबा प्रेमी, आगरी कोळी, कराडी तसेच इतर समाज बांधव समितीवर नाराज झालेले आहेत.

दिबांचे पुत्र अतुल पाटील यांनी पालिकेत जाऊन विचारणे आवश्यक आहे. असे पाटील म्हणाले. विमानतळ भरती ही स्थानिकांची झाली पाहिजे पण यासाठी मोठे आंदोलन होणे आवश्यक आहे. सत्ताधारी हे भरतीसाठी जे अर्ज वितरित करीत आहेत ते राजकीय लाभ पाहून करत आहेत.

ही भरती सर्व समावेशक स्थानिक भूमिपुत्रांची असल्याने त्यात राजकारण आणू नये या मताचा मी असल्याचे त्यांनी सांगितले. सिडको आणि महापालिका यांनी लावलेल्या पाट्यांवर नवी मुंबई विमानतळ असा उल्लेख केल्याने नामांतराची सद्यस्थिती विषद करण्यात आली.

पण दिबांचे नाव दिले गेले नाही तर वेळ प्रसंगी पदाचा राजीनामा देऊ असे सांगितले. यावर प्रतिक्रिया देताना राजेंद्र पाटील यांनी त्यांचे कौतुक केले.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी आमदार असताना एवढी हिम्मत तरी दाखवली याचे कौतुक आहे. पण तेव्हाच आ. महेश बालदी,आ.मंदा म्हात्रे या देखील आंदोलनात असताना त्यांनी अद्याप कोणतीच भूमिका घेतली नाही याचा शेकाप नेते राजेंद्र पाटील यांनी निषेध केला.

# कासाडी नदीत केमिकल्सने विषप्रयोग?

**नदीतील मासे आणि गुरे मृत झाल्याने शिवसेना आक्रमक**

| पनवेल | विशेष प्रतिनिधी |

पडघे गावाजवळून तळोजा औद्योगिक वसाहतीमधून वाहणाऱ्या कासाडी नदीत केमिकल टाकून विष प्रयोग करणाऱ्यांवर कारवाई करा, अशी तक्रार शिवसेनेचे उप तालुकाप्रमुख कैलास माळी आणि शिवसैनिक राहुल कांबळे यांनी केली आहे. कासाडी नदीतील केमिकमुळे त्या भागातील काही गुरे आणि मासे मृत झाले असून दुर्गंधीने नागरिक त्रस्त आहेत.

पनवेल तालुक्यातील तळोजा औद्योगिक वसाहतीमधून कासाडी नदी वाहते. पूर्वी पांढरी शुभ्र दिसणारी नदी आता प्रदूषणाने काळवंडली आहे. आजूबाजूचे कारखाने आपला घनकचरा, सांडपाणी आणि रसायने या नदीत बिनधास्त टाकतात. पडघे गावातून ही नदी वाहते. या नदीला लागून काही कारखान्यांनी कच्चे कंपाऊंड टाकले आहे. या ठिकाणी रसायन मिश्रीत वस्तू गोण्यांमध्ये भरून ठेवले आहेत. त्यामुळे तेथे एकप्रकारे गोदाम तयार झाले आहे. याच ठिकाणाहून हे रसायन शेजारीच असलेल्या कासाडी नदीत लपूनछपून टाकले जाते. हा प्रकार रोजचा असल्याने त्या ठिकाणी नदीत मोठ्या प्रमाणात प्रदूषण झाले आहे. हे केमिकल संपूर्ण नदीत पसरल्याने या भागात नदीचे पाणी पूर्ण प्रदूषित झाले आहे. त्यामुळे मासे आणि इतर जनावरे, गुरे मृत्यूमुखी पडले आहेत. याबाबत शिवसेनेचे उप तालुकाप्रमुख कैलास माळी आणि शिवसैनिक राहुल कांबळे यांनी याठिकाणी छापा टाकला. रसायन टाकणारे तेथून पळून गेले. त्यामुळे अशा प्रदूषण करणाऱ्या कारखाने आणि व्यक्तींवर कठोर कारवाई करावी अशी मागणी त्यांनी केली आहे. याबाबत प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रत्यक्ष पाहणी करावी असे देखील त्यांचे म्हणणे आहे.






● पनवेलच्या लाईनआळीत सध्या सजावट आणि भक्तीचा उत्साह ओसंडून वाहतोय. महेश गायकर यांच्या कल्पकतेतून यावर्षी विविध आकाराचे मखर बनविण्यात आले आहेत. (छायाचित्र : राजेश डांगळे)

# सफाई कामगारांसाठी बेमुदत उपोषण

**मनपा मुख्यालयासमोर महादेव वाघमारे लक्षवेधी लक्ष वेधणार**

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल महानगरपालिकेमध्ये काम करणाऱ्या कंत्राटी सफाई व घंटागाडी कामगारांच्या प्रलंबित मागण्या अद्यापही पूर्ण करण्यात आलेल्या नाही. या संदर्भात वारंवार अर्ज विनंती करूनही याबाबत निर्णय घेण्यात आलेला नाही. त्यामुळे येत्या १४ ऑगस्ट पासून आझाद कामगार संघटनेचे अध्यक्ष महादेव वाघमारे मनपा मुख्यालयाच्या समोर बेमुदत उपोषण करणार आहे. त्यांनी या आशयाचे पत्र सुद्धा प्रशासनाला दिले आहे.



पनवेल महानगरपालिकेत मोठ्या प्रमाणात कंत्राटी कामगार स्वच्छता विषयी कामे करतात. एकशे दहा किलोमीटर क्षेत्रफळ असणाऱ्या मनपा क्षेत्राचे आरोग्य अबाधित ठेवण्याची जबाबदारी ते प्रामाणिकपणे पार पाडतात. परिसरातातील कचरा उचलून तो क्षेपणभूमीवर घेऊन जाण्याचे काम घंटागाडी कामगार करतात. त्यांच्या न्याय हक्कासाठी आझाद कामगार संघटना गेल्या काही वर्षांपासून काम करत आहे. यासंदर्भात प्रलंबित मागण्यासाठी संघटनेचे अध्यक्ष महादेव वाघमारे यांनी महापालिकेकडे पत्र व्यवहार केले. प्रत्यक्ष अधिकाऱ्यांना भेटून याबाबत कार्यवाही करण्याची मागणी केली. परंतु याबाबत हालचाली न झाल्यामुळे शेवटी आझाद कामगार संघटनेने बेमुदत उपोषणाचे हत्यार उपसले आहे. गुरुवारी मनपाच्या मुख्यालयासमोर वाघमारे उपोषणाला बसणार आहेत. जोपर्यंत मागण्या मान्य होत नाहीत त्याचबरोबर यासंदर्भात अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने पावले उचलले जात नाहीत. तोपर्यंत हे उपोषण सुरूच ठेवण्याचा इशारा दिला आहे.

यामध्ये प्रामुख्याने सफाई कामगारांचा व त्यांच्या कुटुंबाचा दोन लाख आरोग्य विमा काढणे, घंटागाडी चालक व संकलक या कामगाराचा दीड लाख रूपये आरोग्य विमा काढला आहे. तो बंद करून दोन लाख रूपये चा आरोग्य विमा काढून कामगारांची दोन मुले व आई वडिलांचा या विमा योजनेत सहभाग करून घ्यावा, नोव्हेंबर २०२३ ते नोव्हेंबर २०२४ या कालावधीत पगारी रजा दिल्या नाहीत. त्यांचे पैसे देण्यात यावेत, घंटागाडी संकलक व वाहनचालक यांना नोव्हेंबर २०२३ ते नोव्हेंबर २०२४ या कालावधीत वैयक्तिक सुरक्षा उपकरणे कामगारांना दिली नाहीत. त्याचे प्रत्येक कामगाराला ६८५४ रूपये देण्यात यावे, घंटागाडी कामगारांचे प्रलंबित बोनस व ग्रजुतीचे पैसे देण, आणि त्याचबरोबर काही कामगारांची हॉस्पिटलमधील बिलाचे पैसे देण्यात यावे अशा मागण्या केल्या आहेत.

**पालिकेच्या कारभारावर शेकापची टीका | प्रशासनाकडून नागरिकांची होतेय थट्टा**

# बससेवा नसलेल्या रस्त्यावर थांबा

| पनवेल | विशेष प्रतिनिधी |

ज्या मार्गांवर सार्वजनिक परिवहन विभागाकडून प्रवाशांसाठी कोणतीही बस सेवा पुरवली जात नाही अशा मार्गांवर पालिकेच्या माध्यमातून बस थांबा बांधण्यात आल्याने प्रशासनाच्या या अजब कारभाराविरोधात शेतकरी कामगार पक्षाचे कामोठे शहर अध्यक्ष अमोल शितोळे यांनी संताप व्यक्त केला आहे.

पनवेल पालिकेच्या वतीने पालिका हद्दीतील प्रवाशांसाठी सध्या कोणतीही सार्वजनिक परिवहन सेवा उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. अशा वेळी पालिकेच्या वतीने बस सेवा सुरु करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. पालिकेच्या वतीने तसे प्रयत्न सुरु असल्याचे सांगितले जाते. असे असताना बस सेवा सुरु करण्यापूर्वीच पालिका हद्दीतील अनेक शहरी भागात अत्याधुनिक पद्धतीचे बस थांबे बांधण्यात येत आहेत. महत्वाचे म्हणजे पालिका हद्दीतील काही मार्गांवर धावत असलेल्या नवी मुंबई पालिकेच्या एनएमएमटीची बस थांबत असलेल्या ठिकाणी थांबे बांधणे आवश्यक असताना अशी ठिकाणे न निवडता ज्या रस्त्यावरून बसच धावत नाही अश्या रस्त्यावर थांबे उभारून प्रशासन नागरिकांची थट्टा करत असल्याचा आरोप शितोळे यांनी केला असून, ज्या ठिकाणी गरज आहे अशाच ठिकाणी थांबे उपलब्ध करून द्यावेत अशी मागणी शितोळे यांनी केली आहे.

कामोठे वसाहतीतील सेक्टर २२ येथील अंतर्गत रस्त्यावर पालिकेच्या वतीने थांबा तयार करण्यात आला आहे. मात्र या मार्गांवर कोणतीही बस सेवा उपलब्ध नसल्याकडे देखील शितोळे यांनी लक्ष वेधले आहे.




### बॅनर लावून ओढले ताशेरे

**पालिकेकडून बांधण्यात आलेल्या बस थांब्यावर बॅनर लावून शेकाप तर्फे पालिकेच्या कामकाजावर कडक ताशेरे ओढण्यात आले आहेत.**

### नियमांचे उल्लंघन केल्यास कारवाई

**विक्री केंद्रावर सर्व उत्पादने व त्यांची अधिकृत किंमती स्पष्टपणे फलकावर दर्शवाव्यात. शेतकऱ्यांना पक्के बिल देणे अनिवार्य आहे. दररोजचा खरेदी-विक्रीसाठा नोंदवहीत नियमित लिहावा. फक्त अधिकृत कंपन्यांचे, सरकारमान्य उत्पादनेच विक्रीसाठी ठेवावीत. नकली किंवा कालबाह्य उत्पादने विक्रीस ठेवू नयेत. खताची विक्री इ-पॉस मशीनद्वारेच करावी हे सर्व सूचनांचे कृषी केंद्रधारकांनी पालन करणे गरजेचे आहे नियमांचे उल्लंघन केल्यास नियमा प्रमाणे उचित कार्यवाही, तसेच कारवाई करण्यात येईल, अशी सूचना कृषी विभागाकडून देण्यात आली आहे.**

# रोटरीकडून विद्यार्थ्यांना आयडियल स्टडी ॲप वाटप



| पनवेल | प्रतिनिधी |

ऐतिहासिक शिरढोण गावातील इंग्रजी माध्यमाची मनोदय स्कूल आणि आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके विद्यालय अशा दोन्ही शाळांमध्ये रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलच्या वतीने इयत्ता १० वी तील ९० विद्यार्थी आणि १० शिक्षक यांना १० वी बोर्ड परीक्षेचा अभ्यास चांगलहोण्यासाठी अत्यंत उपयुक्त असे आयडियल स्टडी ॲपचे मोफत वितरण केले.

रोटरीच्या वतीने आयडियल स्टडी ॲप मोफत मिळाल्याने विद्यार्थी, शिक्षक यांनी आनंद आणि समाधान व्यक्त केले. हा आयडियल स्टडी वापरून १० वीच्या परीक्षेत आम्ही नक्की चांगले यश मिळवू असे आश्वासन सर्व विद्यार्थ्यांनी दिले. दोन्ही शाळेच्या मुख्याध्यापकांनी रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलचे मनापासून आभार मानले.

# ... आणि आता भटके कुत्रे

सर्वोच्च न्यायालाने घटनात्मक प्रश्नांचाच विचार करावा अशी अपेक्षा असते. व्यक्तिस्वातंत्र्य म्हणजे काय, राज्य व केंद्र सरकारांचे अधिकार कोणते असे प्रश्न निर्माण झाले तर ते देशातील या सर्वात उच्च जागी बसलेल्या न्यायसंस्थेकडे घेऊन जावेत असा संकेत आहे. पण आपली सरकारे व नोकरशहा इतके नादान, भ्रष्ट आणि कामचुकार आहेत की, या न्याययंत्रणेला सामान्य नागरिकांच्या समस्यांमध्ये लक्ष घालावे लागते. राजधानी दिल्लीतील सर्व भटक्या कुत्र्यांना पकडून कोंडवाड्यात टाका असा आदेश सोमवारी सर्वोच्च न्यायालयाने दिला. खरे तर, दिला म्हणण्यापेक्षा त्याला द्यावा लागला. कारण, सरकारी यंत्रणेचे दुर्लक्ष व बेपर्वाई. म्हटले तर हा अगदी सामान्य विषय. पण ज्यांच्या आसपास कोणाला भटके कुत्रे चावले असेल व त्याला इंजेक्शन इत्यादी गोष्टींमधून जावे लागले असेल त्यांच्यासाठी हा अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. एका आकडेवारीनुसार दर दिवशी या देशात वीस हजार लोकांना कुत्रे चावण्याच्या घटना घडतात. दिल्लीमध्ये वर्षभरात सुमारे सत्तर हजार कुत्रे चावल्याचे प्रकार घडले. गेल्या सहा वर्षांमध्ये तमिळनाडूमध्ये ४३ लाख तर महाराष्ट्रात २९ लाख लोकांना कुत्री चावली. कुत्रा चावल्यावर तात्काळ उपचार न घेतल्यास रेबीज रोगाला बळी पडावे लागते व त्या रोग्याची अंतिम स्थिती अतिशय भयंकर असते. असे अनेक मृत्यू आपल्याकडे होत असतात. त्याहूनही अधिक म्हणजे वृद्ध लोक, स्त्रिया व मुले यांना कुत्रे चावेल अशा दहशतीखाली सतत वावरावे लागते. फिरायला जाणेही अशक्य होऊन बसते. कित्येकदा अगदी लहान अर्भकांवर वा छोट्या मुलांवर कुत्र्यांनी झुंडींनी हल्ला केल्याच्या बातम्या येतात. या अत्यंत भयावह असतात. जंगलामध्ये लांडग्यांच्या टोळीने माणसांवर हल्ला केला तर ते समजण्यासारखे असते. कारण, ते जंगल असते. पण माणसांच्या रहिवासाच्या इलाख्यात दिवसाढवळ्या व वाहनांची रहदारी चालू असताना खुलेआम कुत्रे असे हल्ले करतात. याचाच अर्थ माणूस व प्राणी यांच्यातील संबंधात गंभीर बिघाड झाला आहे. हे कुत्रे माणसांना एखाद्या रोगजंतूप्रमाणे अपायकारक ठरू लागले आहेत. सर्वोच्च न्यायालयाचा आदेश म्हणजे त्याचीच दखल घेऊन केलेली कार्यवाही आहे.

## लहान शहरांमध्येही त्रास

हा आदेश अमलात आणणे सोपे नाही हे उघड आहे. एकट्या दिल्लीमध्ये दहा लाख भटकी कुत्री आहेत. देशभरात ती कित्येक कोटींमध्ये आहे. पूर्वी खेडेगावांमध्येही भटकी कुत्री असत. पण त्यांना फिरण्यासाठी भरपूर जागा असे. शिवाय, शेती हाच प्रमुख व्यवसाय असल्याने त्यातील जनावरे, कोंबड्या इत्यादींसमवेत या कुत्र्यांना सहअस्तित्वाने जगता येई. आता मुंबई-पुण्यासारखी शहरे तर सोडाच पण अलिबाग, पेण किंवा महाडसारखी म ध्यम शहरेही झपाट्याने केवळ माणसांसाठी उभी राहू लागली आहेत. मोकळ्या जागा नाहीशा होत चालल्या आहेत. उंचच उंच इमारती, सततची वाहतूक, दुकानांचा झगमगाट यामुळे परिसरांचे स्वरुप बदलून जाऊ लागले आहे. भटक्या कुत्रे, गाई, बैल किंवा अन्य कोणत्याच प्राण्यांना जागा उरलेली नाही. शिवाय इथले आवाज, रात्री उशिरापर्यंतचे झगझगीत दिवे इत्यादींशी जुळवून घेणे प्राण्यांसाठी कठीण असावे. टेलिफोनच्या तारांमुळे चिमण्यांचे प्रमाण कमी झाल्याचे अभ्यासांमध्ये दिसून आले आहे. मुंबईसारख्या शहरांमध्ये पूर्वी सर्वत्र दिसणारे कावळे आता कमी झाले असून कबुतरांची संख्या प्रचंड वाढली आहे. हाच प्रकार आता छोट्या शहरांमध्ये दिसू लागला आहे. पूर्वी कोकणात घरांच्या आसपास कबुतरे दिसणे हे घडत नव्हते. आता त्यांची संख्या व त्यांच्यामुळे होणारी घाण व रोगराई वाढू लागली आहे. कुत्र्यांच्या बाबतही हेच घडते आहे. प्रचंड वेगाने जाणाऱ्या वा आवाज करीत जाणाऱ्या गाड्या किंवा प्रचंड फटाके वा दिवे यांचा कुत्र्यांवर विपरित परिणाम होत असतो असे प्रयोगांमध्ये आढळून आले आहे. त्यामुळेच अनेक ठिकाणी धावत्या स्कूटर्स वा गाडयांच्या मागे कुत्रे भुंकत पाठलाग करतात असे दृश्य अनेक ठिकाणी दिसते. शहरातील कुत्र्यांना चायनीज गाड्या वा हॉटेलांम धले उरलेले खाद्यपदार्थ दिले जातात. त्यांनीही या कुत्र्यांची चीडचीड वाढते असे काही अभ्यासकांचे म्हणणे आहे. मुद्दा असा की, आधुनिक शहरांमध्ये कुत्री किंवा मांजरे अशा पाळीव प्राण्यांना मोकाट राहण्यासाठी जागा उरलेली नाही. त्यांना तसे सोडले तर ते माणसाच्याच जिवावर उठणारे ठरणार आहे.

## भूतदया घरात ठेवा

इतकी वर्षे आपण भारतीय गाई, बैल, कुत्री, मांजरी, पोपट इतर पशुपक्षी या सर्वांसोबत राहत आलो हे खरे आहे. पण तेव्हा आपण शेतकी संस्कृतीत होतो. शिवाय, तेव्हाही मारकुटी गाय, माजलेला बैल किंवा रेडा यांना वेसण घातली जात होतीच. कुत्रा वेडा झाला तर त्याला मारून टाकले जात होते. न्यायालयाच्या निर्णयानंतर काही लोकांनी लगेच भूतदयेचा मुद्दा उपस्थित केला. पेटासारख्या निव्वळ अडवणूक करणाऱ्या संस्था लगेच पुढे आल्या व त्यांनी न्यायालयाच्या निर्णयावर टीका केली. न्यायालयाचा निर्णय प्रत्यक्षात आणणे शक्य नाही, दिल्लीतले लाखो कुत्रे एका ठिकाणी ठेवायचे तर त्यासाठी पाच ते दहा हजार कोटी रुपये लागतील असे मुद्दे या संस्थांनी उपस्थित केले आहेत. भटक्या गुरांना कोंडवाड्यात ठेवण्याइतके कुत्र्यांचा प्रश्न सोपा नाही हे उघडच आहे. पण याचा अर्थ तो तसाच सोडून देता येत नाही. पेटासारख्या संस्था भटकी कुत्र्यांबाबत फारच कनवाळू असतात. पण रेबीजची इंजेक्शने सर्वत्र पुरेशा प्रमाणात उपलब्ध असावीत किंवा मुळात भटक्या कुत्र्यांनी हल्ले करू नयेत यासाठी काय करता येईल हे सांगत नाहीत. त्यासाठी कधी स्वतः प्रयत्न करीत नाहीत. त्यातूनच आजकाल शहरांमध्ये भटक्या कुत्र्यांना बिस्किटे किंवा पाव चारून पुण्य कमावणाऱ्यांचा सुळसुळाट झाला आहे. असे करू नका असे कोणी सांगू गेल्यास हे लोक त्या भटक्या कुत्र्यांसारखेच अंगावर येतात. या भटक्या कुत्र्यांचा काय त्रास असतो हे दारावर येणारे फेरीवाले, पोस्टमन तसेच वेगवेगळे कुरियरवाले आणि आजकाल ज्यांना गिग वर्कर्स म्हटले जाते असे घरोघरी मोटारसायकलींवरून वस्तू वा पार्सले पोचवणारे तरुण यांना विचारावे. अशांसारखे कोणीही दिसले की ही कुत्री त्यांच्या अंगावर धावून जातात. उंच इमारतीत राहणाऱ्या लोकांना काही वेळेला असे वाटते की, ही भटकी कुत्री आपल्या सोसायटीचे फार चांगले रक्षण करीत आहेत. पण प्रत्यक्षात ही कुत्री हिंसक झालेली असतात व त्यातूनच नंतर ती लोकांना चावू लागतात. वाढत्या शहरीकरणासोबत हे प्रश्न वाढत जाणार आहेत. अशा वेळी आपल्यालाही आधुनिकच व्हावे लागणार आहे. कोणाच्या तरी धर्मश्रध्दांसाठी शहरांमध्ये दाटीवाटीच्या वस्तीमध्ये कबुतरखाने करून कबुतरांना हैदोस घालायला परवानगी देणे हे चालणार नाही. भटक्या कुत्र्यांबाबतही हाच न्याय लागू करायला हवा व दिल्लीतच नव्हे तर सर्व भारतभर याची अंमलबजावणी करायला हवी.

विचार

# आज आचार्य असते तर!

***ज्येष्ठ पत्रकार, साहित्यिक आणि महाराष्ट्र स्वतंत्रतेच्या कार्यातील थोर नेता, अष्टपैलू व्यक्तिमत्त्व असलेले आचार्य अत्रे यांची दि. १३ ऑगस्ट जयंती आहे, त्यानिमित्त त्यांच्या कर्तृत्वाचा थोडक्यात मागोवा घेणारा लेख.***



ले. बाळ सिंगासने

महाराष्ट्र सारस्वताच्या दरबारातील एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व म्हणजे आचार्य अत्रे. लखलखते तेजस्वी अष्टपैलू व्यक्तिमत्त्व म्हणजे आचार्य अत्रे. आचार्य अत्रे म्हणजे महाराष्ट्राच्या काळ्या तांबड्या मातीत जन्मलेले महान आचार्य! आपल्या स्वतःच्या जीवनातील अष्टपैलू आनंदयात्री म्हणजेच आचार्य अत्रे. एक भव्य डौलदार, अनेक पारंब्यांच्या अबाधित वटवृक्ष म्हणजे आचार्य अत्रे. यापुढील हजार वर्षात पुन्हा आचार्य अत्रे जन्मणार नाहीत, इतके अतुलनीय कणखर, रसरशीत माणूस आचार्य अत्रेंसारखा दुसरा कोण असू शकतो का?

ज्या ज्या वेळी आचार्य अत्रे याचं नाव ओठावर येत त्यावेळी माझे ओठ नकळत स्फुरतात आणि उद्गारतो,'आज आचार्य अत्रे असते तर?' काही काही माणसं जन्माला येतानाच आपल्या आयुष्यात असं काही लेणं घेऊन येतात की त्यांच्या कर्तृत्वाचा ठसा दिर्घकाळ जनमानसावर कोरला जातो. आचार्य अत्रे त्यापैकी एक आहेत. मराठी साहित्यात त्यांची आपली नाममुद्रा उमटविली. शिक्षक, कवी, गीतकार, विनोद व पत्रकार म्हणून त्यांची कामगिरी अजोड आहे हे नाकारता येणार नाही. राजकारण, समाजकारण या प्रवाहात त्यांच्या बुद्धीमत्तेचे, चाणाक्षपणाचे अनेक तरंग गतिमान झालेले आपण पाहतो. समाजजीवनाच्या अनेक पात्रांतून ते खळाळत राहिले, प्रवाहाच्या मार्गातील अडथळ्याप्रमाणे त्यांच्या जीवनातील अडथळे, संघर्षमय प्रसंग, त्यांनी सहजच उधळून लावले. महाराष्ट्राचा हा अनमोल हिरा सासवड जवळून वाहणाऱ्या कऱ्हा नदीच्या काठी आठ ऑगस्ट सन १८९८ या दिवशी जन्मला. पुढे भविष्यात त्यांचे कार्य काळ्या दगडावरची पांढरी रेघ ठरली असे मला वाटते. ज्या ज्या वेळी महाराष्ट्रावर संकटे आली तेव्हा आचार्य अत्रे त्यांची लेखणी निखाऱ्यावर चालणारी वाटली.

आज गेल्या दहा-बारा वर्षातील महाराष्ट्रातील सामाजिक, सांस्कृतिक, कला व राजकीय परिस्थिती पाहली. मराठी मनाचे आणि मनगटाचे होऊ लागलेले अवमूल्यन पाहिले. शिक्षणातील सावळा गोंधळ न्याहळला. धार्मिक क्षेत्रातील भेदा-भेदाचे प्रभाव पाहिले. जातीधर्माच्या भिंती दुंभगविण्यासाठी काही नतद्रष्ट नेत्यांचे विचार कानावर पडले की वाटते, आज आचार्य अत्रे हवेच होते. कऱ्हा नदीच्या काठी कोडीतखुर्द (सासवड जवळील गाव) गावाचा हा सुपूत्र बालपणापासूनच पुरंदरच्या ऐतिहासिक किल्ल्याकडे एकटक पाहत असताना मनातच म्हणायचा, 'या पुरंदर सारखं दगड गोट्याचा राकट जीवन लाभलं तर?ऽऽऽ'सासवडच्या एम.ई. एस.वाघिरे हायस्कूलमधून त्यांनी उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. पुणे विद्यापीठाकडून कला शाखेची पदवी संपादन केली. सन १९२८ मध्ये लंडन विद्यापीठातून त्यांनी टी.डी (शिक्षक डिप्लोमा) पूर्ण केला. सुरुवातीस सन १९२३ मध्ये अध्यापन मासिक त्यांनी सुरू केली. सन १९४० मध्ये 'नवयुग' मासिक सुरू केले. त्यांच्या जागरूक लेखन शैलीमुळे त्यांचे नाव सर्वत्र दुमदुमू लागले. मराठी मातीवर उदंड प्रेम करणारे आचार्य अत्रे काहीसे बंडखोर व हजरजबाबी होते. ईश्वरानेच त्यांना अजोड प्रतिभा दिलेली होती. 'उत्कट भव्यतेची घ्यावे! मळमळीत अवघोचि टाकावे' ही त्यांची ध्येय प्रणाली होती. हा लेख मी लिहित असताना सहजच मला त्यांच्याविषयी सूचले ते असं 'मातृभाषेचा अभिमानी आचार्य तूची प्रल्हाद! हास्य सम्राट तू झेंडूच्या फुलातील मधूर नाद! परखड पत्रकारितेतील निर्भिड-निरंकारी नेता तू आज आणि उद्याही लोक म्हणती हजार वर्षात एकची तू ।'

आपल्या आई-वडिलांच्या अतूट व चिवट संस्कार, बालपणापासूनच त्यांनी हृदयावर कोरून ठेवलेले होते. अलौकिक, उत्स्फूर्त, प्रतिभा, दिव्य महत्वाकांक्षा व बेदरकार युक्ती ही त्यांची स्वभाववैशिष्ट्ये होती. वीणाधारिणी सरस्वती जिभेवर विसावलेली होती. ते मिश्किलपणे म्हणत असत 'उत्तम कल्पना म्हणजे फुलपाखरे एकदा का ती हातातून निसटली पुन्हा सापडणे कठीण...।'

मित्र हो, ज्या अत्रेंविषयी आपण शब्दांची कारंजी फुलवितो त्यांची बालपणीची परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. मात्र, प्रतिकूलतेला न जुमानता प्रभावी जीवन जगण्याची त्यांची जिद्द होती. बालपणापासूनच हुशार असल्याने परिश्रमाच्या परिक्रमेतून प्रकाशमय प्रभाव पाडण्याचे सामर्थ्य त्यांच्या मनात होते. वडिल सरकारी नोकरीत असल्याने स्थलांतराची अनुभव ही त्यांना होता. मात्र आई वडिलांचे संस्कार, समाधानी वृत्ती, सृजनशील साधना, सजग स्वभाव या विशिष्ट गुणाने आचार्य अत्रे पुढे उत्तुंग व्यक्तिमत्त्व म्हणून महाराष्ट्रात ओळखले जाऊ लागले. लोकप्रिय कलाकार अशोक हांडे यांचा 'अत्रे-अत्रे-सर्वत्रे' हा कार्यक्रम मराठी माणसाने जरूर पहावा. एक वादळी व्यक्तिमत्त्व परंतु तितक्याच हळव्या मनाचा, विविधरंगी फुलपाखरू म्हणून त्यांच्या स्मृती महाराष्ट्रात आजही जागृत आहेत. पत्रकारितेच्या क्षेत्रातून जिथे अन्याय तिथे कुणाचीही भिडभाड न ठेवता बुलंद आवाज उठविणारे ढोंगा विरुद्ध प्रहार आणि वास्तव सत्याची बाजू मांडणारी त्यांची लेखणी म्हणजे एक अलौकिक चमत्कारच मानावा लागेल. आपल्या अभेद्य, अभ्यासू विनोदी पण परखड वक्तृत्व शैलीतून हास्यकल्लोळात व टाळ्यांच्या गजरात प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करणारे आचार्य अत्रे हे एक बहुरूपी स्वरूपातील अष्टपैलू कलावंतही होते. हे कुणालाही नाकारता येणार नाही. त्यांचे एक राजकीय क्षेत्रातील विडंबन काव्य माझ्या वाचनात आले. 'होळीवर पोळी' या काव्यात ते लिहितात.

**'काय वर्णू भारताची लोकशाही ।**
**स्थान येथे अपयशाला यापुढे कोठेही नाही ।**
**पेटली चोहीकडूनी लोकशाही भारती ।**
**होळीवर या पोळ्या भाजूनी घ्या संप्रती**
**लाठीचा मार खाऊनी, तुरूंग ज्यांनी भोगिला**
**अनंत यातना सहन करूनी**
**भारती तिरंगा फडकविला**
**टाळूवरचे लोणी खाणारे जन्मले याच भारती**
**आता लोकशाहीलाही लाविती सुरुंग**
**आणि म्हणती, आम्हीच राष्ट्रभक्त उत्पांत ऽऽऽ'**
**उत्पात इथे माजला!**

उद्ध्वस्त करण्या संविधान, घाट इथे बांधिती होळीवर या पोळी आपुली भाजूनी घ्या संपत्ती अशी अनेक विडंबन काव्य लिहून समाजातील दांभिकतेवर त्यांनी प्रहार केला. प्रत्येक मराठी माणसाकडे तुकोबाची गाथा असलीच पाहिजे हा त्यांचा आग्रह होता. आचार्य अत्रे एक उत्तम शिक्षण तज्ज्ञ होते. प्राथमिक स्तरावरील बालभारती हे पुस्त क म्हणजे बालमनावरची संजीवनीच म्हणावी लागेल. आचार्य अत्रे यांनी मराठी माणसे, भाषा संस्कृती यावर अपार प्रेम केले. शालेय विद्यार्थ्यांना ते सांगत, बालमित्रांनो, स्वयंशिस्त स्वच्छता, कर्तव्य व प्रामाणिकपणा त्याचबरोबर जबाबदारी ओळखून कष्ट करा, खूप शिका, अभ्यास करा मातृभाषेतून शिक्षण घ्या कारण आपली मराठी भाषा ही आपल्याच जीवनाची आधारशीला आहे. रोज चांगलं असं काहीतरी पाठ करा. ज्ञानाकडे पाठ फिरवू नका. वाचन-चिंतन-मनन हीच यशाची गुरूकिल्ली आहे.

'स्वतंत्र महाराष्ट्राच्या लढ्यात त्यांनी ठणकावून सांगितले, मुंबई गुजरात्यांची आहे. मद्राश्यांची आहे. पारश्यांची आहे.. उत्तर भारतीयांची आहे.. त्यांना वाटते मुंबई चांगली आहे. सुंदर आहे.. आयतीच आपल्याला मिळत आहे. पण लक्षात ठेवा. ही कॉस्मॉपॉलिटन मुंबई तुमचे दहा बाप जन्माला आले तरी तुम्हाला कधीही मिळणार नाही. आमच्या १०७ मराठी शुरांनी रक्त सांडले. हौतात्म्य पत्करले. तेव्हा तुम्ही कुठे होतात?

आचार्य अत्रे यांनी निर्माण केलेल्या चैतन्यमय वातावरणामुळे व सभा संमेलनातून केलेल्या ओजस्वी भाषणांमुळे मराठी मातीचा कण नी कण जागा झाला. सह्याद्रीच्या उंचच उंच कळसूबाईच्या शिखरांवरून. सह्याद्रीच्या दारिगिरींतून एकच हुंकार उमटला 'जय महाराष्ट्र' यामुळे महाराष्ट्र जागा झाला. १०७ मराठी हुतात्मे झाले. आजही आपण त्यांच्या स्मृतींना अभिवादन करीत आहोत. मित्रांनो, यासाठीच मी म्हणतो आज आचार्य त्रे हवे होते. का? कशासाठी? पहा बरं रसिक वाचकहो! गेल्या आठ-दहा वर्षे या महाराष्ट्रात काय चाललंय? तमाम मराठी माणूस संभ्रमात आहे. दांभिक, ढोंगी, भ्रष्टाचारी नेत्याविरूद्ध आपल्या लेखणी-वाणीतून निखारे पेटविले असते. आचार्य अत्रे उत्तम शिक्षक व शिक्षण तज्ज्ञ होते. बालमानसशास्त्राचा त्यांचा अभ्यास होता. मात्र आज एक गोष्टीचा आनंद होतोय. तो याचसाठी पुन्हा मराठी माणूस एकवटला. त्यांनी झुंज दिली. **आचार्य अत्रे यांची नाटके** : साष्टांग नमस्कार, घराबाहेर उद्याचा संसार, मी उभा आहे, पराचा कावळा, वंदेमातरम, भ्रमाचा भोपळा, पाणीग्रहण, जग काय म्हणेल? कवडी चुंबक, गुरूदक्षिणा मी मंत्री झालो. प्रिती संगम, तो मी नव्हेच, डॉ. लागू मोरूची मावशी, लग्नाची बेडी.

**आचार्य अत्रे चित्रपट** : ब्रह्मचारी, धर्मवीर, अर्धांगिनी, लपंडाव, प्रेमवीर, ब्रँडीची बाटली, पायाची दासी, वसंतसेना, मोरूची मावशी, श्यामची आई इत्यादी.

आचार्य अत्रे यांनी जिथे पाऊल टाकले तिथे उत्तुंग झेप घेतली. शेवटी मी इतकेच म्हणेन. **'प्रल्हादचि तू या मातीतील मोती । अखंड राहो तुझीच जगती किर्ती ।।**

चर्चा आजची

# नागरिकांच्या जिवाशी खेळ!




राकेश लोहार

रायगड जिल्ह्यातील जवळपास आठ पूल वर्षानुवर्षे धोकादायक अवस्थेत आहेत. हे प्रशासनाला उशिराने सुचलेले... असेच म्हणावे का? पावसाळ्यानंतरचे आठ महिने प्रशासन काय करत होते, हा मोठा प्रश्न आहे. ऐन पावसाळ्यात पूल धोकादायक असल्याचे सांगणे, म्हणजे जबाबदारी झटकण्यासारखेच म्हणावे लागेल. कारण, एखादा अपघात झालाच तर, प्रशासन हात वर करायला मोकळे, की आम्ही आधीच सांगितलेय, पूल धोकादायक आहेत ते! इथे प्रश्न पडतो, आधीच म्हणजे कधी? पावसाळा सुरू होऊन दोन महिने झाल्यावर? इतके आपले प्रशासन सतर्क झालेय? व्हिजना कन्सल्टींग इंजिनिअरिंग प्रा. लि.ने आपल्या स्ट्रक्चरल ऑडिटमध्ये अलिबाग-रोहा, अलिबाग-रेवदंडा, पोयनाड-उसर-भादाणे आणि भाकरवड-देहेन या मार्गावरील आठ पूल अत्यंत दुर्बल स्थितीत असल्याचे स्पष्ट केले आहे. मग एवढ्या वर्षात पुलांची तपासणी, डागडुजी, मजबुतीकरण यासाठी काहीच केले नाही, याचेच आश्चर्य वाटते. आता आपला कारभार आपल्याच गळ्याशी येतोय, हे लक्षात आल्यावर या पुलांवरुन अवजड वाहनांची वाहतूक थांबविण्याचे आदेश जिल्हा प्रशासनाने दिले आहेत. मग इतके दिवस प्रशासन काय करीत होते? हा प्रश्न सर्वसामान्यांना पडला आहे. त्यातच आता मागील दोन आठवड्यांपूर्वी जिल्हाधिकाऱ्यांनी ज्या पुलांवरुन अवजड वाहतूक बंदीचे आदेश दिले होते, त्यातील सहाण पुलावरुन बिनदिक्कत प्रवासी वाहतूक करुन नागरिकांच्या जिवाशी खेळ सुरू केला आहे, असे संतापाने म्हणावे लागेल.

सद्यःस्थितीत अलिबाग-रेवदंडा मार्गावरील सहाण पूल कमकुवत असून, अवजड वाहतुकीसाठी बंद असल्याचे सूचना फलकही लावण्यात आले आहे. परंतु, आता पुन्हा हाच पूल मजबूत झाल्याचा जणू साक्षात्कारच झाला की काय प्रशासनाला! याच पुलावरुन सोमवारपासून राज्य परिवहन महामंडळाची एसटी बस म्हणजे तुमची-आमची सर्वांची लालपरी प्रवाशांना घेऊन प्रवास करीत आहे. कारण काय, तर बेलीजवळील पूल म्हणे धोकादायक झालाय! असा अहवालच कंपनीने दिला असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे. त्यामुळे पुन्हा एकदा प्रश्न पडतो, पावसाळ्यानंतर आठ महिने प्रशासन काय करत होते? ऐन पावसाळ्यात आणि सणासुदीच्या काळात अशा प्रकारे प्रवासी वाहतुकीचा सावळागोंधळ समोर आल्याने प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उभे ठाकले आहे.

दरम्यान, अलिबाग-रोहा मार्गावरील रामराज पूल, सुडकोली पूल, अलिबाग-रेवदंडा मार्गावरील सहाण पूल, नवेदर बेली पूल, पोयनाड-देहन मार्गावरील देहेन पूल या मार्गावरील अवजड वाहतूक बंदीचे आदेश प्रशासनाने काढून सूचनाफलकदेखील लावले आहेत. परंतु, आजतागायत या पुलांवरील अवजड वाहतूक बंद झाली का? झाली असेल तर ठीकच! परंतु, ती सुरू असल्यास त्याची जबाबदारी कुणाची? कारण, सहाण बायपासवरील पाल्हे पुलावरुन आजही दिवसाढवळ्या प्रशासनाच्या नाकावर टिच्चून अवजड वाहतूक सुरू आहे. परंतु, प्रशासनाकडून कोणतीही कारवाई झालेली नाही, त्यामुळे अवजड वाहतूक करणाऱ्या चालकांची मुजोरी आणखीनच वाढली आहे, असेच म्हणावे लागेल.

ज्या पुलांवरुन अवजड वाहतूक बंद करण्यात आलेय, त्याच पुलांवरुन आज एसटी बसेस सुरू आहेत. हा जीव धोक्यात घालणारा प्रवास कशासाठी? यातूनच जर मोठा अपघात झाल्यास, त्याला जबाबदार कोण? हे प्रश्न आज आ वासून उभे असताना, प्रशासन मात्र सूचनफलक लावून मोकळे झालेय. गेली कित्येक वर्षे पुलांचा प्रश्न तसाच आहे. याकडे गांभीर्याने पाहण्यास वेळच मिळत नाही का? प्रशासनाला निष्पापांचा जीव घेतल्याशिवाय जाग येणार नाही? आगामी काळ हा सण-उत्सवांचा आहे. त्यामुळे या मार्गांवरील वाहतुकीत वाढ होणार आहे. गणेशोत्सवात तर हजारोंच्या संख्येने चाकरमानी याच मार्गांवरुन प्रवास करणार आहेत. त्यामुळे वाहनांची वर्दळ वाढणार आहे. अशा वेळी बाहेरुन येणाऱ्या प्रवाशांनी याच प्रशासनाच्या भरवशावर प्रवास करावा का? हाही एक प्रश्न आहे. कारण, प्रशासनाला जनतेची काळजी असती तर आता जाग आली नसती. वेळीच या पुलांचे काम करुन ते वाहतुकीस सुरक्षित केले असते. पण, आपल्या तसे होत नाही, हेच खरे. एखादी दुर्घटना घडल्याशिवाय कामे होतच नाही, हे दुर्दैव म्हणावे लागेल. पण, या दुर्घटनेत निष्पापांना जीव गमवावा लागू नये, एवढीच अपेक्षा! जिल्हा प्रशासनाने वेळीच जागे व्हावे, आणि पर्यायी मार्ग सांगितले आहेत, ते तरी सुरक्षित आहेत का, ते पाहावे. नाहीतर सण-उत्सवांसाठी येणाऱ्या चाकरमान्यांच्या तसेच स्थानिकांच्या आनंदावर विरजण पडण्यास वेळ लागणार नाही. त्यामुळे कोणतीही दुर्घटना होण्याआधी यावर ठोस उपाययोजना करुन मार्ग काढावा. त्यामुळे सर्वांचाच प्रवास सुखाचा आणि आनंदा होईल, एवढे मात्र निश्चित!

लोकसंसद

# ध्वजसंहितेचे पालन करून घरोघरी तिरंगा फडकवावा!

यावर्षी आपण ७९ वा भारतीय स्वातंत्र्य दिन साजरा करीत आहोत. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला इंग्रजांच्या गुलामीतून स्वातंत्र्य मिळाले त्या घटनेला आज ७८ वर्ष पूर्ण झाली आहेत. अर्थात हे स्वातंत्र्य आपल्याला सहजासहजी मिळाले नाही हे स्वातंत्र्य मिळवण्यासाठी अनेकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली कित्येकांना तुरुंगवास भोगावा लागला. हजारो, लाखो क्रांतिकरांकांच्या, स्वातंत्र्य सैनिकांच्या त्यागातून आपल्याला हे स्वातंत्र्य मिळाले आहे. या हजारो, लाखो ज्ञात- अज्ञात क्रांतिकारकांच्या, स्वातंत्र्य सैनिकांच्या कार्याची ओळख आजच्या पिढीला व्हावी व त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन आजच्या तरुण पिढीनेही देशकार्यासाठी पुढे यावे या उद्देशाने देशभर स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव उत्साहात साजरा करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव कार्यक्रमांतर्गत अनेक उपक्रमांचे आयोजन सरकारने केले आहे. त्याचाच एक भाग म्हणून आजपासून म्हणजे १३ ऑगस्टपासून १५ ऑगस्ट पर्यंत घरोघरी तिरंगा हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमाअंतर्गत भारताच्या ध्वज संहितेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करून भारताच्या नागरिकांना आपल्या घरी ध्वज फडकविण्याची परवानगी देण्यात आली. या दिवशी देशातील नागरिकांनी आपल्या घरावर तिरंगा ध्वज अभिमानाने फडकवावा असे आव्हान सरकारतर्फे करण्यात आले आहे. घरोघरी तिरंगा या उपक्रमाची जनजागृती व्हावी यासाठी देशभर विविध कार्यक्रम चालू आहेत. तिरंगा हा आपला राष्ट्रध्वज आहे. १३, १४ आणि १५ या तीन दिवशी सर्व नागरिकांनी आपल्या घरावर तिरंगा अभिमानाने फडकवावा आणि तिरंग्याला मानवंदना द्यावी. घरोघरी तिरंगा फडकवताना ध्वज संहितेचे काटेकोरपणे पालन करावे. ध्वज फडकवताना ध्वजाचा कुठल्याही प्रकारे अवमान होणार नाही याची काळजी नागरिकांनी घ्यावी. पूर्वी ध्वज तयार करण्यासाठी हाताने विणलेले किंवा कातलेले कापड वापरले जाई आता यंत्रावर तयार केलेले कापड देखील तयार करण्यास परवानगी देण्यात आली आहे मात्र हा कापडी तिरंगा ध्वज, चुरगळलेला, फाटलेला, किंवा खराब झालेला नसावा. तिरंगा ध्वज फडकवताना तिरंग्यापेक्षा जास्त उंचीवर किंवा शेजारी दुसरा कोणताही ध्वज फडकवू नये. एकाच ध्वजारोहणाच्या खांबावरती तिरंग्या सोबत दुसरा कोणताही ध्वज फडकवू नये. तिरंगा उंचावरच फडकावा. तिरंगा फडकवल्यानंतर तो खाली पडणार नाही याची काळजी घ्यावी. ध्वज उतरवताना देखील ध्वज संहितेचा मान राखावा. सन्मानपूर्वक ध्वज उतरावा. कुठल्याही परिस्थितीत तिरंग्याचा अवमान होणार नाही याची काळजी नागरिकांनी घ्यावी कारण तिरंगा हे आपले राष्ट्रीय प्रतीक आहे तिरंग्याला अपमान म्हणजे देशाचा अपमान. **– श्याम ठाणेदार, पुणे**

दिनविशेष

# अण्णाभाऊ साठे- लोकशाहीर यांचा जन्म

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे नाव तुकाराम भाऊराव साठे आहे. हे एक मराठी समाजसुधारक, लोककवी आणि लेखक होते. त्यांचे लेखन सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या कृतिशीलतेवर आधारलेले होते. ते मार्क्सवादी-आंबेडकरवादी विचारांचे होते. यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी महाराष्ट्राच्या सांगली जिल्ह्यातील वाटेगाव येथे मांग जातीत झाला त्यांच्या वडिलांचे नाव भाऊराव आणि आईचे नाव वालबाई होते. जातीय भेदभावामुळे त्यांना शिक्षण घेता आले नाही. अण्णाभाऊंनी दोन विवाह केले. त्यांची पहिली पत्नी कोंडाबाई साठे आणि दुसरी पत्नी जयवंता साठे होत्या. त्यांना तीन अपत्ये होती. एका मागासलेल्या जातीत त्यांचा जन्म झाला होता. त्यामुळे शाळेच्या पहिल्याच दिवशी त्यांना उच्च वर्णीयांच्या अपमानास्पद वागणुकीला सामोरे जावे लागले. त्यामुळे शाळेच्या दुसऱ्याच दिवशी त्यांनी शाळा सोडली. त्यापुढे कधीही न शिकलेल्या अण्णाभाऊ साठेंनी साहित्य आणि लोकसंगीताच्या माध्यमातून समाजसुधारणेचे कार्य केले. शाहीर म्हणून परिचित असलेले अण्णाभाऊ साठे यांनी कथा आणि कादंबरी या साहित्यप्रकारातही वेगळा ठसा उमटवला. मराठी भाषेत शाहीर साठे यांनी ३५ कादंबऱ्या लिहिल्या. १९५९ मध्ये त्यांनी लिहिलेल्या फकिरा या कादंबरीला १९६१ मध्ये राज्य सरकारचा उत्कृष्ट कादंबरीचा पुरस्कार मिळाला. तत्कालीन ज्येष्ठ साहित्यिक वि.स. खांडेकर यांनीही शाहीर साठे यांच्या फकिरा या कादंबरीचे कौतुक केले. शाहीर अण्णाभाऊ साठे लिखित १५ लघु कथासंग्रह विविध भारतीय भाषांमध्ये भाषांतरित करण्यात आलेले आहेत. शाहीर साठे यांनी २१ कथासंग्रह आणि ३० पेक्षा अधिक कादंबऱ्या लिहिल्या. कादंबरी, लघुकथांप्रमाणेच साठे यांनी नाटकं, पटकथा आणि पोवाडा अशा विविध साहित्यप्रकारांतही लेखन केले आहे. विविध साहित्य प्रकार हाताळताना त्यांनी सामान्य कष्टकरी जनतेला जागृत करण्याचे कार्य केले. अण्णाभाऊ साठे यांचे पोवाडे केवळ भारतातच नाहीत तर परदेशातही गाजले. पोवाड्यांच्या माध्यमातून छत्रपती शिवरायांचे चरित्र शाहीर साठे यांनी रशियापर्यंत पोहोचवले. रशियाच्या तत्कालीन राष्ट्राध्यक्षांनीही शाहीर साठे यांचा सन्मान केला. एवढेच नाही तर रशियन भाषेतही पोवाड्यांचे भाषांतर झाले. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्यानंतरच्या काळात राजकीय प्रश्नांविषयी महाराष्ट्रात त्यांनी मोठी जागृती केली. त्यात संयुक्त महाराष्ट्र चळवळ, गोवा मुक्ती संग्राम या चळवळींमध्ये त्यांनी शाहिरीतून दिलेले योगदान महत्त्वाचे आहे. 'फकिरा'मध्ये अण्णाभाऊ साठे यांनी भीषण दुष्काळात ब्रिटिशांचे खजिने, धान्य लुटून गरिब, तळागाळातील जनतेला वाटप करणाऱ्या फकिरा या पीडित समाजातील लढाऊ तरुणाचे चित्रण आहे. 'माकडीचा माळ' या कादंबरीत त्यांनी भटक्या-विमुक्त समाजाच्या जीवनपद्धतीचे चित्रण केले आहे. तर 'वैजयंता' या कादंबरीत तमाशात काम करणाऱ्या कलावंत स्त्रियांच्या शोषणाचे चित्रण केले आहे. १९४४ रोजी त्यांनी लाल बावटा पथक स्थापन केले. देशाच्या स्वातंत्र्यानंतर दुसऱ्याच दिवशी म्हणजे १६ ऑगस्ट १९४७ रोजी अण्णाभाऊ साठे यांनी मुंबईमध्ये २० हजार लोकांचा मोर्चा काढला. यावेळी शिवाजी पार्कमध्ये शाहीर अण्णाभाऊ साठे यांनी मुसळधार पावसातही माघार न घेता 'ये आझादी झूठी है, देश की जनता भूखी है!' अशी घोषणा देत राहिले. भारतीय कम्युनिस्ट पक्षाची सांस्कृतिक शाखा असलेल्या इंडियन पीपल्स थिएटर असोसिएशनमध्ये अण्णाभाऊ साठे हे महत्त्वाचे सदस्य होते.

निरक्षर असूनही लोकसाहित्याच्या माध्यमातून समाजातील तळागाळातील लोकांना जागृत करण्याचे महान करणाऱ्या शाहीर अण्णाभाऊ साठे यांनी १८ जुलै १९६९ रोजी जगाचा निरोप घेतला.

# आरोग्य स्वयंसेविकांचा एल्गार

## ● निवडणुकीचे काम करण्यास नकार

| मुंबई | प्रतिनिधी |

एकीकडे मुंबईत हिवताप आणि डेंग्युच्या साथीचा मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव झालेला असताना सार्वजनिक आरोग्य सेवेचा कणा बनलेल्या आरोग्य स्वयंसेविकांवर मुंबई महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीच्या कामाची जबाबदारी सोपविण्याचा घाट घालण्यात आला आहे. तर दुसरीकडे उच्च न्यायालयाने आरोग्य स्वयंसेविकांच्या बाजूने दिलेल्या निर्णयानुसार त्यांना महापालिकेच्या सेवेत कायम करण्याऐवजी प्रशासनाने याप्रकरणी सर्वेच्च न्यायालयात धाव घेतली आहे. यामुळे संतप्त झालेल्या तब्बल तीन हजारांहून अधिक आरोग्य स्वयंसेविकांनी मुंबई महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीचे काम करण्यास नकार दिला आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य सेवेचा प्रचार आणि प्रसार करण्याची जबाबदारी आरोग्य स्वयंसेविकांवर आहे. साथीच्या आजारांचा प्रदुर्भाव वाढू नये यासाठी वस्त्यांमधील घरोघरी जाऊन जनजागृती करणे, गरोदर माता, ० ते पाच वर्षांच्या बालकांनी इंजेक्शन घेतली की नाही याची चौकशी करणे, त्यांच्यासाठी आरोग्य शिबिराचे आयोजन करणे, क्षय रुग्णांचा शोध घेऊन ते औषधोपचार घेतात की नाही यावर लक्ष ठेवणे, कुटुंब नियोजनासाठी प्रचार-प्रसार करणे, त्याबाबतच्या साहित्याचा वापर करणे, ७० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना पंतप्रधान आयुष्यमान कार्ड काढून देणे आदी विविध कामांची जबाबदारी आरोग्य स्वयंसेविकांवर सोपविण्यात आली आहे.



गेल्या काही दिवसांपासून मुंबईत मोठ्या प्रमाणात हिवताप आणि डेंग्युच्या साथीचा प्रादुर्भाव होत असून रुग्ण संख्येत वाढ होत आहे. त्यामुळे साथीच्या आजारांविषयी जनजागृती करणे, कोणती काळजी घ्यावी याची माहिती देणे, डासांचा प्रादुर्भाव होत असलेल्या, तसेच डासांची उत्पत्ती स्थाने शोधणे आदी काम करण्यात आरोग्य स्वयंसेविका व्यग्र आहेत. एकूणच आरोग्य स्वयंसेविका मुंबई महापालिकेच्या आरोग्य सेवेचा कणा बनल्या आहेत.

आरोग्य सेविकांवर मुंबई महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीचे काम सोपविण्याचा घाट घालण्यात आला आहे. मात्र कामगार न्यायालय आणि मुंबई उच्च न्यायालयाने आदेश देऊनही प्रशासनाने आरोग्य स्वयंसेविकांना महापालिकेच्या सेवेत सामावून घेतलेले नाही. उलटपक्षी याप्रकरणी प्रशासनाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. यामुळे आरोग्य स्वयंसेविकांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे. महापालिकेकडून आरोग्य स्वयंसेविकांना मासिक १४ हजार रुपये मानधन देण्यात येते. महापालिकेच्या कायम स्वरुपी कर्मचाऱ्यांइतकेच काम आरोग्य स्वयंसेविका करतात, मात्र निवृत्तीनंतर त्यांना कोणतेही लाभ मिळत नाहीत. महापालिकेकडून कायम सापत्न वागणूक मिळत असल्याने संतप्त झालेल्या आरोग्य स्वयंसेविकांनी निवडणुकीचे काम न करण्याचा निर्णय घेतला आहे.

### नेमणूक पत्र घेण्यास बळजबरी

निवडणुकीचे काम न केल्यास कारवाई करण्याचा इशारा प्रशासनाकडून दिला जात आहे. एकीकडे आरोग्य स्वयंसेविका महापालिकेच्या कर्मचारी नाहीत, तर मग त्यांच्यावर कारवाई कशी करणार, असा मुद्दा मुंबई मनपा आरोग्यसेवा कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष ॲड. प्रकाश देवदास यांनी उपस्थित केला आहे. आरोग्य स्वयंसेविकांना निवडणुकीचे काम करण्याबाबतचे नेमणूक पत्र घेण्यास महापालिका अधिकारी बळजबरी करीत आहेत, असा आरोप ॲड. देवदास यांनी केला आहे. याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयात याचिका करण्यात येईल, असा इशारा त्यानी दिला आहे.

## पद्मावती भागात जुगार अड्ड्यावर छापा

**पुणे** : पद्मावती भागात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर सहकारनगर पोलिसांनी कारवाईत करत भारतीय जनता पक्षाच्या पर्वती मतदारसंघाच्या पदाधिकाऱ्यांसह सहा जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले. पद्मावती भागात जुगार अड्डा सुरू असल्याची माहिती सहकारनगर पोलिसांच्या पथकाला सोमवारी (दि. ११) रात्री मिळाली होती. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने तेथे छापा टाकला असता पोलिसांनी भारतीय जनता पक्षाच्या पर्वती विधानसभा मतदारसंघाचे सरचिटणीस, तसेच पाच ते सहा जणांना पत्ते खेळताना पकडले. तसेच तेथून पत्ते, रोकड, तसेच अन्य साहित्य जप्त केले. जुगार अड्ड्यावर भाजपच्या पर्वती मतदारसंघातील पदाधिकाऱ्याला पकडल्यानंतर राजकीय वर्तुळात खळबळ उडाली. याप्रकरणी महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१३ ऑगस्ट

१)श्री. दिनानाथ मसणाजी पाटील मु.बहिरीचापाडा, अलिबाग, १३-८-१९३६

२)श्रीम.आशा गजानन पाटील नागडोंगरी, अलिबाग १३-८-१९४८

३)श्री.विजय वसंत लेले मु.कुरूळ, अलिबाग १३-८-१९५४

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन





अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

### आजचे अन्नदाते




**सौ. शीला विलास नाईक, वाढदिवस, कोपर आळी, नागाव, अलिबाग**

**कै सुभाषचंद्र भगवान मोरे, २ रा स्मृतिदिन, खोपोली**



**चि.अनामय सौरभ पाटील, वाढदिवस, चेढरे, अलिबाग**

## सुवर्णकण



प्रेमभाव, सेवाभाव आणि भक्तीभाव ही भावत्रयी सद्गुरूंना शिष्यांकडून अपेक्षित असते.

**श्रीज्ञानेश्वर भावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम,**
**दातार आळी,**
**पेण.**

# पेढा खाल्ल्याने ११ महिलांना विषबाधा

| गुहागर | प्रतिनिधी |

गुहागर तालुक्यातील शृंगारतळी येथील अय्यंगार बेकरीमधून आणलेल्या पेढा खाल्ल्याने वेदांत ज्वेलरीमध्ये काम करणाऱ्या ११ महिलांना विषबाधा झाली. त्यांना तात्काळ शृंगारतळीतील प्रो लाईट हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे.


शृंगारतळी येथील घटना

शृंगारतळी येथील ग्रामपंचायत पाटपन्हाळेच्या पाठीमागे एका इमारतीत वेदांत ज्वेलरीचे मालक बळीराम साळवी रा. मळण यांनी महिलांच्या हाताला काम मिळावे म्हणून मुंबईहून ज्वेलरीचे मटेरियल आणून काम देत होते. श्रावण महिना असल्याने एका महिलेने सकाळी ११ च्या सुमारास अय्यंगार बेकरी येथून पेढे आणले आणि महिलांना दिले. काही वेळाने येथील महिलांना चक्कर व उलटी होण्यास सुरुवात झाली. त्यांना त्वरित प्रो लाईट हॉस्पिटल शृंगारतळी येथे दाखल करण्यात आले. यामध्ये स्वप्नाली पवार, प्रतीक्षा मोहिते, पूजा मोहिते, वृषाली पवार, विदिशा कदम, सोनाली नाईक, मधुरा घाणेकर, निकिता गमरे, प्रिया मोहिते, संजना गिरी, व मानसी शिगवण या महिलांचा समावेश आहे. या सर्व महिला राहणार तळवली मळण पालपेणेमधील आहेत.

या महिलांनी श्रावणी सोमवारचा प्रसाद म्हणून अर्धा-अर्धा पेढा खाल्ला व काही वेळातच त्यांना चक्कर व उलट्या होण्यास सुरुवात झाली. या ठिकाणी उपस्थित असलेले डॉ. राहुल चव्हाण यांच्याशी संपर्क साधला असता सर्व महिलांची प्रकृती चांगली असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी आरोग्य विभागाच्या चिखली प्राथमिक आरोग्य केंद्राच्या डॉ. वाडकर यांनी त्वरित भेट दिली. तर गुहागर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सचिन सावंत व त्यांच्या टीमने येऊन पंचनामा केला. शृंगारतळीत अनेक बेकऱ्या असून या बेकऱ्यांवर कोणाचाही वचक राहिलेला नाही. अन्न व प्रशासन विभाग याकडे डोळेझाक का करते? असे जनतेतून बोलले जात आहे.

## आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण

| चिपळूण | प्रतिनिधी|

चिपळूण येथील नवकोंकण एज्युकेशन सोसायटीच्या डीबीजे कनिष्ठ महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना विभागाच्या वतीने एनडीआरएफ पुणे ०५ बटालियन मार्फत टीम कमांडर जी. बी. प्रमोद रॉय यांच्या नेतृत्वाखालील टीम तर्फे आपत्ती व्यवस्थापनाचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन करण्यात आले.
या प्रशिक्षणात एनडीआरएफ पथकाच्या जवानांनी नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तीच्या वेळी घ्यावयाच्या दक्षता, उपाययोजना तात्काळ प्रतिसाद व सुरक्षिततेच्या विविध पद्धतीने बाबत सविस्तर माहिती दिली.

## शिंदेसेनेच्या बैठकीत दोन गटात राडा

### ●अहिल्यानगरचे पदाधिकारी भिडले

| नाशिक | प्रतिनिधी |

शिवसेना शिंदे गटाच्या उत्तर महाराष्ट्रातील पदाधिकारी बैठकीत सोमवारी जोरदार राडा पाहायला मिळाला. अहिल्यानगर जिल्ह्याचा आढावा पूर्ण झाल्यानंतर पक्षातील दोन गटांमध्ये वाद विकोपाला गेला आणि पदाधिकाऱ्यांनी एकमेकांची कॉलर पकडत शिवीगाळ करण्यापर्यंत मजल गेली. शरद पवारांच्या राष्ट्रवादीचा पदाधिकारी बैठकीत शिरल्याचा आरोप झाल्यानंतर वादाला तोंड फुटले.

मिळालेल्या माहितीनुसार, शिवसेना शिंदे गटाच्या उत्तर महाराष्ट्रातील पदाधिकारी बैठकीचे हॉटेल एक्स्प्रेस इन येथे आयोजन करण्यात आले होते. बैठकीसाठी मंत्री उदय सामंत, दादा भुसे, माजी खासदार राहुल शेवाळे आदी उपस्थित होते. अहिल्यानगरचे शहरप्रमुख सचिन जाधव आणि बाबू शेठ यांच्यात राडा झाल्याची माहिती मिळत आहे. बैठकीत शरद पवारांच्या राष्ट्रवादीचा पदाधिकारी आल्याने वाद झाला. पदाधिकाऱ्यांनी एकमेकांची कॉलर पकडत शिवीगाळ केली. घटनास्थळी उपस्थित पोलीस आणि सुरक्षा रक्षकांनी तातडीने हस्तक्षेप करत वाद शांत केला. पोलिसांनी राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्याला बाहेर नेले. हा पदाधिकारी बैठकीत कसा आला, याची माहिती मिळू शकली नाही. मात्र, या घटनेची शहरभर जोरदार चर्चा आहे.

# अनधिकृत बांधकामांना सरकारचे संरक्षण

## दंड माफ करून राजकीय फायदा

| ठाणे | प्रतिनिधी |

ठाण्यातील अनधिकृत बांधकामांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनातही ठाण्यातील बेकायदा बांधकामांच्या विषयावर जोरदार चर्चा झाली होती, मात्र तरीही ठाणे महापालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांवरील दंड माफ करण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नगरविकास विभागाने घेतला आहे. या निर्णयामुळे सरकारचे २०० कोटी रुपयांहून अधिक आर्थिक नुकसान होणार आहे. महापालिका निवडणुकांच्या तोंडावर सरकारने अनधिकृत बांधकामाला संरक्षणच दिल्याचे बोलले जात आहे.

या निर्णयानुसार महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ कलम २६७ अ अन्वये ठाणे महापालिका क्षेत्रात आकारण्यात आलेली ३१ मार्च २०२५ पर्यंतचा थकीत दंड माफ होणार आहे. मात्र, त्यासाठी सरकारने अटी आणि शर्ती घालून दिल्या आहेत. बेकायदा बांधकाम असलेल्या मालमत्ताधारकांनी मूळ कराची भरणा करणे आवश्यक राहील. त्यानंतरच थकीत दंड माफ होईल. अवैध बांधकाम दंड माफ झाला म्हणजे सदरचे बांधकाम नियमित झाले असे समजण्यात येणार नाही. दंड माफ केला म्हणून त्यापोटी संबंधित महापालिकेस राज्य सरकारकडून कोणतेही अर्थसहाय्य अथवा नुकसानभरपाईची मागणी करता येणार नाही, असे शासन निर्णयात म्हटले आहे.

दरम्यान, महापालिका निवडणुकीचे पडघम वाजू लागले असताना एकनाथ शिंदे यांनी ठाणे महापालिकेकडून आकारण्यात येणारा दंड माफ करून राजकीय फायदा घेतला आहे. परंतु यामुळे सरकारी तिजोरीचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होणार आहे.

# वाहतूक कोंडीमुळे महिलेने गमावला जीव

| ठाणे | प्रतिनिधी |

गायमुख येथील वाहतूक कोंडीमुळे एका महिलेला रुग्णवाहिकेमध्ये अखेरचा श्वास घ्यावा लागला. या घटनेमुळे मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक कोंडीची समस्या ऐरणीवर आली आहे.



छाया पुरव (गुरव) असे या महिलेचे नाव असून त्या पालघर तालुक्यामधील सफाळे येथील मधुकर नगरमध्ये आल्या होत्या. छाया पुरव या मूळच्या सफाळ्याच्या असून मुंबईतील माहीम कोळीवाडा येथे वास्तव्यास होत्या. पालघर जिल्हा परिषदेची शाळा आणि घराजवळ झाडांच्या फांद्या कापण्याचे काम सुरू होते. यावेळी अचानक झाडाची फांदी कोसळून त्या गंभीर जखमी झाल्या. त्यांना सुरुवातीला पालघरमध्ये उपचारासाठी नेण्यात आले होते. मात्र, त्यांची प्रकृती गंभीर होत असल्याने कुटुंबीयांनी त्यांना माहीममधील हिंदुजा रुग्णालयात हलविण्याचा निर्णय घेतला.

मुंबईकडे जाताना घोडबंदर महामार्गावरील दुरुस्ती कामामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती. त्यामुळे छाया पुरव असलेल्या रुग्णवाहिकेला अपेक्षेपेक्षा जास्त वेळ लागला. वास्तविक हे अंतर १०० किलोमीटर असून त्यासाठी अडीच तास लागतात. मात्र, प्रचंड वाहतुकीमुळे तीन तासांत रुग्णवाहिकेने निम्मेच अंतर पार केले होते. त्यातच त्यांना दिलेल्या अनेस्थेशियाचा प्रभाव कमी होऊ लागल्याने त्यांना प्रचंड त्रास होऊ लागला होता. अखेरीस छाया पुरव यांच्या पतीने त्यांना मिरा रोडमधील ऑर्बिट हॉस्पिटलमध्ये दाखल केले. मात्र, उपचार सुरू होण्याआधीच डॉक्टरांनी छाया पुरव यांना मृत घोषित केले.

रुग्णवाहिका वेळेत इस्पितळात पोहोचली असती, तर छाया पुरव यांचे प्राण कदाचित वाचले असते. या घटनेमुळे महामार्गावरील दुरुस्ती आणि वाहतूक व्यवस्थापनावरील प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## पिंजण यंत्रात अडकून महिलेचा मृत्यू

| नागपूर | प्रतिनिधी |

कोतवाली ठाण्यांतर्गत नबाबपुरा येथे भारत गादी हाउस नावाचे दुकान आहे. या दुकानात कल्पना रूपचंद कामडी (वय ४०, रा. जुनी मंगळवारी) या कामाला होत्या. रविवारी (दि. १०) दुपारच्या सुमारास कल्पना पिंजण मशीनवर कापूस वेगळे करीत गादी शिवणाऱ्या कामगारासोबत बोलत होत्या. अचानक कल्पना यांची ओढणी यंत्राच्या चाकात आली. त्यामुळे त्या यंत्रात ओढल्या गेल्या. त्यांचे केस आणि डोकेही यंत्रात अडकले आणि त्यांचा मृत्यू झाला. याबाबत माहिती मिळताच कोतवाली पोलीस घटनास्थळी दाखल झाले होते.

## इलेक्ट्रिक बसची कारला धडक

### महिलेचा जागीच मृत्यू

| मुंबई | प्रतिनिधी |

मुंबईत सह्याद्री राज्य अतिथीगृहाजवळ बेस्टच्या इलेक्ट्रिक बसने रस्त्यावर उभ्या असणाऱ्या कारला मागून जोराची धडक दिली. यात बस आणि कारच्या मधे असणाऱ्या महिलेचा जागीच मृत्यू झाला.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, बेस्टची इलेक्ट्रिक बस सह्याद्री अथितीगृहासमोरून निघाली होती. त्यावेळी चालकाचे बसवरील नियंत्रण सुटले. यानंतर बस रस्त्याच्या कडेला उभ्या असणाऱ्या कारवर आदळली. यावेळी कारच्या शेजारी महिला उभी होती. बस महिलेच्या अंगावर आल्याने महिला बस आणि कारच्या मधे चिरडली गेली. इलेक्ट्रिक बस आणि कारच्या मधे चिरडून महिलेच्या शरिराच्या काही भागाचा चुराडा झाला. घटनेतील मृत महिला दक्षिण मुंबईतली रहिवासी असून ती मॉर्निंग वॉकसाठी आली असल्याची माहिती मिळत आहे.

# रक्षाबंधननिमित्त प्रवासी बंधूंकडून एसटीला १३७ कोटींची ओवाळणी

| मुंबई | प्रतिनिधी |

यंदा रक्षाबंधन आणि त्याला जोडून आलेल्या सुट्ट्यांमुळे ८ ते ११ ऑगस्ट या चार दिवसांमध्ये प्रवाशांनी तुडुंब भरलेल्या एसटीमधून महामंडळाला १३७.३७ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. विशेष म्हणजे ११ ऑगस्टला एका दिवशी तब्बल ३९ कोटी रुपयांचे उत्पन्न महामंडळाला प्रवासी वाहतुकीतून मिळाले आहे. यंदाच्या आर्थिक वर्षातील हे विक्रमी उत्पन्न आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्री सरनाईक म्हणाले की, दरवर्षी एसटीला रक्षाबंधन आणि भाऊबीज (दिवाळी) या दोन दिवसात विक्रमी उत्पन्न मिळत असते. कारण, या दिवशी भाऊ बहिणीकडे किंवा बहिण भावाकडे असे प्रवासी दळणवळण मोठ्या प्रमाणामध्ये होते. परिणामी गेली कित्येक वर्ष रक्षाबंधनच्या सणाच्या कालावधी एसटीला त्या वर्षातील विक्रमी उत्पन्न मिळत आले आहे.



यंदा रक्षाबंधन आणि त्याच्या दुसऱ्या दिवशी एसटीला प्रवाशांची प्रचंड गर्दी झाली होती. रक्षाबंधनच्या आदल्या दिवशी म्हणजे शुक्रवारी ३०.०६ कोटी रुपये, रक्षाबंधन दिवशी म्हणजे शनिवारी ३४.८६ कोटी व दुसऱ्या दिवशी म्हणजे रविवारी ३३.३६ कोटी रुपये तर सोमवारी तब्बल ३९.९ कोटी इतके विक्रमी उत्पन्न एसटीला मिळाले. रक्षाबंधन सणाच्या निमित्ताने ८-११ ऑगस्ट या ४ दिवसात १ कोटी ९३ लाख प्रवाशांनी एसटीमधून सुरक्षित प्रवास केला आहे. त्यामध्ये महिला प्रवाशांची संख्या तब्बल ८८ लाख आहे.

रक्षाबंधन सणानिमित्त एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रवाशांनी दिलेल्या प्रतिसादाबद्दल एसटी महामंडळाचे अध्यक्ष व परिवहन मंत्री श्री. प्रताप सरनाईक यांनी आभार मानले आहेत. तसेच आपल्या घरी सण असून देखील कर्तव्याला प्राधान्य देत अत्यंत मेहनतीने काम करुन विक्रमी उत्पन्न आणणाऱ्या एसटी कर्मचाऱ्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे.

## नऊ वर्षीय मुलाचा सर्पदंशाने मृत्यू

| राजापूर | प्रतिनिधी|

देवीहसोळ गावातील लिंगवाडीतील श्रवण विकास भोवड याला सर्पदंश झाला होता. श्रवणला सर्पदंश झाल्याची कल्पना सुरुवातीला कुणालाच आली नाही. त्यामुळे त्याच्यावर उपचार सुरू होण्यास बराच विलंब झाला आणि त्याची प्रकृती अत्यंत चिंताजनक झाली. त्याला त्रास जाणवू लागल्यानंतर कुटुंबियांनी त्याला उपारासाठी रूग्णालयात दाखल केले. रत्नागिरी येथील जिल्हा रूग्णालयात तपासणी अंती श्रवण याला सर्पदंश झाल्याचे निष्पन्न झाले होते. त्याच्यावर अतिदक्षता विभागात उपार सुरू होते. मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. श्रवणाच्या अशा दुर्दैवी निधनाने संपूर्ण देवीहसोळ गाव शोकसागरात बुडाला आहे.


### राज्य सरकारचे धोरणात्मक पाऊल | सुरक्षित वाहतूकीसह रोजगाराच्या संधी

# विद्यार्थी स्कूल व्हॅनला शासनाची मंजुरी

| मुंबई | प्रतिनिधी |

**शालेय (स्कूल) बसचे वाढीव मासिक दर परवडत नसल्याने आपल्या मुलांच्या वाहतूकीसाठी अनाधिकृत रिक्षाचा पर्याय निवडणाऱ्या राज्यातील तमाम पालकांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकारने धाडसी पावले टाकली आहेत. शाळकरी विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतूकीसह रोजगाराच्या संधीसाठी परिवहन विभागाकडून स्कूल व्हॅन परवाने वाटप खुले करण्यात येत आहेत. याबाबतची अधिसूचना जारी होईल, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे.**





परिवहन विभागाने बोलावलेल्या पालक आणि बस संघटना प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत अनधिकृत वाहनांतून विद्यार्थी वाहतूक होत असल्याचा मुद्दा गाजला होता. देशात सुरक्षित विद्यार्थी वाहतूकीसाठी केंद्र सरकारने स्कूल बस नियमावलीचा आधार घेऊन अद्यावत मानके अर्थात स्कूल व्हॅन नियमावली तयार केली आहे. चारचाकी १२+१ आसनापर्यंत विद्यार्थी वाहतूक करण्यासाठी वाहनाला शालेय व्हॅनचा दर्जा देण्यात येणार आहे. सदर वाहने- या श्रेणीतील असणार आहेत. यात चालक ओळखपत्र, आपत्कालीन निर्गमन, वाहन प्रवेश, स्टोरेज रॅक यांच्या स्पष्टतेसह आसन रचना, अग्निशमन अलार्म यंत्रणा, वाहन ट्रॅकिंग अशा आधुनिक सुरक्षा तंत्रज्ञानाचा ही समावेश केला आहे, अशी माहिती परिवहन मंत्री सरनाईक यांनी दिली.

राज्य सरकारकडून परिवहन विभागामार्फत सन २०१८ पर्यंत स्कूल व्हॅनसाठी परवाने देण्यात येत होते. मात्र, स्कूल व्हॅन विद्यार्थी वाहतूकीसाठी असुरक्षित असल्याचे सांगत काहींनी न्यायालयात याचिका दाखल केली होती. केंद्राच्या मानकानुसार राज्य शासनाने नियमावली तयार करून व्हॅन सुरू करण्याबाबतची सूचनावली प्रसिद्ध केली आहे. त्याआधारे राज्य सरकारने हे धोरणात्मक पाऊल टाकले असून या संदर्भात अधिसूचना जारी होईल, असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी केले.

स्कूल बस भाडे परवडत नसलेले पालक विद्यार्थी वाहतूकीसाठी अवैध रिक्षाचा पर्याय अवलंबतात. रिक्षाच्या तुलनेत व्हॅनमध्ये अधिक सुरक्षेची तरतूद आहे. व्हॅनचे दरवाजे बंद असतात. चार चाके असल्याने वाहन उलटण्याची शक्यता नगण्य असते. व्हॅनमध्ये शाळेची बॅग, पाण्याची बाटली आणि अन्य साहित्य ठेवण्यासाठी पुरेशी जागा असते.

### स्कूल व्हॅनमधील वैशिष्ट्ये

- जीपीएस
- सीसीटीव्ही आणि डॅशबोर्डवर स्क्रीन
- अग्निशमन अलार्म प्रणाली
- दरवाजा उघडा राहिल्यास अलार्म यंत्रणा
- ताशी ४० वेगमर्यादेसह स्पीड गव्हर्नर
- पॅनिक बटण, आपत्कालीन दरवाजे
- स्कूल व्हॅनमध्ये लहान विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी पायरी
- गाडीच्या छतावर शाळेचे नाव

**“विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतूकीला प्रथम प्राधान्य आहे. सुरक्षित वाहतूकीसह बेरोजगारांना रोजगाराची संधी देण्यासाठी स्कूल व्हॅनला मंजुरी देण्यात येत आहे. नव्या स्कूल व्हॅनमधून विद्यार्थी वाहतूकीचा व्यवसाय सुरू करणाऱ्यांना राज्य सरकारकडून परवाने देण्यात येतील. राज्यात अत्याधुनिक सुरक्षा सुविधांनी युक्त स्कूल व्हॅन धावती करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरणार आहे.”**

**– प्रताप सरनाईक, परिवहन मंत्री**

# रुग्णालय प्रशासनाला शेकापचा दणका

## जिल्हा शल्यचिकित्सकांकडून दखल । मुरूडच्या रुग्णालयाची होणार दुरुस्ती

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

मुरूडमधील ग्रामीण रुग्णालयाच्या दुरावस्थेसह अपुऱ्या सुविधांबाबत मुरूडमधील शेकापचे पुरोगामी युवक तालुका उपाध्यक्ष मनिष माळी यांनी आवाज उठविला होता. कृषीवलने ही बाब बातमीच्या रुपात प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली होती. अखेर रुग्णालय प्रशासन खडबडून जागे झाले. जिल्हा शल्यचिकित्सक यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन दुरुस्ती करण्याची सुचना बांधकाम अधिकाऱ्यांना देण्यात आल्या त्यामुळे लवकरच मुरूडच्या रुग्णालयाची दुरुस्ती होणार आहे.



मुरूडमधील ग्रामीण रुग्णालयाची इमारतीचे बांधकाम ५० ते शंभर वर्षापुर्वी झाले आहे. दूरुस्ती अभावी या इमारतीमध्ये पावसाळ्यात छप्पर गळतीचा त्रास कायम आहे. त्याचा रुग्णांना नाहक त्रास होतो. रुग्णालयाच्या दोन्ही प्रवेशद्वारासमोर कॅटल ट्रॅपसह ट्रेनेज दुरुस्ती बांधकाम करणे. फतिमा बेगम रुग्णालयातील लिक्वीड ऑक्सिजन प्लांटसाठी गेटसह शेड बांधकाम करणे. रुग्णालयाच्या दोन्ही आवारातील इमारतीमध्ये वाळवी प्रतिबंधात्मक उपचार करून पेस्ट कंट्रोल करणे. वैद्यकिय अधीक्षक यांच्या निवासस्थान आवारात पेवर ब्लॉक बसविणे. लॅबसाठी वॉश बेसिनसह ओटा बांधणे. अपघात विभाग रॅम्प ठिकाणी शेड बनविणे, कार्यालयाच्या दोन्ही मोठ्या दरवाजाच्या ठिकाणी पत्र्याचे शेड बांधणे. विद्युत जनरेटर शेड बनविण्याबरोबरच त्या शेडला बंधिस्त करणे. अधिपरिचारिका शासकिय वसाहत रुम अपुऱ्या असल्याने नवीन शासकीय वसाहत गृह बांधकाम करणे. नवीन शस्त्रक्रीया गृह बांधणे. याबाबत गेल्या अनेक महिन्यांपासून विशेष दुरुस्ती अंतर्गतनिधी मंजूर करण्याची मागणी ग्रामीण रुग्णालयाकडून करण्यात आली आहे.

रुग्णालयाच्या मागील बाजूला मुरूड नगरपरिषदेने नवीन गार्डनचे बांधकाम केले आहे. त्यामुळे पावसाचे पाणी जाण्याचा मार्ग पुर्णतः बंद झाला आहे. रुग्णवाहिका शेड बसविण्याबरोबरच विद्युत दूरुस्तीचे कामे करण्याची गरज निर्माण झाली आहे. अशा अनेक समस्यांनी मूरूडमधील ग्रामीण रुग्णालय ग्रासलेले आहे. वेगवेगळ्या दुरुस्तीसह बांधकाम करण्यासाठी गेल्या सहा महिन्यांपासून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मंजूरीसाठी प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.

मात्र, सार्वजनिक बांधकाम विभागाने त्याला मंजूरी अद्याप दिली नाही. त्यामुळे मुरूडमधील ग्रामीण रुग्णालयातील सेवेवर त्याचा विपरीत परिणाम होण्याबाबत शेकापचे मुरूडमधील पुरोगामी युवक उपाध्यक्ष मनिष माळी यांनी आवाज उठविला. याबाबत तात्काळ दखल घेऊन कार्यवाही करा अन्यथा आंदोलन छेडले जाईल असा इशारा दिला होता. अखेर रुग्णालय प्रशासन खडबडून जागे झाले. डॉ. निशिकांत पाटील यांनी मुरूडमध्ये जाऊन ग्रामीण रुग्णालयाची पाहणी केली. तेथील समस्या जाणून घेतल्या. सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता यांच्याशी चर्चा करून तात्काळ दुरुस्ती करण्याची सुचना केली. शेकाप आणि कृषीवलच्या दणक्याने मुरूडमधील रुग्णालयाची दुरुस्ती केली जाणार आहे.

> रुग्णालयातील कर्मचारी, रुग्ण यांचे प्रचंड हाल होत आहेत. ग्रामीण रुग्णालयाच्या दुरावस्थेबाबत अनेक वेळा प्रशासनाकडे दाद मागितली. अपूऱ्या सुविधांमुळे गैरसोय होत आहे. परंतु प्रशासन दुर्लक्ष करीत होते. कृषीवलने रुग्णालयातील प्रश्न बातमीच्या रुपात मांडला. अखेर प्रशासन जागे झाले. शल्यचिकित्सक यांनी रुग्णालयाला भेट देऊन पाहणी केली. दुरुस्ती करण्याबाबत सुविधा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. सार्वजनिक बांधकाम विभागालादेखील त्यांनी दुरुस्ती करण्यासाठी सुचना केली.
>
> – मनीष माळी उपाध्यक्ष
> शेकाप मुरूड तालुका पुरोगामी
> युवक आघाडी



# अंगारकी चतुर्थीला बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी रांगा

**। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।**

अंगारकी संकष्टी चतुर्थीला मंगळवारी (दि.१२) अष्टविनायक तीर्थक्षेत्र पालीत भाविकांनी गर्दी केली होती. श्री बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी पहाटे पासूनच लांब रांगा लागल्या होत्या.

श्री बल्लाळेश्वर मंदिर व गाभाऱ्यात फुलांची सजावट करण्यात आली होती. श्री बल्लाळेश्वरला देखील आभूषण व वस्त्र परिधान करण्यात आले होते. तसेच मंदिरा बाहेर रांगोळी देखील काढण्यात आली होती. श्री बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रभरातून व भारतातून भाविक दाखल झाले होते. यामुळे येथे चांगली आर्थिक उलाढाल झाली असून येथील स्थानिक व्यावसायिक सुखावले आहेत.

भाविकांमुळे येथील हॉटेल व्यावसायिक, लॉजिंग बोर्डिंगवाले, पापड, लोणचे मिरगुंड विक्रेते, पेढेवाले, छोटे मोठे दुकानदार व इतर व्यावसायिकांचा धंदा तेजीत होता. मंदिर परिसरातील दुकाने व हॉटेल ग्राहकांनी गजबजले होते. भाविकांच्या सोयीसाठी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने चोख व्यवस्था करण्यात आली होती. विविध वस्तूंनी भरलेली दुकाने व गर्दी यामुळे मंदिर परिसर गजबजलेला दिसत होता. मंदिर परिसराला यात्रेचे स्वरूप आले होते. अनेक भाविक स्वतःची वाहने घेवून आले होते. तर काही लक्झरी किंवा खासगी बसेसने आले. यामुळे पालीतील रस्त्यावर वाहतूक कोंडी झाली होती.

> भाविकांच्या येणाऱ्या गर्दीचा अंदाज घेऊन योग्य व्यवस्थापन व नियोजन करण्यात आले होते. बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने भाविकांच्या सोयीसाठी शुद्ध थंड पाणी व इतर व्यवस्था करण्यात आली आहे.
>
> –जितेंद्र गद्रे, अध्यक्ष,
> बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्ट, पाली

## गोविंदा आला रे आला...



● दहीहंडी उत्सव जवळ आल्याने अलिबागमधील रामनाथ येथील कुंभार आळीमध्ये दहीहंडी रंगकाम करण्याचे काम सुरु असून, त्या विक्रीसाठी ठेवण्यात आल्या आहेत. १०० रुपयांपासून ३०० रुपयांपर्यंत दहीहंडी विकल्या जात आहेत. (छायाचित्र : समीर मालोदे)

# आंतराष्ट्रीय युवादिन साजरा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

प्रभाकर पाटील एजुकेशन सोसायटीचे कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ट महाविद्यालय वेश्वी अलिबाग येथे मंगळवार (दि. १२) रोजी आंतराष्ट्रीय युवादिनाचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड अलिबाग व कनिष्ट महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त विधी साक्षरता शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.




कार्यक्रमास संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील यांनी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास ॲड.निलोफर शेख उपस्थित होत्या त्यांनी विद्यार्थ्यांना Anti-Ragging Laws, Traffic Rules या संदर्भात माहिती दिली. तर ॲड. तन्मय म्हात्रे यांनी World Tribal Day, NALSA/ MALSA मध्ये उपलब्ध असणाऱ्या विविध स्कीम बदल सविस्तर माहिती दिली. तेजस्विनीम. निराळे वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश तथा सचिव, जिल्हा विधी सेवस प्राधिकरण, रायगड अलिबाग यांनी विद्यार्थ्यांचे हक्क तसेच जिल्हा विधी प्राधिकरण यांच्याकडून उपलब्ध असणाऱ्या विविध सुविधा तसेच समाजामध्ये युवा वर्गाचे योगदानावर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी विक्रांत वार्डे, प्राचार्य रविंद्र पाटील, उप्राचार्य निशिकांत कोळसे कार्यक्रमास उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन दिनेश पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन गणेश पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन तेजेश म्हात्रे यांनी केले

## शारदा मंदिर शाळेत अनेक उपक्रम

**नेरळ** : हर घर तिरंगा अंतर्गत शारदा मंदिर मराठी माध्यम कर्जत यांनी शहरामध्ये विविध उपक्रमाचे आयोजन केले होते. विद्यार्थ्यांना सुंदर फलक लेखन करून फलक तिरंग्याच्या प्रतिमांनी सजवले. यावेळी रांगोळीत सामाजिक, राष्ट्रभक्ती दर्शवणाऱ्या रांगोळ्या रेखाटल्या. क्रांती दिनानिमित्त कर्जत येथील क्रांतीस्मारक जवळ प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले. या प्रभात फेरीला श्रद्धा जामघरे, विजय सावंत, सौरभ गुरव, कांता नागरे, निशा गौड उपस्थित होते. वेशभूषेमध्ये लवकुमार सिंह, साहिल बागुल, काव्या म्हसे, संकेत वाघमोडे, दिव्या बिचुकले, अभय बनसोडे, शौर्य कांबळे, अभिनव सोलनकर, ऋतुजा कांबळे यांनी वेशभूषा साकारली होती.

# दर्शनासाठी भाविकांची मांदियाळी



**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

श्रावण महिना व्रतवैकल्यांच्या सणांचा महिना. या महिन्यात अंगारकी संकष्टी चतुर्थीचा योग मंगळवारी (दि.१२) रोजी आल्याने, उरण तालुक्यातील चिरनेर येथील श्री महागणपती मंदिरात गणेश भक्तांची मांदियाळी दिसून आली. चिरनेरचा स्वयंभू श्री महागणपती हा भक्तांच्या नवसाला पावणारा असल्याने, अंगारकी चतुर्थीच्या निमित्ताने मंगळवारी हजारोंच्या संख्येने आलेल्या भाविकांनी प्राचीन श्री महागणपतीच्या दर्शनाचा लाभ घेतला.

पहाटे चार वाजता मंदिर दर्शनासाठी खुले करण्यात आले होते.


यावेळी प्रथम श्री महागणपतीची महापूजा झाली. त्यानंतर मंदिर भाविकांना दर्शनासाठी खुले करण्यात आले. दर्शनासाठी आलेल्या भाविकांनी गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरयाचा जयघोष करीत भक्तीमय वातावरणात दर्शन घेतले.

काही भाविकांनी पायवारी करून श्रींचे दर्शन घेतले. मंगळवारी अंगारकी चतुर्थीचा योग आल्याने नवी मुंबई, ठाणे, उरण, पनवेल, पेण, डोंबिवली विभागातील हजारो गणेश भक्तांनी दर्शनासाठी पहाटेपासूनच गर्दी केली होती. भाविकांना रांगेत सुरळीत दर्शन मिळावे, यासाठी चिरनेर गणपती देवस्थानतर्फे चोख व्यवस्था करण्यात आली होती.

# पेणच्या गणेशमूर्ती रेवदंड्यात

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

अवघ्या महाराष्ट्रासह देश विदेशात पेणमधील गणेशमूर्तींना विशेष मागणी आहे. रेवदंडा पंचक्रोशीत सुध्दा पेण येथील गणेशमूर्तींची मागणी गणेशत्सोवाचा निमित्त होत असल्याने शहरात अनेक ठिकाणी पेणच्या गणेशमूर्ती विक्रीस ठेवण्यात आल्या आहेत.



रेवदंडा शहरात श्री स्वामी समर्थ या केसरीनाथ वडके यांचे दुकानात पेणमधील एक फुटी ते पाच फुटी उंचीच्या विविध आकारातील आकर्षक मुर्ती विक्रीस आणल्या आहेत. यामध्ये कोळी समाजासाठी खास आकर्षण असलेले कोळीबांधव व एकविरा मातेची नाविन्यपुर्ण मूर्ती लक्ष्य वेधून घेत आहे.

यामध्ये गणेश भक्ताच्या मागणीनुसार गणेश भक्ताच्या मागणीनुसार माती व प्लस्टर ऑफ पॅरीस बनावटीच्या मूर्ती उपलब्ध आहेत. गणेश उत्सव जवळ आल्याने गणेशभक्त गणेशमूर्ती पसंती करून खरेदी करत आहेत.

यावर्षी गणेशमूर्तींच्या किमंतीत पंचवीस टक्के वाढ झाली आहे. असे श्री स्वामी समर्थ दुकानाचे मालक केसरीनाथ वडके यांनी सांगितले आहे. श्री गणेश मुर्तीची किमंतीत वाढ झाली असली तरीही रेवदंडा पंचक्रोशीतील गावागावातून गणेश भक्तांनी मूर्तींची मागणी केली आहे.

**खातेधारकांच्या जीवाशी खेळ | पर्यायी जागा शोधण्यास अधिकाऱ्यांची टाळाटाळ**

# टपाल कार्यालयाची इमारत धोकादायक

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

नागोठणे टपाल कार्यालय ज्या इमारतीतून गेली अनेक वर्षे आपला कारभार चालवीत आली आहे ती जुनी इमारत सध्या धोकादायक अवस्थेत आहे. ही इमारत वापरण्यायोग्य नसल्याचा स्ट्रक्चरल ऑडीट अहवाल अलिबाग येथील असोसिएटेड कन्सल्टिंग इंजिनिअर्स यांच्याकडून या इमारतीची प्रत्यक्ष पाहणी करून १३ मार्च, २०२३ मध्येच देण्यात आल्याने या इमारतीमधील टपाल कार्यालयात विविध कामांसाठी येणाऱ्या नागरिकांच्या व खातेधारकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे या इमारतीत सुरू असलेले टपाल कार्यालय तत्काळ इतरत्र हलवावे असा पत्रव्यवहार स्ट्रक्चरल ऑडीट अहवाल प्राप्त झाल्यानंतर टपाल कार्यालय व संबंधितांकडे केला असल्याचे नागोठणे ग्रामपंचायतीच्या सरपंच सुप्रिया महाडिक यांनी सांगितले.

नागोठणे ग्रामपंचायतीच्या स्व. बाळासाहेब ग्रामसचिवालयालगत ही एक मजली इमारत आहे. सिटी सर्व्हे न. ७३८ मधील नागोठणे ग्रामपंचायत दफ्तरी घर नं. २८८ असलेल्या या इमारतीचे बांधकाम जुन्या पद्धतीचे असून लाकडांचा जास्त वापर केलेली ही इमारत कौलारू आहे. या इमारतीचे बांधकामाला ७५ वर्षांहून अधिक काळ उलटून गेल्याने ही इमारत जीर्ण झाली असून वापरण्यायोग्य नसल्याचे स्ट्रक्चरल ऑडीट अहवालावरून स्पष्ट होत आहे.



नागोठणे टपाल कार्यालय असलेली इमारत अत्यंत जुनी असून ती पावसाळ्यात, वादळवाऱ्यात किंवा अतिवृष्टीमुळे केव्हाही पडेल आणि मनुष्यहानी होईल अशी शक्यता असल्याने या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट करून त्याचा अहवाल सादर करावा असे नागोठणे ग्रामपंचायत कार्यालयातून या धोकादायक इमारतीचे मालमत्ता पत्रकावर असलेले सर्व मालक तसेच नागोठणे टपाल कार्यालयाचे पोस्ट मास्तर यांच्याकडे सन २०२१ पासून वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात आला होता. त्यानुसारच या धोकादायक इमारतीची साधारण अडीच वर्षांपूर्वी अलिबाग येथील असोसिएटेड कन्सल्टिंग इंजिनिअर्स यांच्याकडून संबधित इमारतीच्या जागी प्रत्यक्ष भेट देवून प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर ही इमारत वापरण्यायोग्य नसल्याचा अहवाल १३ मार्च, २०२३ रोजी देण्यात आलेला आहे. असे असूनही पोस्ट कार्यालयाचे अधिकारी नवीन जागा शोधण्यासाठी टाळाटाळ करीत असल्याने नागरिकांतून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत असून याबाबत टपाल खात्यातील कुणाचे आर्थिक साटेलोटे तर आड येत नाहीत ना अशी उलटसुलट चर्चा होत आहे.

> नागोठणे टपाल कार्यालयासाठी नवीन जागेचा तातडीने शोध घेऊन स्थलांतर करावे अशा प्रकारचा पत्रव्यवहार वेळोवेळी नागोठणे सहाय्यक पोस्ट मास्तर यांचेकडे केलेला आहे. त्यानुसार गेली ४-५ महिन्यांपासून नवीन जागेचा शोध सुरू आहे. दोन जागांची पाहणीही करण्यात आली होती मात्र व्हेंटिलेशनचा अभाव व इतर तांत्रिक कारणांनी त्या जागा रद्द करण्यात आल्या. मात्र असे असले तरी लवकरात लवकर जागेचा शोध घेऊन नागोठणे टपाल कार्यालय स्थलांतरित करण्याच्या सूचना नागोठण्याचे सहाय्यक पोस्ट मास्तर सूरज रुईकर यांना देण्यात आल्या आहेत.
>
> –सुनील थळकर, जिल्हा टपाल
> मुख्यालयाचे अधीक्षक

## निवडक




### जयश्रीराम पतसंस्थेतर्फे गुणवंताचा सत्कार

**मुरुड** : जयश्रीराम नागरी सहकारी पतसंस्थेचा ३१ वी वार्षिक सर्व साधारण सभा मुरूड येथे झाली. यावेळी तालुक्यातील दहावी व बारावीत सर्वप्रथम उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा व सदस्यांच्या पाल्यांचा प्रशस्तीपत्रे व रोख रक्कम देऊन श्रीराम पतसंस्थेचे चेअरमन दिलीप जोशी व संचालकांच्या हस्ते नुकताच सत्कार करण्यात आला. गुणवंतांमध्ये स्वरा राउळ, अश्मल किल्लेदार, विया जैन, रागिणी पावशे, उर्वशी कोवळेकर, अंतरा नाक्ती, श्रुती म्हात्रे, महेक शर्मा, नियती पाटील, अनिह जोशी, वेदिका खोत, तनिष मुंबईकर, जयवंत रोटकर, स्वरांग खोत, अक्षरा शेळके, मुग्धा नांदगावकर, प्रिती म्हात्रे, सानिया भोईर, निष्णाई तळेकर आदींचा समावेश होता. या प्रसंगी समीर उपाध्ये, व्हा. चेअरमन मेघराज जाधव, ॲड. मोहन तांबडकर, बाळकृष्ण कासार, सुनिल विरकुड, डॉ. संजय पाटील, डॉ. अमित बेनकर, प्रमोद उपाध्ये, समीर उपाध्ये, अशोक दिवेकर, जयश्री जोशी, अश्विनी पाटील, सर व्यवस्थापक संजय ठाकूर, विद्यार्थ्यांचे पालक, सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### उरणमध्ये आरोग्य शिबीर

**उरण** : उरण तालुक्यातील सामाजिक संस्था श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहाय्यता संस्था व जायंट्स ग्रुप ऑफ उरण यांच्या संयुक्त विद्यमानाने (दि. १०) ऑगस्ट रोजी मुळेखंड करंजा रोड येथे महिलांसाठी मेमोग्राफी व लहान मुलांसाठी आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरासाठी अनेक महिला व लहान मुले उपस्थित होत्या. प्रथम महिलांचे मेमोग्राफी चाचणी करण्यात आली. यावेळी डॉ. विकास मोरे, डॉ.अजय कोळी यांनी लहान मुलांची आरोग्य तपासणी केली. तर डॉ. राहुल कुमार यांनी कॅन्सर संबंधी मार्गदर्शन केले. डॉ. विकास मोरे यांनी स्तनपान सप्ताहानिमित्त महिलांना स्तनपनाचे महत्त्व सांगितले. वात्सल्य फाऊंडेशनतर्फे माधवी कोळी हिने सॅनेटरी नॅपकिन बद्दल माहिती देऊन सॅनेटरी नॅपकिन मोफत दिले. या शिबिरात ६० जणांची आरोग्य तपासणी करण्यात आली. मयूर मेडिकल दिपेश शहा यांच्या सौजन्याने मोफत औषध देण्यात दिली. या उपक्रमासाठी श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहाय्यता संस्था संस्थेच्या संगीता ढेरे, कविता म्हात्रे, वैशाली पाटील, तृप्ती भोईर, मंजू कुमार, सचिन ढेरे, देवेंद्र पिंपळे, रोशनलाल मेहता, प्रियवंदा तांबोटकर, अमृत ठाकूर, होळकर,अनु पाटील, नयना पाटील, निशा म्हात्रे, तृप्ती घरत, सुप्रभा म्हात्रे, उज्वला म्हात्रे, राम मदने यांनी उपक्रम यशस्वी होण्यासाठी सहकार्य केले.




### ‘रमाईचं कुंकू’ गीत संग्रहाचे प्रकाशन

**पाली/बेणसे** : आंबेडकरी विचारधारेचा पाईक असलेल्या कवी बाळकृष्ण उर्फ बाळराज पवार यांच्या ‘रमाईचं कुंकू’ या गीत संग्रहाचे प्रकाशन नुकतेच पार पडले. या गीत संग्रहात तरुणांना प्रेरणा देणाऱ्या आणि आंबेडकरी विचारांचा वारसा सांगणाऱ्या गीतांचा समावेश आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजाला दिलेले विचारधन आणि त्यासाठी रमाई यांचे योगदान यांचा या गीत संग्रहात विशेष उल्लेख केला आहे. कवी बाळकृष्ण पवार हे रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर तालुक्यातील वरवेली गावचे आहेत. त्यांनी शिक्षक म्हणून विविध शाळांमध्ये काम केलेल्या बाळकृष्ण पवार यांनी स्वेच्छा निवृत्तीनंतर पूर्णवेळ लेखन कार्याला वाहून घेतले आहे. बौद्ध विकास मंडळ, वरवेली यांचे माजी अध्यक्ष, तसेच सम्यक कोकणकला संस्था, गुहागर यांचे सक्रिय पदाधिकारी म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. त्यांच्या ‘रमाईचं कुंकू’ या पहिल्याच गीत संग्रहाचे प्रकाशन ‘जग बदलणारा बाप माणूस’ या पुस्तकाचे लेखक व प्रसिद्ध व्याख्याते जगदीश ओहोळ, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त कवी लेखक राष्ट्रपाल सावंत व इतर मान्यवरांच्या हस्ते पाटपन्हाळे गुहागर येथे नुकतेच पार पडले. यावेळी समाजातील विविध स्तरातील मान्यवर आणि प्रतिष्ठित आवर्जून उपस्थित होते.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● आमच्या येथे J.S.W. (जिंदाल) कंपनीचे जुने नवीन कलर कोटेड पत्र्याचे पत्रे मिळतील. संपर्क : बाबू सैय्यद, कोळीवाडा कस्टम ऑफिसच्या बाजूला. मो. ७७४४९२५१६६

● अलिबागमध्ये ऑफिस कामासाठी मुलगा पाहिजे. संपर्क : ९९२३२३५०५६/८१४९६७३०१८

● दुकान गाळा भाड्याने देणे आहे. अलिबाग एस टी स्टॅन्ड जवळ ९७६४५४८६७९.

● अलिबाग मधील रेस्टॉरंटसाठी वेटर, कुक, इ. पाहिजे आहेत. तसेच किचन मॅनेजरची आवश्यकता आहे. इच्छुकांनी खालील फोन क्रमांकावर संपर्क साधावा.
मोबाईल क्रमांक -७७६७८५३९९९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## ई-निविदा सुचना

अलिबाग जि.रायगड येथे जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करणे फेरनिविदेसाठी ई-निविदा सुचना http:www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. निविदेबाबतीत सर्व माहिती संकेतस्थळावर देण्यात आलेली आहे.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या निवासी सदनिकेचे विद्यमान मालक श्रीमती रुतीषा संतोष पाटील रा. राजे शहाजी पॅलेस बिल्डींग, ठिकरुळ नाका, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या मालकीहक्काचा व त्यांचे कब्जातील खालील वर्णन केलेली निवासी सदनिका माझे स्नेही यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर माझे स्नेही यांनी केली आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा हवाला विद्यमान मालकांनी माझ्या स्नेहींना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे चेंढरे, ता. अलिबाग येथील सर्व्हे नं. २७, हिस्सा नं. अ ६ या मिळकतीवरील बांधण्यात आलेली सिगल रेसिडेंसी बिल्डींग नं. ६ सहकारी गृहनिर्माण संस्थामधील दुसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका नं. २०५, कारपेट क्षेत्र ४६४.७५ चौ. फूट (४३.१९ चौ.मी.) (चेंढरे ग्रामपंचायत मालमत्ता क्र. १०७६/१० ही निवासी सदनिका)

तरी सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, ताबा कब्जा, भाडेपट्टा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकतीबाबत कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहीत धरुन माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या स्नेहींवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक १२/०८/२०२५ सही/-

**श्री. शेखर विष्णू मगर**

दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड. मो.नं. ९८२३१९९४६५

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे वाडगाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक श्री. रामचंद्र सदू थळे, श्री. महादेव सदू थळे, श्री. यशवंत सदू थळे, वासंती अनिल पाटील रा. वाडगाव, पो. वेश्वी, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या नांवे असलेली भातशेती मिळकत माझे स्नेही यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| वाडगाव ता. अलिबाग | २९१ | ०-०८-६० | ०.४५ |

सदर मिळकत निर्वेध असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. सबब सदरहू मिळकतीवर अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खाली पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहीत धरुन माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझे स्नेही यांचेवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १२/०८/२०२५ सही/-

**श्री. शेखर विष्णु मगर**

पत्ता: दुय्यम निबंधक कार्यालयासमोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड.
मो.नं. ९८२३१९९४६५

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) दिनेश रघुनाथ ठाकुर, २) सुरेश रघुनाथ ठाकुर, ३) प्रभा नरेश पाटील, ४) वासंती रघुनाथ ठाकुर, ५) सुनीता अवधुत कदम, ६) विमल रमेश ठाकुर, ७) राजेश रमेश ठाकुर, ८) अमित रमेश ठाकुर, ९) अर्चना संतोष कोरे, १०) सुशिला गणेश ठाकुर, ११) योगेश गणेश ठाकुर, आणि १२) मोनिका तुषार कडवाडकर यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते

**अनुसूची**

(मालमत्तेचे वर्णन)

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव-कामार्ले, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग २४० एकूण क्षेत्र ००-५०-३० (हे.आर.चौ.मी.) आकार रु. पै.०.६२/-

ठिकाण : अलिबाग
दिनांक : १३/०८/२०२५
**झुंजारराव आणि कं. करीता**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीद्वारे कळवण्यात येते की, आमचे आशील १) श्री. नितीन नथुराम म्हात्रे, २) श्री. निलेश नथुराम म्हात्रे ३) श्री. शैलेन्द्र शंकर म्हात्रे, सर्व रा. कोण गाव,पो. आजिवली, ता. पनवेल, जि. रायगड, ४) श्री. कैलास बाळाराम मुंढे रा. कोलखे, रैईगढ, रायगड ४१०२२१ यांनी खालील वर्णनाची नमूद केलेली जमीन मिळकत त्या मिळकतींचे मालक १) पूजा परशूराम माळी २) हर्षदा हरीश्चंद्र जोशी यांचेकडून कायम विकत घेण्याचे ठरविले असून त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे- हेदवली, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमीन मिळकतीचे वर्णन**

| सर्वे नं. | हिस्सा नं | एकूण क्षेत्र (हे. आर. चौ.मी) | आकार रुपये/पैसे |
|---|---|---|---|
| ८० | १ | ०.२४.०० | ०.१९ |

या मिळकतींशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हाला ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसात लेखी पुराव्यासह कळवावे, वरील मुदतीत कोणत्याही प्रमाणे हरकत न घेतल्यास वरील मिळकतींशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे आशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे. अधिवक्ता
दिनांक १३/०८/२०२५

**ॲड. सौ. शुभांगी आनंद साळवी**

पत्ता - सरमोकादम बंगलो, गाळा नं २
दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर,
ता. कर्जत, जि. रायगड, ४१०२०१
मो.नं. ९९६७८३४६१८/७७९६२०७३८०

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे पोटल, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील परिशिष्ठात वर्णन केलेली मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. सदानंद शिवाजीराव शिंदे व सविता सदानंद शिंदे यांचेकडुन कायमची विकत घेण्याची ठरविलेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मिळकत परिशिष्ठ**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे आर प्रति | आकार रू.पै |
|---|---|---|---|
| ६ | १ | ०.२४.०० | ३.१४ |

तरी सदर मिळकतीबाबत इतर कोणत्याही व्यक्तीचा, संस्थेचा बोजा, हक्क, हितसंबंध, अधिकार, वहिवाट, कब्जा, साठेकरार, खरेदीखत, अखत्यारपत्र, मृत्युपत्र, गहाणखत, बक्षीस, दान, जप्ती, लीज, कुळ, बयाणापावती, वारस हक्क, इजमेंट हक्क अथवा अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारची हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ दिवसांच्या आत खालील नमुद केलेल्या पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत द्यावी. विहीत मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या व्यवहाराची पुर्तता करतील. मुदतबाह्य हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कार्यालय पत्ता सही/-
१०३, पहिला मजला, पांडुरंग धाम,
रेल्वे गेट जवळ, नेरळ, ता. कर्जत,
जि. रायगड. मो.नं. ७७९८४३३८८८

**ॲड. कैलास अनंत बासरे**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे-तिवरे, ता. सुधागड, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे-तिवरे, ता. सुधागड, जि. रायगड**

| कब्जेदाराचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| श्री. विक्रम प्रभाकर म्हात्रे | २२ ५ | ०-२२-३० | ४-४१ |

सदर वरील वर्णन केलेली एकूण सर्व मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे कब्जेदार यांचेकडून कायम खरेदीने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर होणारे खरेदी विक्री व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा दावा असल्यास वा सदरहू मिळकतीचे खरेदी विक्री बाबत तसेच हक्क हितसंबंध, मालकी, वहिवाट, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्यूपत्र, साठेकरार अथवा कोणाचेही काही हक्क हितसंबंध, वहिवाट अथवा सदर मिळकतीचे ताबे कब्जा वहिवाट असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून संबंधित तक्रारदार याने आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसहीत १४ दिवसांचे कालावधीत खालील पत्त्यावर नोंदवावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे, असे समजून आमचे अशिल सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पाली-सुधागड सही/-
दिनांक : १२/०८/२०२५

**श्री. राहूल जे. भंडारी**

ॲडव्होकेट
रा.पाली, ता. सुधागड, जि. रायगड
मोबा नं. ९४२३२३२८६२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे सागरगड, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक श्री. बाळाराम सहदेव राऊत, वगैरे ८ सर्व रा. वाघोडे, पो. पोयनाड, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या नावे असलेली भातशेती मिळकत आमचे अशिल यांनी कायमस्वरूपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| सागरगड ता. अलिबाग | १३/३ | ०-५३-००<br>पो.ख. ०-०५-००<br>एकूण ०-५८-०० | ५.४९ |

सदर मिळकत निर्वेध असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. सबब सदरहू मिळकतींवर अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खाली पत्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझे स्नेही यांचेवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १२/०८/२०२५ सही/-

**श्री. मच्छिंद्र एस. म्हात्रे**

पत्ता : दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९८९००७९३०२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे सागरगड, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक श्री. विष्णू सोनाजी सुर्वे, वगैरे ३ सर्व रा. वाघोडे, पो. पोयनाड, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या नावे असलेली भातशेती मिळकत आमचे अशिल यांनी कायमस्वरूपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| सागरगड ता. अलिबाग | १३/१/ब | ०-२२-१०<br>पो.ख. ०-०१-५०<br>एकूण ०-२३-६० | २.०० |

सदर मिळकत निर्वेध असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. सबब सदरहू मिळकतींवर अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खाली पत्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझे स्नेही यांचेवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १२/०८/२०२५ सही/-

**श्री. मच्छिंद्र एस. म्हात्रे**

पत्ता : दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९८९००७९३०२

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना सदर नोटीशीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे नागाव, ता. अलिबाग येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीमधील ०-०५-१० हे.आर. एवढे क्षेत्र विद्यमान मालक प्रफुल्ल भास्कर नाईक, रा. नागाव, ता. अलिबाग यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान जमीन मालक यांच्यामध्ये झालेली आहे. सदर क्षेत्र निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| नागाव ता. अलिबाग जि. रायगड | १२१६ | एकूण ००-१०-२० | ०१-७५ |
| वर नमूद मिळकतींपैकी ०-०५-१० हे.आर. क्षेत्र | | | |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, वारसा हक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या मुदतीत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. १२/०८/२०२५

**ॲड. मच्छिंद्र एस. म्हात्रे**

शॉप नं. २, दुय्यम निबंधक
कार्यालय अलिबागच्या समोर
अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९८९००७९३०२

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळवण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) दामोदर नागू ठाकूर, २) गुलाब मारूती ठाकूर, ३) महेश मारूती ठाकूर, ४) लता हेमंत म्हात्रे, ५) शैला सुनील ठाकूर, ६) सुरज सुनील ठाकूर, ७) निलेश सुनिल ठाकूर, ८) ताराबाई पांडुरंग ठाकूर, ९) अनिल पांडुरंग ठाकूर, १०) गीता गणेश पाटील, ११) अस्मिता दत्तात्रेय ठाकूर, १२) आयुष दत्तात्रेय ठाकूर, १३) आदित्य दत्तात्रेय ठाकूर, १४) श्रद्धा श्रावण पाटील, आणि १५) जयंता चंद्रकांत ठाकूर यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरूद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षिस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई- ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे अशिल सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळवण्यात येते.

**अनुसूची**

**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उपजिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव-कामार्ले, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग २४३, एकूण क्षेत्र ००-९७-०० (हे.आर.चौ.मी.) आकार रू.पै. ०.९३/-,

ठिकाण : अलिबाग
दिनांक : १३/०८/२०२५
**झुंजारराव आणि कं. करीता**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**

## अपर जिल्हाधिकारी रायगड मुख्यालय अलिबाग यांचे न्यायालयात जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अलिबाग जि. रायगड

क्रमांक हक्कनोंद/अपील क्र. ६५/२०२५

श्री. विक्रम शरद शेठ
रा. के.ई.एस कन्याशाळा,
पो. थळ, ता. अलिबाग, जि. रायगड — अपिलार्थी

विरुद्ध

१. पिपल एज्युकेशनल सोसायटी तर्फे
सेक्रेटरी श्री. सुनिल आनंद शिंदे
रा. रावसाहेब पी एन पी काळे मार्ग, गोखले रोड दक्षिण,
दादर, मुंबई - ४०० ०२८
२. श्री. सदानंद भगवान पाटील
३. श्री. संजय सदानंद पाटील
४. श्री. गोविंद सखाराम पाटील
५. श्रीम. शंकुतला अनंत पाटील
६. श्री. गोपाळ सखाराम पाटील
७. श्रीम. शुभांगी रमेश थळे
८. श्रीम. सत्यवती सिताराम म्हात्रे — उत्तरार्थी
९. श्री. राजेंद्र रघुनाथ पाटील
१०. श्रीम. सुमित्रा मोतीराम पाटील
११. श्री. शैलेश जगन्नाथ म्हात्रे
१२. श्री. निलेश जगन्नाथ म्हात्रे
१३. श्री. संजय जगन्नाथ म्हात्रे
१४. श्री. सचिन जगन्नाथ म्हात्रे
१५. श्रीम. विठाबाई भगवान पाटील
१६. श्रीम. निर्मला लक्ष्मण थळे
१७. श्रीम. भारती भास्कर म्हात्रे
१८. श्री. अनंत गणपत पाटील
१९. श्री. वसंत गणपत पाटील
२०. श्री. पांडूरंग बाळकृष्ण गावंड
२१. श्री. विष्णू गणपत पाटील
२२. श्री. यशवंत बाळकृष्ण गावंड
२३. श्रीम. राजेश्री रामचंद्र पाटील
२४. श्रीम. सुलोचना नागेश गावंड
२५. श्रीम. वनिता विश्वनाथ धसाडे
२६. श्री. रुपेश रामचंद्र पाटील
२७. श्रीम. रुपाली रामचंद्र पाटील
२८. श्रीम. रक्षिता रविंद्र वेळे
२९. श्रीम. पल्लवी रामचंद्र पाटील
३० श्रीम. रुचित्रा रामचंद्र पाटील
३१. श्रीम. सुजाता शिवराम पाटील
३२. श्री. प्रतिक वसंत म्हात्रे
३३. श्रीम. प्रमिला चंद्रशेख भगत
३४. श्रीम. सुहासिनी सुरेश पाटील
३५. श्रीम. दर्शना दत्तात्रेय पाटील
३६. श्री. दुशांत दत्तात्रेय पाटील
३७. श्री. अल्पेश दत्तात्रेय पाटील
३८. श्रीम. दिप्ती नितिन पालांडे
३९. श्रीम. राजेंद्र रघुनाथ पाटील
४०. श्रीम. सुगंधा गणेश ठोंबरे
४१. श्रीम. रंजना यशवंत गावंड
४२. श्रीम. अनुसया चंदर म्हात्रे
४३. श्रीम. तारा विश्वनाथ पाटील
४४. श्रीम. प्रमिला अशोक पाटील
४५. श्रीम. माळी आत्माराम ठाकूर
४६. श्री. राजाराम चंदर म्हात्रे
४७. श्री. लक्ष्मण चंदर म्हात्रे
४८. श्रीम. विठा दत्तात्रेय म्हात्रे
४९. श्रीम. शालिनी दिपक पाटील
५०. श्री. सिताराम चंदर म्हात्रे
५१. श्रीम. सुनिता प्रफुल्ल पाटील
अ. क्र. २ ते ५१ रा. धोकवडे, ता. अलिबाग, जि. रायगड

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये**

या जाहिर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, मौजे धोकवडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. ७७६/१ (जुना सर्व्हे नं. १०४/१, १०५/०, १०६/१, १०७/०, १०८/१ क्षेत्र १-५५-८ हे. आर. आकार ३३.१७, सर्व्हे नं. ७७६/११ (जुना सर्व्हे नं. १०३/२ ब) क्षेत्र ०-२५-५ हे. आर. आकार ०.४२, सर्व्हे नं. ७७६/१२ क्षेत्र ०-७१-८ हे. आर. आकार १.४८, सर्व्हे नं. ७७६/१३ (जुना सर्व्हे नं. १०३/१ अ, १०३/१ ब) क्षेत्र ४-४२-० हे. आर. आकार ७.९३, ७७६/२ क्षेत्र ०-२७-० हे. आर. आकार ७.००, ७७६/४ क्षेत्र ०-०३-० हे. आर. आकार ०.८१, ७७६/५ क्षेत्र ०-५६-९ हे. आर. आकार १३.७५ या जमीन मिळकती संदर्भात अपिलार्थी यांनी उपविभागीय अधिकारी अलिबाग यांचेकडील आरटीएस रिव्हीजन अर्ज क्र. १४/२०२३, दि. १३/०१/२०२५ मधील आदेशाविरुद्ध या न्यायालयाकडे अपील दाखल केलेले आहे सदर अपीलाची नोटीस काढली असता त्याची बजावणी होऊ शकली नाही. आपला राहण्याचा शेवटचा पत्ता वरीलप्रमाणे असल्याची माहिती अपिलार्थी यांस आहे. सबब, अपिलार्थी या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, सदर प्रकरणामध्ये दि. १८/०८/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता अपर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचे कार्यालयात सुनावणी निश्चित करणेत आलेली आहे. तरी आपण स्वतः अगर तुमचे वकीलांमार्फत सदर सुनावणीस हजर रहावे. आपण हजर न राहिल्यास आपले गैरहजेरीत प्रकरणामध्ये सुनावणी होऊन आदेश दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग सही/-
दिनांक : ११/०८/२०२५

**अपर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग करीता**

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे लाडीवली, ता. पनवेल, जि. रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाच्या जमीन मिळकती सदर मिळकतींचे मालक/कब्जेदार यांचेकडून आमचे अशिलांनी कायम खरेदीने घेणेचे ठरविले आहे.

**जमीन मिळकतींचे वर्णन**

**मौजे-लाडीवली, ता.-पनवेल, जि.-रायगड येथील**

| मालक/कब्जेदाराचे नाव | भूमापन क्र. | उपविभाग | क्षेत्र हे.-आर.चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| १. शिवाजी गोपाळ पडवळ<br>२. माया रामचंद्र परब<br>३. विशाखा वसंत देसाई<br>४. कै. अरूण गोपाळ पडवळ मयत तर्फे वारस | २५ | २/१ | ०-१५.४० | २.१८ |
| ४/१ मानिनी अरूण पडवळ<br>४/२ पंकज अरूण पडवळ<br>४/३ शितल राहूल ओसेकर<br>५. कै. रविंद्र गोपाळ पडवळ मयत तर्फे वारस | २५ | ४ | ०-०९.९० | ०.९१ |
| ५/१ पुष्पा रविंद्र पडवळ<br>५/२ हर्षदा स्वरूप हेगडे<br>६. कै. शारदाबाई वसंत मोरे मयत तर्फे वारस<br>६/१ अशोक वसंत मोरे<br>६/२ सुनिल वसंत मोरे<br>६/३ दिपा दिलीप शेलार | २६ | १ | ०-३४.६० | ४.६२ |

त्याअर्थी सदर मालक/कब्जेदार यांचे व्यतिरिक्त सदर मिळकतीसंदर्भात अगर त्यांचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न-वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा-कब्जा, एम.ओ.यु. हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कास कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधित व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहीत मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतींवरील श्री. शिवाजी गोपाळ पडवळ वगैरे यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजून आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि. १३/०८/२०२५

**श्री. तुषार द. देवरे, ॲडव्होकेट**

पत्ता : फ्लॅट नं. ए-२, जय नगर को.ऑप.हौ.सोसा.लि.
कोर्ट रोड, ५२ बंगला, पनवेल ४१० २०६.
जि. रायगड, मोबाईल नं. ९३२५००४००८
tushar.deore@gmail.com

## अपर जिल्हाधिकारी रायगड मुख्यालय अलिबाग यांचे न्यायालयात जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अलिबाग जि. रायगड

क्रमांक हक्कनोंद/अपील क्र. ६४/२०२५

श्री. सोहम मुकेश पटेल
रा. फाईन हाऊस, ५ वा मजला, आनंदजी लेन,
भवेश्वर मार्केट जवळ, एम जी रोड, घाटकोपर पूर्व, — अपिलार्थी
मुंबई - ७०

विरुद्ध

१. पिपल एज्युकेशनल सोसायटी तर्फे
सेक्रेटरी श्री. सुनिल आनंद शिंदे
रा. रावसाहेब पी एन पी काळे मार्ग, गोखले रोड दक्षिण,
दादर, मुंबई - ४०० ०२८
२. श्री. सदानंद भगवान पाटील
३. श्री. संजय सदानंद पाटील
४. श्री. गोविंद सखाराम पाटील
५. श्रीम. शंकुतला अनंत पाटील
६. श्री. गोपाळ सखाराम पाटील
७. श्रीम. शुभांगी रमेश थळे
८. श्रीम. सत्यवती सिताराम म्हात्रे — उत्तरार्थी
९. श्री. राजेंद्र रघुनाथ पाटील
१०. श्रीम. सुमित्रा मोतीराम पाटील
११. श्री. शैलेश जगन्नाथ म्हात्रे
१२. श्री. निलेश जगन्नाथ म्हात्रे
१३. श्री. संजय जगन्नाथ म्हात्रे
१४. श्री. सचिन जगन्नाथ म्हात्रे
१५. श्रीम. विठाबाई भगवान पाटील
१६. श्रीम. निर्मला लक्ष्मण थळे
१७. श्रीम. भारती भास्कर म्हात्रे
१८. श्री. अनंत गणपत पाटील
१९. श्री. वसंत गणपत पाटील
२०. श्री. पांडूरंग बाळकृष्ण गावंड
२१. श्री. विष्णू गणपत पाटील
२२. श्री. यशवंत बाळकृष्ण गावंड
२३. श्रीम. राजेश्री रामचंद्र पाटील
२४. श्रीम. सुलोचना नागेश गावंड
२५. श्रीम. वनिता विश्वनाथ धसाडे
२६. श्री. रुपेश रामचंद्र पाटील
२७. श्रीम. रुपाली रामचंद्र पाटील
२८. श्रीम. रक्षिता रविंद्र वेळे
२९. श्रीम. पल्लवी रामचंद्र पाटील
३० श्रीम. रुचित्रा रामचंद्र पाटील
३१. श्रीम. सुजाता शिवराम पाटील
३२. श्री. प्रतिक वसंत म्हात्रे
३३. श्रीम. प्रमिला चंद्रशेख भगत
३४. श्रीम. सुहासिनी सुरेश पाटील
३५. श्रीम. दर्शना दत्तात्रेय पाटील
३६. श्री. दुशांत दत्तात्रेय पाटील
३७. श्री. अल्पेश दत्तात्रेय पाटील
३८. श्रीम. दिप्ती नितिन पालांडे
३९. श्रीम. राजेंद्र रघुनाथ पाटील
४०. श्रीम. सुगंधा गणेश ठोंबरे
४१. श्रीम. रंजना यशवंत गावंड
४२. श्रीम. अनुसया चंदर म्हात्रे
४३. श्रीम. तारा विश्वनाथ पाटील
४४. श्रीम. प्रमिला अशोक पाटील
४५. श्रीम. माळी आत्माराम ठाकूर
४६. श्री. राजाराम चंदर म्हात्रे
४७. श्री. लक्ष्मण चंदर म्हात्रे
४८. श्रीम. विठा दत्तात्रेय म्हात्रे
४९. श्रीम. शालिनी दिपक पाटील
५०. श्री. सिताराम चंदर म्हात्रे.
५१. श्रीम. सुनिता प्रफुल्ल पाटील
अ. क्र. २ ते ५१ रा. धोकवडे, ता. अलिबाग, जि. रायगड
५२. श्री. विक्रम शरद शेठ
रा. के. ई. एस. कन्या शाळा, पो. थळ, ता. अलिबाग, जि. रायगड

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये**

या जाहिर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, मौजे धोकवडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. ७७६/१ (जुना सर्व्हे नं. १०४/१, १०५/०, १०६/१, १०७/०, १०८/१ क्षेत्र १-५५-८ हे. आर. आकार ३३.१७, सर्व्हे नं. ७७६/११ (जुना सर्व्हे नं. १०३/२ ब) क्षेत्र ०-२५-५ हे. आर. आकार ०.४२, सर्व्हे नं. ७७६/१२ क्षेत्र ०-७१-८ हे. आर. आकार १.४८, सर्व्हे नं. ७७६/१३ (जुना सर्व्हे नं. १०३/१ अ, १०३/१ ब) क्षेत्र ४-४२-० हे. आर. आकार ७.९३, ७७६/२ क्षेत्र ०-२७-० हे. आर. आकार ७.००, ७७६/४ क्षेत्र ०-०३-० हे. आर. आकार ०.८१, ७७६/५ क्षेत्र ०-५६-९ हे. आर. आकार १३.७५ या जमीन मिळकती संदर्भात अपिलार्थी यांनी उपविभागीय अधिकारी अलिबाग यांचेकडील आरटीएस रिव्हीजन अर्ज क्र. १४/२०२३, दि. १३/०१/२०२५ मधील आदेशाविरुद्ध या न्यायालयाकडे अपील दाखल केलेले आहे सदर अपीलाची नोटीस काढली असता त्याची बजावणी होऊ शकली नाही. आपला राहण्याचा शेवटचा पत्ता वरीलप्रमाणे असल्याची माहिती अपिलार्थी यांस आहे. सबब, अपिलार्थी या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, सदर प्रकरणामध्ये दि. १८/०८/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता अपर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचे कार्यालयात सुनावणी निश्चित करणेत आलेली आहे. तरी आपण स्वतः अगर तुमचे वकीलांमार्फत सदर सुनावणीस हजर रहावे. आपण हजर न राहिल्यास आपले गैरहजेरीत प्रकरणामध्ये सुनावणी होऊन आदेश दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग सही/-
दिनांक : ११/०८/२०२५

**अपर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग करीता**

# स्टोक्सपेक्षा शुबमनच भारी

### आयसीसीकडून शिक्कामोर्तब
### भारतीय कर्णधाराची ऐतिहासिक कामगिरी

**। लंडन । वृत्तसंस्था ।**
भारतीय क्रिकेट संघाने इंग्लंड दौऱ्यातील पाचवा आणि अंतिम कसोटी सामना अवघ्या ६ धावांनी जिंकला. भारताने या विजयासह इंग्लंड विरुद्धची ५ सामन्यांची मालिका २-२ ने बरोबरीत सोडवली. कर्णधार म्हणून शुबमन गिल याची ही पहिलीच कसोटी मालिका होती. शुबमनने या मालिकेत स्वत:ला फलंदाज आणि कर्णधार म्हणूनही सिद्ध केलं. शुबमनने त्याच्या नेतृत्वात आणि अनुभवी खेळाडूंशिवाय मालिका बरोबरीत राखण्यात यश मिळवलं. शुबमनने या मालिकेनंतर आणखी एक विजय मिळवला आहे. शुबमनने इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्स याला पछाडत मोठा बहुमान मिळवला आहे.



भारताचा कर्णधार शुबमन गिल हा इंग्लंडचा कॅप्टन बेन स्टोक्स याच्यापेक्षा सरस असल्याचं स्वत: आयसीसीने जाहीर केलं आहे. आयसीसीने जुलै २०२५ या महिन्यातील प्लेअर ऑफ द मन्थ पुरस्कार विजेत्या खेळाडूच्या नावाची घोषणा केली आहे. आयसीसीने बेन स्टोक्स, शुबमन गिल आणि दक्षिण आफ्रिकेचा ऑलराउंडर आणि कर्णधार वियान मुल्डर या तिघांना पुरस्कारासाठी नामांकन दिलं होतं. मात्र मुख्य लढाई ही गिल विरुद्ध स्टोक्स यांच्यात होती. गिलने इथेही सरशी मारली आणि हा पुरस्कार आपल्या नावावर केला आहे. गिलची आयसीसीचा हा पुरस्कार जिंकण्याची ही चौथी वेळ ठरली आहे. आयसीसीने एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरुन याबाबतची माहिती दिली आहे.

शुबमनचा कसोटी कर्णधार झाल्यानंतर हा पुरस्कार जिंकण्याची पहिली तर एकूण चौथी वेळ ठरली आहे. शुबमनने याआधी फेब्रुवारी महिन्यात हा पुरस्कार पटकावला होता. तर त्याआधी शुबमनने २०२३ साली सप्टेंबर आणि जानेवारी महिन्यात या पुरस्कारावर आपली मोहोर उमटवली होती.

आयसीली एका महिन्यात तिन्ही फॉर्मेटमध्ये सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या ३ फलंदाजांना या पुरस्कारासाठी नामांकन देतं. त्यानंतर क्रिकेट चाहते ऑनलाईन आपल्या आवडत्या खेळाडूला व्होट देऊ शकतात. त्यानंतर आयसीसी संबंधित खेळाडूला मिळालेली मतं आणि त्याच्या कामगिरीच्या आधारावर विजेता निश्चित करते.

शुबमन जुलै महिन्यात इंग्लंड विरुद्ध एकूण ३ सामने खेळला. शुबमनने या दरम्यान ३ सामन्यांमध्ये ९४.५० च्या ऐतिहासिक सरासरीने ५५० पेक्षा अधिक धावा केल्या. शुबमनने एकूण ५६७ धावा केल्या होत्या. तसेच बेन स्टोक्स याने ३ सामन्यांमध्ये २५१ धावा करण्यासह १२ विकेट्सही घेतल्या होत्या. तर वियान मुल्डर याने झिंबाब्वे विरुद्ध २ सामन्यांमध्ये ५३१ धावा केल्या. तसेच ७ विकेट्सही मिळवल्या होत्या. मात्र शुबमनने या दोघांना मागे टाकत हा पुरस्कार जिंकला.

## महाडमध्ये पावसाळी क्रीडा स्पर्धांना सुरुवात

**। महाड । प्रतिनिधी ।**
प्रतिवर्षी होणाऱ्या जिल्हा परिषद शाळांतील तसेच माध्यमिक शाळांतील पावसाळी क्रीडा स्पर्धांना आजपासून महाडमध्ये प्रारंभ झाला असून लाडवली येथील शासकीय क्रीडा संकुल बांधून पूर्ण होऊ नये ते लोकार्पित न झाल्याने त्याच्या दुरावस्थेमुळे तालुक्यातील विविध खाजगी शाळांमधून या स्पर्धा स्थानिक पंचायत समिती प्रशासनाला आयोजित कराव्या लागत असल्याचे दिसून आले आहे.

यासंदर्भात पंचायत समिती शिक्षण विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार व्हॉलीबॉल स्पर्धा अकरा बारा ऑगस्ट अकले येथील ट्रिंकल स्टार शाळेमध्ये १३ ऑगस्ट योगासन दगडूशेठ पार्टी कॅरम स्पर्धा फजंदार वहूर १८ ऑगस्ट खो-खो स्पर्धा मुले बाल संस्कार कोकरे १९ ऑगस्ट खो-खो स्पर्धा मुली बालसंस्कार कोकरे कुस्ती २० ऑगस्ट गुरुकुल महाड बुद्धिबळ २० ऑगस्ट विह परांजपे महाड कुस्ती मुली २१ ऑगस्ट गुरुकुल महाड बुद्धिबळ २१ ऑगस्ट मुले विह परांजपे महाड ,कबड्डी मुले २२ ऑगस्ट, मुली २३ ऑगस्ट नवयुग लाडवली, बॅडमिंटन मुले,मुली २३ ऑगस्ट भिलारे मैदान महाड, मैदानी स्पर्धा मुले १६ सप्टेंबर व मुली १७ सप्टेंबर भेलोशी हायस्कूल व कराटे मुले मुली १९ सप्टेंबर फजंदार वहूर येथे आयोजित करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे.

२०१६ १७ दरम्यान महाड तालुक्याच्या रायगड विभागातील लाडवली येथे विद्यमान मंत्री भरत गोगावले यांच्या विशेष प्रयत्नातून क्रीडा संकुल मंजूर करण्यात आले होते. या दोन इमारतींची कामे काही वर्षांपूर्वीच पूर्ण झाली असून ती हस्तांतरित न झाल्याने किंबहुना या ठिकाणी अत्यावश्यक असलेल्या क्रीडा अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती न झाल्याने या इमारतीची दुरावस्था झाली आहे.

कोट्यवधी रुपये खर्चून निर्माण करण्यात आलेली ही क्रीडा संकुलाची वास्तू आता पडून असून या ठिकाणी बेकायदेशीर घटना घडत असल्याच्या तक्रारी स्थानिक ग्रामस्थांकडून करण्यात येऊन देखील सार्वजनिक बांधकाम विभाग अथवा स्थानिक प्रशासनाकडून याबाबत कोणतीही कार्यवाही केली जात नसल्याबद्दल क्रीडाप्रेमी नागरिकांमधून तसेच पालक वर्गातून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

एकीकडे विविध क्रीडा क्षेत्रात जागतिक पातळीवर देशातील मुले मुली सर्वोच्च कामगिरी करत असताना ऐतिहासिक महाड तालुक्यांतील विद्यार्थ्यांना मात्र किमान आवश्यक असलेल्या शासकीय सुविधा देखील प्राप्त होत नसल्याबद्दल क्रीडाप्रेमी मधून शासनाविरोधात तीव्र नाराज याची भावना व्यक्त होत आहे शासनाने बांधण्यात आलेले क्रीडा संकुल तातडीने पूर्णत्वास नेऊन ते लोकार्पित करावे अशी मागणी करण्यात येत आहे.

## यशस्वी-ऋषभला आशिया कपमधून डच्चू!

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**
टीम इंडिया आता आशिया कप २०२५ स्पर्धेत खेळताना दिसणार आहे. आशिया कप स्पर्धेला ९ सप्टेंबरपासून सुरुवात होणार आहे. या स्पर्धेसाठी अजून संघाची घोषणा करण्यात आलेली नाही. आशिया कपसाठी भारतीय संघाची ऑगस्ट महिन्यातील चौथ्या आठवड्यात घोषणा केली जाऊ शकते.

सूर्यकुमार यादव भारतीय संघाचं नेतृत्व करणार आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, टीम इंडियाचा युवा ओपनर यशस्वी जैस्वाल आणि अनुभवी विकेटकीपर फलंदाज ऋषभ पंत या दोघांना संधी मिळणार नसल्याचं म्हटलं जात आहे. यशस्वी आणि पंत या दोघांना संधी मिळणार असल्याचा दावा केला जात होता. तसेच या दोघांना संधी देण्यात यावी, असं दिग्गजांचं म्हणणं होतं.

इंडियनएक्सप्रेसनुसार, यशस्वी आणि ऋषभ या दोघांचा टी २० टीमसाठी विचार करण्यात आलेला नाही. भारताकडे विकेटकीपर म्हणून संजू सॅमसन आहे. टीम मॅनेजमेंटला संजूवर विश्वास आहे. संजू ओपनिंग करु शकतो. तसेच अभिषेक शर्मा सलामीवीर म्हणून दुसरी पसंत आहे. त्यामुळे यशस्वीसाठी संधीच नाही.

केएल राहुल याचं टी २० संघात कमबॅक होण्याची शक्यता कमी आहे. संजूनंतर अमरावतीकर आणि आरसीबीला आयपीएल ट्रॉफी जिंकून देण्यात निर्णायक भूमिका बजावणाऱ्या जितेश शर्मा हा विकेटकीपर म्हणून दुसरी पसंत आहे. जितेशने गेल्या काही महिन्यात त्याच्या खेळात सुधारणा केली आहे. जितेश फिनीशर म्हणूनही उदयास आला आहे. तसेच विकेटकीपिंग ही त्याची जमेची बाजू आहे.



### श्रेयसचं कमबॅक होण्याची शक्यता!

**दरम्यान आशिया कप स्पर्धेनिमित्ताने भारतीय संघात मुंबईकर श्रेयस अय्यर याचं कमबॅक होऊ शकतं. श्रेयस फिरकी गोलंदाजांविरुद्ध चांगला खेळतो. तसेच श्रेयसने आयपीएलमध्ये कर्णधार आणि फलंदाज म्हणून आपला ठसा उमटवला आहे. त्यामुळे श्रेयसला संधी मिळण्याची शक्यता अधिक आहे. त्यामुळे आता कुणाला संधी मिळते आणि कुणाला डच्चू? हे येत्या काही दिवसातच स्पष्ट होईल.**

## फुटबॉलपटू रोनाल्डोने केला साखरपुडा

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**
पोर्तुगाल आणि अल नसरचा स्टार फुटबॉलपटू क्रिस्टियानो रोनाल्डोने त्याची दीर्घकाळची मैत्रीण जॉर्जिना रॉड्रिग्जशी साखरपुडा केला आहे. जॉर्जिनाने इन्स्टाग्रामवर अंगठीचा फोटो शेअर केला आहे.



जॉर्जिनाने तिच्या हाताचा आणि रोनाल्डोच्या हाताचा फोटो पोस्ट केला आणि कॅप्शनमध्ये लिहिले, महो, मी तुझ्यावर प्रेम करते. या आयुष्यात आणि येणाऱ्या प्रत्येक आयुष्यात.फ तथापि, रोनाल्डोने अद्याप याबद्दल काहीही पोस्ट केलेले नाही.

रोनाल्डो आणि जॉर्जिना नऊ वर्षांपासून डेटिंग करत आहेत. २०१७ च्या सुरुवातीला दोघांनी त्यांच्या नात्याची पुष्टी केली आणि झुरिचमधील फिफा फुटबॉल पुरस्कार सोहळ्यात ते पहिल्यांदाच एकत्र दिसले.जॉर्जिना ही एक स्पॅनिश मॉडेल आणि सोशल मीडिया इन्फ्लुएंसर आहे. त्यांना चार मुले आहेत. अवा मारिया आणि माटेओ यांचा जन्म २०१७ मध्ये सरोगसीद्वारे झाला. त्याचवेळी, जॉर्जिनाने २०१७ मध्ये मुलगी अलाना मार्टिना आणि २०२२ मध्ये बेला एस्मेराल्डा यांना जन्म दिला. याशिवाय रोनाल्डोला एक मुलगा देखील आहे. क्रिस्टियानो रोनाल्डो ज्युनियर, ज्याचा जन्म २०१० मध्ये झाला. गेल्या वर्षी ५ सप्टेंबर रोजी क्रोएशियाविरुद्धच्या सामन्यात रोनाल्डोने त्याच्या कारकिर्दीतील ९०० वा गोल केला. असा पराक्रम करणारा तो जगातील पहिला खेळाडू आहे.

## धोनीच्या खटल्यावर होणार सुनावणी

**नवी दिल्ली :** आयपीएलच्या सट्टेबाजी घोटाळ्यात माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनी याचे नाव घेत त्याच्या प्रतिमेला धक्का लावल्याप्रकरणी आता खटला चालवला जाणार आहे. महेंद्रसिंग धोनीकडून या प्रकरणी १०० कोटींच्या मानहानीचा दावा करण्यात आला असून मद्रास उच्च न्यायालयाने या खटल्याच्या सुनावणीला मान्यता दिली आहे. त्यामुळे आता साक्षीदारांची साक्ष नोंद करून घेण्यासाठी अडव्होकेट कमिशनरची नियुक्ती केली आहे.

## आकाश दीपचं घरी जंगी स्वागत

**नवी दिल्ली :** नुकत्याच आटोपलेल्या इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत भारतीय संघाने दमदार कामगिरीचं प्रदर्शन केलं होतं. भारतीय संघाने दुसऱ्या आणि पाचव्या कसोटीमध्ये मिळवलेल्या यशामध्ये भारतीय संघातील नवोदित खेळाडू आकाश दीप याने मोलाचं योगदान दिलं होतं. शेवटच्या कसोटीत तर आकाश दीप याने नाईट वॉचमन म्हणून फलंदाजीस येत दिलेलं योगदान बहुमूल्य ठरलं होतं. दरम्यान, इंग्लंड दौरा गाजवून मायदेशी परतलेल्या आकाश दीप याचं आज त्याच्या गावामध्ये जंगी स्वागत करण्यात आलं.

इंग्लंड दौरा आटोपल्यानंतर आकाश दीप हा थेट लखनौ येथे पोहोचला होता. तिथे त्याने टोयोटा फॉर्च्युनर गाडी खरेदी केली होती. दरम्यान, आकाश दीप आज बिहारमधील रोहतास जिल्ह्यात असलेल्या सासाराम येथील आपल्या घरी पोहोचला. तिथे त्याचं जंगी स्वागत करण्यात आलं.आकाश दीप सासाराममध्ये पोहोचताच शेकडो वाहनांच्या ताफ्याद्वारे त्याचं स्वागत केलं गेलं. जागोजागी त्याच्यावर फुलांचा वर्षाव करण्यात आला.

## २० बॉल ९६ रन्स

### डेवाल्ड ब्रेव्हीसचं
## ऑस्ट्रेलियाविरुद्ध वादळी शतक

**। डार्विन । वृत्तसंस्था।**
दक्षिण आफ्रिकेचा युवा आणि स्फोटक फलंदाज डेवाल्ड ब्रेव्हीस याने ऑस्ट्रेलिया विरूद्धच्या दुसऱ्या टी २० सामन्यात स्फोटक आणि विक्रमी शतकी खेळी साकारली आहे. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेने २०० पार मजली मारली आहे.

ब्रेव्हीसने केलेल्या नाबाद शतकाच्या जोरावर दक्षिण आफ्रिकेने ऑस्ट्रेलियासमोर २१९ धावांचं आव्हान ठेवलं आहे. त्यामुळे आता दक्षिण आफ्रिकेचे गोलंदाज या धावांचा यशस्वी



बचाव करण्यात यशस्वी ठरणार की ब्रेव्हीसची शतकी खेळी व्यर्थ जाणार? हे स्पष्ट होईल.

फाफ डु प्लेसीसचा रेकॉर्ड ब्रेक

ब्रेव्हीसने अवघ्या ५६ चेंडूत २२३.२१ च्या स्ट्राईक रेटने नाबाद १२५ धावांची खेळी केली. ब्रेव्हीसने या दरम्यान १२ चौकार आणि ८ षटकारांच्या मदतीने एकूण २० चेंडूत ९६ धावा केल्या. ब्रेव्हीस यासह दक्षिण आफ्रिकेसाठी टी २० मध्ये सर्वोच्च खेळी करणारा पहिला फलंदाज ठरला.

### ब्रेव्हीसची विक्रमी शतकी खेळी

**ब्रेव्हीसने या शतकी खेळीसह एका झटक्यात असंख्य रेकॉर्ड ब्रेक केले. तसेच ब्रेव्हीसआधी दक्षिण आफ्रिकेच्या एकालाही अशी कामगिरी करता आली नाही. डार्विनमधील अरारा क्रिकेट ग्राउंडमध्ये ब्रेव्हीस चौथ्या स्थानी बॅटिंगला आला. ब्रेव्हीसची सुरुवात काहीशी संथ झाली. मात्र ब्रेव्हीसने त्यानंतर गिअर बदलला आणि मैदानात चौफेर फटकेबाजी करत कांगारुंच्या गोलंदाजांची धुलाई केली. ब्रेव्हीसने यासह पहिलवहिलं टी २० अर्धशतक पूर्ण केलं. ब्रेव्हीसचं पाहता पाहता शतक केव्हा झालं हे देखील समजलं नाही. ब्रेव्हीसने अर्धशतक ते शतक हा टप्पा अवघ्या १६ चेंडूत पूर्ण केला. ब्रेव्हीसने अवघ्या ४१ बॉलमध्ये टी २० कारकीर्दीतील शतक पूर्ण केलं.**

### १९ व २२ वर्षांखालील गटामध्ये पदकांची लयलूट | रितिकाने पटकावले सुवर्णपदक

# आशियाई बॉक्सिंगमध्ये भारताचा ठोसा

**। बँकॉक । वृत्तसंस्था ।**
भारताच्या खेळाडूंनी आशियाई बॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धेमध्ये ठसा उमटवला. १९ वर्षांखालील स्पर्धेमध्ये एकूण १४ पदकांची माळ आपल्या गळ्यात घातल्यानंतर भारतीय खेळाडूंनी २२ वर्षांखालील स्पर्धेमध्ये १३ पदके आपल्या नावावर केली. २२ वर्षांखालील स्पर्धेत भारताने चौथा क्रमांक पटकावला.

भारताच्या रितिका हिने महिलांच्या ८० किलोपेक्षा जास्त वजनी गटात सुवर्णपदक पटकावताना देदीप्यमान कामगिरी नोंदवली. रितिका हिने सुवर्णपदकाच्या लढतीत



कझाकस्तानच्या ॲसेल तोक्तासिन हिच्यावर विजय साकारला. याआधी सकाळच्या सत्रात भारताच्या दोन खेळाडूंना रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. महिलांच्या ५७ किलो वजनी गटात उझबेकिस्तानच्या खुमेराबोनू मामाजोनोवा हिच्याकडून यात्री पटेल हिला पराभवाचा सामना करावा लागला.

त्यामुळे तिला रौप्यपदक मिळाले. तसेच महिलांच्या ६० किलो वजनी गटात चीनच्या यू टिएन हिने प्रिया हिची झुंज ३-२ अशी मोडून काढली. यामुळे प्रियाही रौप्यपदकाचीच मानकरी ठरली. पुरुष विभागात दोन रौप्यपदकेभारताला पुरुष विभागातही दोन रौप्यपदकांवर समाधान मानावे लागले. पुरुषांच्या ७५ किलो वजनी गटात उझबेकिस्तानच्या शावकतझोन बोलतेव याने भारताच्या नीरजला पराभूत केले. तसेच पुरुषांच्या ९० किलोपेक्षा अधिक वजनी गटात उझबेकिस्तानच्या खालीमजोन मामासोलिव याने इशान कटारिया याला नमवले. त्यामुळे नीरज व इशान या दोघांनाही रौप्यपदक मिळाले.

### गटात मिळवले दुसरे स्थान

**भारताने १९ वर्षांखालील स्पर्धेत १४ पदकांसह दुसरे स्थान मिळवले. पदकतालिकेत भारताला झेप घेता आली. भारताने १९ वर्षांखालील गटामध्ये तीन सुवर्ण, सात रौप्य व चार ब्राँझ अशी एकूण १४ पदकांची कमाई केली. ही बाब वाखाणण्याजोगी ठरली.**

## निवडक



### पावसाळी क्रिकेट सामने उत्साहात

**खांब :** रोहा तालुक्यातील शिव छत्रपती क्रिकेट असोसिएशन धामणसई पंचक्रोशी यांच्या वतीने मुठवली खु.येथील भव्य मैदानावर पावसाळी क्रिकेट सामने मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले युवा कार्यकर्ते महेश तुपकर यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी चंद्रकांत शिंदे, सतीश ठाकूर, सुरेश शिंदे, राजा शेळके, निखिल सानप, धनराज शिंदे, अनिकेत शेळके, सुनील शेळके, शंकर कदम,तसेच मोठ्या संख्येने क्रिकेट प्रेमी उपस्थित होते. या विभागात पहिल्यांदाच अशाप्रकारचे पावसाळी क्रिकेट सामने भरविण्यात आल्याने सर्वांचीच उत्सुकता शिगेला पोहचली होती. तर सामने पाहण्यासाठीही मोठ्या संख्येने क्रिकेटप्रेमी नागरिकांनी गर्दी केली होती. स्पर्धेत यशस्वी ठरलेले संघ व खेळाडू यांना उपस्थित मान्यवरांचे हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

### तळ्यात शालेय क्रीडा स्पर्धा



**तळा :** महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागामार्फत दरवर्षी शालेय क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले जाते. २०२५-२६ साठी, रायगड जिल्ह्यातील तळा तालुक्यांमध्ये कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, कुस्ती आणि मैदानी खेळ यांसारख्या विविध खेळांच्या स्पर्धाचे दिनांक ११ ते २५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन नायब तहसीलदार जितेंद्र टेंबे यांच्या हस्ते करण्यात आले. ११ ऑगस्ट रोजी सर्व मुलींचे कबड्डी व खो - खो, १२ ऑगस्ट सर्व मुले कबड्डी खो-खो,१३ ऑगस्ट मैदानी स्पर्धा, १८ ऑगस्ट बॅडमिंटन व कुस्ती स्पर्धा, १९ ऑगस्ट बुद्धिबळ व कराटे तर २५ ऑगस्ट रोजी कॅरम, हॉलिबॉल आदी स्पर्धा पार पडणार आहेत. या स्पर्धेत तळा हायस्कूल, बोरघर हायस्कूल, पिटसई हायस्कूल, पढवण हायस्कूल, मजगाव हायस्कूल, महागाव हायस्कूल, राजिप तळा, म्हसाडी हायस्कूल, एस.एस.निकम तळा, उर्दू हायस्कूल तळा, मांदाड हायस्कूल व उसर हायस्कूल या शाळेचे विद्यार्थी सहभागी झाले आहेत. ११ ऑगस्ट रोजी तळा तालुक्यातील सर्व मुलींच्या खो-खो व कबड्डी स्पर्धा उत्साहात पार पडल्या. यावेळी तळा तालुक्यातील मुख्याध्यापक, क्रीडा शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

### सात फलंदाज भोपळ्यावर

**नवी दिल्ली :** १९ वर्षांखालील संघाच्या वन डे वर्ल्ड कप पात्रता स्पर्धेतील अमेरिका विभागात रविवारी अचंबित करणारा सामना झाला. कॅनडाच्या संघाने परमन वीर स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सवर झालेल्या लढतीत अर्जेंटिनाच्या संघावर ऐतिहासिक विजय मिळवला. अर्जेंटिनाचा संघ अवघ्या २३ धावांतगारद झाला, त्यातील सात फलंदाज भोपळा फोडू शकले नाहीत. कॅनडाच्या गोलंदाजांनी वेगवान व अचूक माऱ्याने प्रतिस्पर्ध्यांना अक्षरशः गारद केले. ५० षटकांच्या सामन्यात अर्जेंटिनाचा डाव फक्त १५.३ षटकांत संपुष्टात आला. यानंतर २४ धावांचे लक्ष्य कॅनडाने केवळ ५ चेंडूंमध्ये गाठले. या विजयासह कॅनडाने १० विकेटने सामना जिंकला आणि विक्रमी विजयाची नोंद केली. १९ वर्षांखालील क्रिकेट इतिहासातील सर्वात जलद धावांचा पाठलाग करणाऱ्या सामन्यांपैकी एक ठरला आहे. अर्जेंटिनाच्या फलंदाजांना कॅनडाच्या गोलंदाजांसमोर काहीच उत्तर सापडले नाही. हा सामना क्रिकेट चाहत्यांसाठी आश्चर्यचकित करणारा ठरला आहे. प्रथम फलंदाजीला आलेल्या अर्जेंटिनाचे ६ फलंदाज शून्यावर बाद झाले, तर एक शून्यावर नाबाद राहिला. सलामीवीर ऑटो सोरोंडो (७) हा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला. टॉमस रोसीने ६ धावा केल्या. कॅनडाच्या जगमनदीप पॉलने ५ षटकांत ७ धावा देताना ६ विकेट्स घेतल्या. त्याने तीन निर्धाव षटकं फेकली. कृष मिश्राने ३.४-०-६-२ अशी, तर डॉमिनिक डेनस्टने ६-५-४-२ अशी स्पेल टाकली.

### राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयक मंजूर

**नवी दिल्ली :** लोकसभेने राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयक आणि राष्ट्रीय उत्तेजक द्रव्य प्रतिबंधक सुधारणा विधेयक, २०२५ मंजूर केले. क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी स्वातंत्र्यानंतर भारतीय खेळांमध्ये ही सर्वात मोठी सुधारणा असल्याचे म्हटले. दरम्यान, बिहारमध्ये मतदार यादी पुनरावृत्तीआणि कथित मतदान फसवणुकीविरुद्ध विरोधकांनी निषेध सुरूच ठेवला. राष्ट्रीय क्रीडा विधेयक आणण्याची प्रक्रिया १९७५ मध्ये सुरू झाली. परंतु प्रत्येक वेळी राजकीय कारणांमुळे हे विधेयक संसदेत कधीच पोहोचू शकले नाही. स्वातंत्र्यानंतरची ही सर्वात मोठी क्रीडा सुधारणा आहे. हे विधेयक क्रीडा संघटनांमध्ये जबाबदारी, न्याय आणि चांगले प्रशासन सुनिश्चित करेल. त्यांनी असेही म्हटले की हे विधेयक भारताच्या क्रीडा व्यवस्थेसाठी खूप महत्वाचे आहे, परंतु विरोधी पक्ष त्यात सामील झाले नाहीत हे दुर्दैवी आहे. सकाळी झालेल्या गोंधळामुळे सभागृह तहकूब करण्यात आले, परंतु दुपारी २ वाजता सभागृह पुन्हा सुरू झाले, तेव्हा दोन्ही विधेयके मंजूर करण्यात आली. निवडणूक आयोगाच्या कार्यालयाकडे कूच करत असताना त्यांना ताब्यात घेण्यात आल्याने बहुतेक विरोधी नेते त्यावेळी सभागृहात उपस्थित नव्हते. चर्चेदरम्यान, काही विरोधी खासदारांनीही विधेयकाला पाठिंबा दिला, परंतु नंतर विरोधी पक्ष परतले आणि घोषणाबाजी सुरू केली. गोंधळादरम्यान, विधेयक आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)